क्वांटम कबीर



राजेश गजानन भुतकर

अनुक्रमणिका

१ संतांच्या अवताराचे क्वांटम शास्त्रीय अधिष्ठान.....4

कबीर वाणी.....6

संतांच्या प्रकटीकरणाचे क्वांटम शास्त्रीय अधिष्ठान.....7

२ क्वांटम शास्त्रीयदृष्ट्या साधनेचे महत्व 16

माया महा ठगनी हम जानी 19

कौन ठगवा नगरिया लूटल हो 26

उड जाएगा हंस अकेला... 31

३ मनरूपी क्वांटम क्षेत्राची साधने दरम्यान सावधानता व अभ्यास 36

अवधूता गगन घटा गहरानी रे 36

गुरु ज्ञानी... 38

हिरना समझ बूझ बन चरना 41

गगन की ओट निसाना हैं भाई 45

जो दिसे सो नही.. हैं सो कहा ना जाई 47

मोको कहां ढूंढे रे.... 51

साधो ये मूरदोंका गांव.....52

४ सिध्द योग्याची क्वांटम परिणामरुपी वैशिष्ट्ये.....54

युगन युगन हम योगी.....54

शून्य गढ शहर.....57

सखिया वा घर सबसे न्यारा 65

निर्भय निर्गुण गुण रे गाऊंगा.....69

हम परदेशी पंछी बाबा... 77

संदर्भ.....81

लेखक परिचय

पुणे विद्यापीठातून स्थापत्य अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर काही वर्षे अभियांत्रिकी महाविद्यालयात लेक्चरर म्हणून काम केले. नंतर शासकीय नोकरी मिळाली आणि किमान भौतिक गरजांची पूर्तता करण्यासाठी सध्या रस्ते बांधणी विभागात कार्यरत आहे. पण जीवनाचे उद्दिष्ट हे नोकरी नसून आत्मोन्नती असल्याने आपल्या वैदिक धर्मग्रंथ व संतसाहित्य याचे सतत वाचन करत असतो. अशा या द्वैताद्वैत दर्शनामुळे मनामध्ये या विश्वाच्या गूढते बाबत सतत जिज्ञासा उत्पन्न होत असते. आता भौतिकवाद अत्यंत प्रखर झाल्याने ईश्वरीय सत्तेविषयी अनेक जण साशंक किंवा गैरसमजुतीत असल्याचेही मला जाणवले. समाजमनातील ही साशंकता दूर करण्यासाठी विज्ञानातील अत्याधुनिक प्रगतीच्या अनुषंगाने परामर्श घेण्याचा निर्धार केला आणि त्यातून क्वांटम शास्त्रापर्यंत पोहोचलो. चैतन्य, मन आणि शरीराच्या मार्फत येणाऱ्या संवेदना यांना वैज्ञानिक पातळीवर घेऊन जाण्यासाठी मला क्वांटम शास्त्राचा आधार मिळाला आणि त्यामुळे मी परदेशातील नामवंत शास्त्रज्ञांकडे माझे शोधनिबंध सादर करू शकलो. त्यांची मते घेऊन ते संशोधन तेथील नामवंत संस्थांकडून प्रसिद्ध करण्यात आले. हे सर्व विचारमंथन व लेखन सातत्याने सुरु असल्याने त्यातून या पुस्तकाचे लिखाण घडून आले. यामुळे मला श्रीगुरू संत कबीर जी यांच्या रचनांना वैज्ञानिक अधिष्ठान प्राप्त करून देण्याची संधी उपलब्ध या विश्व उर्जेने उपलब्ध करून दिली. आता श्रद्धेच्या पलीकडे मन घट्ट टिकून राहण्यासाठी अद्वैत विषयावर कविता करणे, भक्तीरस गाण्यासाठी शास्त्रीय संगीताचा अभ्यास करणे, विचारांच्या माध्यमातून घडून आलेले दृष्टांत लिहून काढणे अशा रीतीने

जीवनमार्गाची दिशा आत्मोन्नतीकडे पक्की करून या मार्गावरील प्रयाणोत्सव ईश्वरीय सत्तेच्या बळावर सुरु आहे.

|| शुभं भवतु ||

पत्ता : राजेश गजानन भुतकर

वारजे माळवाडी, सर्व्हे नंबर १३८/अ/१,

वारजे शिवणे मुख्य रस्ता, भाजी मंडई समोर

संजीवनी हॉस्पिटल मागे, पुणे ४११०५८

फोन : ९६८९९३१४५८

इमेल : rbhutkarmmm@gmail.com

सन : २०१६

टिप :

या पुस्तकाची रचना हा विश्वाचा उर्जा अविष्कार आहे. याची सर्वस्वी मालकी ईश्वराची आहे. म्हणून हे पुस्तक खाजगी वापराकरिता वापरावे व जिज्ञासूपर्यंत पोहोचवावे. या पुस्तकाचा कृपया व्यावसायिक वापर करू नये. कुठे संदर्भ घेतल्यास या पुस्तकाचा त्यामध्ये जरूर उल्लेख करावा ही विनंती आहे. ईश्वर आपले भले करो.

कबीर वाणी.

गगन मंडल से उतरे , सदगुरू सत्य कबीर
जलज मांही पोढन कियो सब पीरन के पीर
चौदस सौ पचपन सालगीरा, चंन्द्रवार यह ठाठ कर्यो
ज्येष्ठ सुदी बरसाईत को, पुरनमासी प्रगट भयो
सत कबीर सत लोक से आये, नहीं बाप नही माता जाये
हिते विदेह देह धरी आये, देही का नाम कबीर धराये

हे विश्व आत्यंतिक बुद्धिमान असून स्वत:ला उत्स्फूर्तपणे साकार करत असते. १३ व्या शतकात संत श्री कबीर दास स्वयंप्रकट झाले असे त्यांच्याच वरील दोह्यातून आपल्या लक्षात येते. विश्वाची ही उत्स्फुर्तताच होती हे क्वांटम शास्त्रासारख्या आधुनिक विज्ञानशाखेच्या माध्यमातून आपण पडताळून पाहू शकतो. विश्वाची अमर्याद बुद्धिमत्ता, उत्स्फूर्तता आणि त्यातून स्वत:ला नेमक्या कालावधीतच एका अलौकिक कार्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण क्षमतांसह मूर्त स्वरूपात प्रकट करावयाचे, हे सर्वसामान्य मानवजातीसाठी निश्चितच बुद्धिअगम्य, अति-गूढ व रहस्यमय आहे. या गूढत्वाला आणि रहस्यमयतेला भेदण्यासाठी आपल्याला क्वांटम शास्त्र मदत करीत आहे.



आपल्या आजूबाजूला जो समाज असतो, त्यामध्ये अनेक तऱ्हेच्या व्यक्ती असतात. त्यांच्यामधील सर्व प्रकारचे व्यवहार आणि त्यांच्या अनुभवांचा प्रसार यातून त्या प्रदेशात एक अमूर्त असे माहिती-विश्व निर्माण झालेले असते. या विश्वाची त्या प्रदेशासाठीची ज्ञानासह अज्ञानाची व बुद्धीची स्वत:ची एक मर्यादित पातळी ठरून गेलेली असते. ही मर्यादा तोडून क्रांती घडून येण्यासाठी एक तर त्या समाजाने एकत्र येणे आवश्यक आहे किंवा विश्वाकडून तसे घडून येणे अभिप्रेत असते. या मर्यादांचा विचार करता "संत

कबीरांसारखा एक प्रबुध्द संत अवतरीत होऊन एक अलौकिक अध्यात्मिक क्रांती येथे घडवून आणू शकतो", असे विचार तत्कालीन समाजाच्या खिजगणतीतहि नसले पाहिजेत. मात्र ही गरज जाणणारा "तेथे" विश्वात कोणीतरी आहे किंवा विश्व स्वत: ही गरज जाणून घेऊन त्याप्रमाणे स्वयंप्रकटीकरणाचा उत्स्फूर्त असा अविष्कार घडवून आणते असे म्हणणे मुळीच धाडसाचे होणार नाही. विश्वाची ही बुद्धिअगम्य उत्स्फूर्तता येथे संत कबीर, संत साईबाबा, संत गजानन महाराज, संत स्वामी समर्थ, श्रीमदशंकराचार्य, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ इत्यादी यासारख्या अनेक महात्म्याच्या स्वयंप्रकटीकरणातून स्वयंसिध्द होते. या स्वयंसिद्धतेला आता क्वांटम शास्त्र भक्कम असे आधारभूत झाल्याचे आपल्याला दिसून येते आहे. विश्व निरुद्देश्य किंवा एखाद्या निश्चित अशा चाकोरीबध्द नियमात बांधलेले मुळीच नाहीये हे सुद्धा येथे अधोरेखित होते.

संत कबीर हा उत्युच्च अध्यात्मिक पातळीवरील परम विशुध्द व प्रबुध्द असा चैतन्यमयी उर्जापुंज होता. त्यांच्यामध्ये असलेल्या अपरिमित अशा आत्मिक व अध्यात्मिक सामर्थ्यामुळे विश्वातील षड्रिपूंचा त्यांना कधीच प्रादुर्भाव होऊ शकला नाही, आणि जीवनाच्या आरंभापासूनच ते त्यापासून कमालीचे दक्ष होते असे त्यांच्या परम-वाणीतून म्हणजेच त्यांनी रचलेल्या समग्र साहित्याच्या माध्यमातून दिसून येते. ही असामान्य क्षमता त्यांच्या त्या वैशिष्ट्यपूर्ण प्रकटीकरणातच अंगभूत होती. संत कबीरांच्या या प्रकटीकरणाचा आणि त्यांच्यामध्ये असलेल्या असामान्य क्षमतांचा क्वांटम शास्त्रीय मागोवा आपण येथे प्रथम घेऊयात.

संतांच्या प्रकटीकरणाचे क्वांटम शास्त्रीय अधिष्ठान

क्वांटम शास्त्राने गेल्या शतकात पारंपारिक भौतिक शास्त्राला मुळासकट उखडून टाकले. भौतिक पातळीवरील प्रखर वाटणारी सत्यता ही क्वांटम परिणामांशिवाय अस्तित्वविहीन ठरली. भौतिक पातळीवरील प्रखर वाटणाऱ्या सत्यतेचे "कारण-अधिष्ठान" क्वांटम पातळीवरील "आभासी परिणामात" असल्याचे दिसून आले. भौतिक पातळीवरील निर्धार्यता अनिश्चिततेच्या गर्तेत कोसळली आणि विश्वाकडे पाहण्याचा मानवाचा दृष्टीकोन संपूर्णपणे बदलून गेला.



हे क्वांटम परिणाम अणूच्या गर्भात सूक्ष्मातिसूक्ष्म परमाणूंच्या (Subatomic Particles) क्षेत्रात निर्माण होत असून त्यांना पारंपारिक भौतिक शास्त्राचे कोणतेही नियम लागू होत नाहीत. क्षमताधिष्ठित उर्जेचे अदृश्य असे क्वांटम-उर्जा-तरंग विश्वात असून या क्वांटम उर्जा तरंगामध्ये अनंत प्रकारच्या क्षमता त्यांच्या अनंत प्रमाणात ठासून भरलेल्या असतात. जे जे म्हणून या भौतिक जगतामध्ये सजीवांच्या जाणिवांच्या कक्षेत येऊन पडत आहे, ते सर्व या विश्वाच्या अमूर्त क्षमतांचे मूर्त स्वरूप आहे. भौतिक पातळीवरील प्रत्येक भौतिक घटनेचे मूळ कारण याच क्वांटम पातळीवर त्या क्वांटम उर्जेच्या अमूर्त अशा क्षमताधिष्ठित अवस्थेत दिसून येते. ह्या पंचमहाभूतात्मक विश्वाच्या अर्थपूर्णतेच्या पार्श्वभूमीवर एक अगम्य असे क्वांटम क्षेत्र असून त्याच्या क्वांटम पातळीवर सातत्याने घडून येणाऱ्या परिणामांनी भौतिक सत्यतेला अर्थपूर्णरित्या साकारले गेले आहे. पंचमहाभूतात्मक स्थूल विश्वाला अर्थ प्रदान करणारी त्याच पंचमहाभूतात्मक विश्वाची सूक्ष्म क्वांटम अवस्था कारणीभूत ठरली असल्याचे शास्त्रज्ञांना दिसून आले आहे.

विश्व साकार होण्यापूर्वीची उर्जा विश्व साकारत असताना ती तिच्या स्थूल व सूक्ष्म स्वरूपात प्रकट झाली असली पाहिजे, ज्यातून तिने सुयोग्य वातावरणात तिच्या जैविक अस्तित्वाला जाणिवांच्या माध्यमातून हुंकार दिला. अपरिमित अशा बुद्धिमत्तेच्या मूर्त सादरीकरणाच्या वेळेस पंचमहाभूतात्मक शरीरामध्ये वैशिष्ट्यपूर्ण क्वांटम अवस्था धारण करणारे सजीव निर्माण होणे उत्स्फूर्त व अपरिहार्य होते असे सखोल विचारांती दिसून येते. बल आणि गुणवैशिष्ट्ये हे वैश्विक उर्जेचे दोन मुलभूत घटक असून त्यांनी अणूच्या गर्भात अनुक्रमे बोसॉन आणि फार्मियोनरुपी क्वांटम क्षेत्रे धारण केली आहेत. दोन्ही घटक स्वतंत्रपणेच नव्हे तर एकत्र आल्यावरही निर्गुणत्वच धारण करतात, तथापि पाहणारा जो चैतन्याश्रीत मनरूपी निरीक्षक आहे तो भ्रांतीतून व अज्ञानवश त्या उर्जा संक्रमणाला स्वत:कडून होणाऱ्या निरीक्षणाच्या माध्यमातून सगुणत्व प्राप्त करून देतो. हे सर्व अनिर्वचनीय आणि गूढ रहस्यमय आहे जे स्वस्वरुपानुभवाच्या साधन मार्गावरच समजू शकेल.

असे हे वैशिष्ट्यपूर्ण क्वांटम क्षेत्र सजीवांच्या मेंदूमध्ये असल्याचे शास्त्रज्ञांना दिसून आले आहे. मेंदूमधील क्वांटम क्षेत्रातून परिणाम पावलेला हा मन नावाचा एक सूक्ष्म अवयव सजीवांसाठी उद्भूमित झाला. त्याने मेंदूच्या सहाय्याने भौतिक पातळीवर जे कार्य त्याने सुरु केले तो त्याचा मूर्त असा अविष्कार झाला. तथापि या सूक्ष्म मनाचे कार्य घडून येत असताना जाणिवांची निर्मिती अनिवार्य होती. या जाणिवांचे उत्तरदायित्व स्वीकारणारी केंद्रीभूत भूमिका आकारास येणे आवश्यक होती. या सूक्ष्म व अदृश्य जाणीवांना प्रकाशित करणारे परम तत्व तेथे अवतरीत होणे आवश्यक होते अन्यथा सजीव आणि रोबोट यात फरक तो काही राहिला नसता. हे काम आणि कार्यक्षेत्र पंचमहाभूतात्मक नाशवंत मेंदूचे निश्चितच नव्हते.

या विश्वात उर्जेचे संक्रमण व रुपांतरण सतत घडून येत असते. ही उर्जा तिच्या क्वांटम अवस्थेत पदार्थांच्या व बलाच्या गुणांचे व त्यांच्या माहितीचे संक्रमण व स्थित्यंतर घडवून आणते. उर्जेतील हे बदल तिच्या स्थूल व सूक्ष्म अशा दोन्ही पातळ्यांवर घडून येतात आणि त्यातूनच कार्यकारणभावाची शृंखला निर्माण होते आणि टिकून राहते. याचा अर्थ वैश्विक उर्जेतून अनेक प्रकारे उर्जा रुपांतर, उर्जा संक्रमण आणि उर्जा स्थित्यंतर घडून आले आणि उर्जाच उर्जेच्या या आविष्काराला स्वत:च्याच जाणीव क्षेत्रामार्फत चैतन्याच्या परम प्रकाशात स्वत:ला जाणून घेत आहे. त्यामुळे ना येथे कोणी मी-तू, ना माझे-तुझे, ना मला-तुला. ना येथे कोणाची कसली मालकी आणि ना येथे कोणी कर्ता आणि भोक्ता. सर्वत्र समानता, एकत्व आणि एकतत्वच आहे. पण भौतिक पातळीवर तसे आपल्याला जाणवत नाही आणि त्यामुळे या फरकाचे वा द्वंद्वाचे व्यवस्थापन करण्यातच आपले जीवन व्यतीत होते किंबहुना या द्वंद्वाच्या व्यवस्थापनालाच आपण जीवन म्हणतो आणि त्यातच आपल्या जीवनाची इतिश्री मानतो, जी विश्वाच्या सगुण स्वरुपात साकार होण्याच्या मूळ उद्दिष्टाच्या दृष्टीने निव्वळ फुटकळ आहे. विश्वाचे हे सगुण साकार होणे आणि त्याच क्षणी द्वंद्वात्मक भौतिकवाद निर्माण होणे ही घटनाच त्याच्या निर्गुणत्वाकडे जाण्याचे पहिले पाउल होते आणि आहे. या विश्वाला त्याच्या निर्गुण स्वरुपात त्याचे चिरंतन अस्तित्व बहाल करायचे सर्वात परम असे काम विश्वाने प्रगत बुद्धीच्या मानवाला दिले आहे. हेच सर्व ऋषीमुनी व संत मंडळी आपल्याला कंठरवाने सांगत आहेत.


चैतन्य आणि मनाचे क्वांटम शास्त्रीय अभिकरण
वैश्विक क्वांटम उर्जा
बोसॉन फिल्ड
फार्मियोन फिल्ड
जॉन किली यांच्या इतर सारणीतील मूलद्रव्ये
मेंदूमधील चैतन्याश्रीत क्वांटम क्षेत्र
मनरूपी क्वांटम क्षेत्र
पदार्थ आणि बले यांच्या भौतिक अभिक्रिया
२ क्वांटम क्षेत्रांची फेज एन्टगलमेंट
पदार्थ आणि त्यांच्या बलाच्या अन्योन्य क्रियेतून सजीवांमधील क्वांटम क्षेत्रांना उद्दीपित करण्याची क्षमता असलेले क्वांटम उर्जापुंज
सुक्ष्म मनोकणांचा स्पिन आणि "मी"च्या सर्वोच्च संवेदनांचा क्षोभ
मनोक्षेत्रात उठलेला प्रतिसाद "अहंभाव/मी-पणा"
विश्वाकडून शरीर व मनामध्ये संक्रमित होणाऱ्या संवेदना भौतिक सत्यता म्हणून जाणीव क्षेत्रात आणून त्याचे निरिक्षक होणे व त्याला प्रतिसाद देणे हि कार्याची भूमिका सजीवांकडून होत राहिली आहे.
कार्यकारणभाव

शास्त्रज्ञांनी असे दाखवून दिले आहे कि ज्या क्षणी मनरूपी क्वांटम क्षेत्र मेंदूमध्ये निर्माण झाले त्याच क्षणी उर्जेचे परमाणु त्यांच्या तरंग अवस्थेतून त्यांच्या कण स्वरूपात रुपांतरीत झाले. या क्वांटम क्षेत्रामध्ये बलाचे सूक्ष्म कण ज्याला आपण

बोसॉन म्हणतो यांनी चक्रीय गती धारण केली. या चक्रीय गतीतून परम चैतन्याच्या सर्वोच्च संवेदना मनरूपी क्वांटम क्षेत्रात संक्रमित झाल्या. उर्जेचे कण तिच्या अत्युच्च पातळीवर चैतन्याच्या परमोच्च संवेदनांचे वाहक झाले. या सर्वोच्च संवेदना म्हणजेच सर्व प्राणीमात्रांचा एकमेवाद्वितीय असा "मी" झाला. हाच तो वेदांमधील "कूटस्थब्रह्म" होय. या वैश्विक व एकमेवाद्वितीय अशा संवेदनेला मनरूपी क्वांटम क्षेत्राने दिलेल्या अंतर्गत प्रतिसादातून या "मी" चे जीवाच्या सर्वसामान्य अशा अहंभावात रुपांतर झाले आणि एक केंद्रीभूत अशी अहंभावात्मक व्यक्तिरेखा मनामध्ये निर्माण झाली. ही केंद्रीभूत व्यक्तिरेखा त्याच्या मनोक्षेत्रातील विविध कार्याची आणि भौतिक पातळीवरील स्थूल कार्याची निरीक्षक झाली. जीव स्थूल व सूक्ष्म पातळीवर विश्वाचा निरीक्षक म्हणून काम करू लागला.

गुणवैशिष्ट्यांचे सूक्ष्म कण ज्याला आपण फार्मियोन म्हणतो ते सुध्दा या मनरूपी क्वांटम क्षेत्रात त्यांची भूमिका बजावू लागले. पदार्थांपासून संक्रमित होणारी गुणवैशिष्ट्यांची क्वांटम माहिती मन व मेंदू यांच्या प्रणालीतून संक्रमित होताना विविध भाव आणि विचार निर्माण होऊ लागले. मनरूपी क्वांटम क्षेत्र हे क्वांटम बलाचे आणि क्वांटम गुणवैशिष्ट्यांचे अभूतपूर्व असे क्षेत्र झाले. सत्व, रज आणि तामस या त्रिगुणांचे अवतरण त्या जीवाच्या क्षमता रूपाने तेथे प्रकट झाले. त्या चैतन्याश्रीत मनाने त्याच्या अहंभावात्मक भूमिकेतून केलेले अंतर्गत निरीक्षण त्यामधील क्षमतांना अर्थ प्रदान करून देऊ लागले. एवढेच नव्हे तर त्या स्थूल-सूक्ष्म क्षमतांची मालकी स्वत:कडे घेऊन त्यांचा स्थूल-सूक्ष्म अविष्कार घडवून आणण्याचा खटाटोप म्हणजेच जीवन अशी भ्रांत कल्पना त्याने परम सत्य म्हणून आजीवन उराशी बाळगली.

पंचज्ञानेंद्रियांकडून येणाऱ्या सर्व प्रकारच्या संवेदना या पदार्थमय असल्याने त्या निम्न पातळीवरील असतात. या संवेदनांच्यामार्फत विश्वातील विविध पदार्थांच्या गुणांचे व बलांचे संक्रमण मनरूपी क्वांटम क्षेत्रात घडून येते. या संवेदनांना जाणण्यासाठी चैतन्यमयी "मी"रुपी सर्वोच्च संवेदनेची पार्श्वभूमी निर्माण होणे आवश्यक होते. या सर्वोच्च जाणीव क्षेत्रातून मनाकडून उत्स्फूर्तपणे निर्माण झालेला हुंकारात्मक प्रतिसाद म्हणजे मनाची अहंभावात्मक भूमिका होय. विश्वातून संक्रमित होणाऱ्या संवेदना मेंदूमध्ये पृथक होऊन मनाकडून त्या स्वत:च्या जाणीवेच्या कक्षेत आणल्या गेल्या. तेथे त्यांचे चैतन्याश्रीत मनाकडून मोजमाप केले गेले. मोजमाप होताक्षणी तेथे मनरूपी क्वांटम क्षेत्रात क्षोभ निर्माण झाला. त्याचे चैतन्याश्रीत मनाकडून पुन्हा मोजमाप झाले असता तेथे संवेदनांचे अर्थानुबोधन घडून आले.

मनाच्या अंतर्गत क्षमता जागृत झाल्या आणि त्या संवेदनांचे रुपांतर अनुभवात करून त्यांना स्थूल व सूक्ष्म स्वरूपात जिवाकडून प्रतिसाद दिला गेला. ह्या सर्व क्रिया प्रकाशाच्या वेगाहून अधिक वेगाने घडून आल्या आणि जीवनात एक प्रकारची सातत्यता आणि सलगता वाटू लागली.

क्वांटम शास्त्रामध्ये क्वांटम क्षेत्र मीमांसा (Quantum Field Theory), मोजमाप मीमांसा (Measurement Theory) , क्षोभ मीमांसा (Perturbation Theory), प्रतिसाद मीमांसा (Response Theory) अशा अनेक मीमांसा असून आवश्यक त्या सर्व प्रयोगाद्वारे आणि उच्च गणितीय मांडणीद्वारे हे शास्त्र एक अतिप्रगत असे शास्त्र म्हणून गेल्या शतकात जगद्मान्य झाले आहे.

प्रत्येक सजीवाला त्याचे स्वतंत्र अस्तित्व असल्याचे प्रकर्षाने जाणवू लागले. सर्वप्रथम मन हे अप्रगत व अज्ञानी असल्याने त्याने स्थूल शरीर हीच आपली अंतिम ओळख आणि त्याचे सुखदु:ख हेच आपले सुखदु:ख हा समज भौतिक पातळीवर दृढ केला. निसर्गात पाय रोवून त्यावर मात करण्यासाठी मानवाच्या बौद्धिक क्षमतेतून सृजनशीलतेचा उगम झाला. विश्वाकडून येणाऱ्या अनुभवांच्या अनुषंगाने मनामध्ये प्रतिसाद निर्माण होताना मनाच्या बोसॉनरुपी बल क्षेत्रामधून जे उर्जा संक्रमण झाले त्यातून या गुणवैशिष्ट्यांचे वाहक असलेल्या फार्मियोन या सूक्ष्म कणांना गती प्राप्त झाली. त्यातून त्रिगुणात्मक भावभावना, इच्छा, आकांक्षा, वासना, स्पर्धा, इरादे, महत्वाकांक्षा आणि त्यातून पुन्हा षड्रिपूंचे पेव मनरूपी क्वांटम क्षेत्रात फुटले. म्हणजे शुध्द मन:शक्ती या त्रिगुणात्मक भावभावना, इच्छा, आकांक्षा, वासना, स्पर्धा, इरादे, महत्वाकांक्षा व षड्रिपू यांच्या रूपाने भासू लागली. अन्यथा शक्तीतत्व वा उर्जातत्व ही मुळात निर्गुण तत्वेच आहेत. अहंभावीत जीव अशा भासमय अवस्थेची मालकी स्वत:कडे घेऊन अनाहूतपणे त्यांचा कर्ता आणि भोक्ता होतो. हेच वैज्ञानिक रहस्य आता क्वांटम शास्त्र अत्यंत समर्पकपणे उलगडवून दाखवीत आहे.

जो बलशाली तो जेत्ता असे जंगली प्राण्यांप्रमाणे मानवाने वागणे सुरु केले. विश्वाने त्याच्या सजीवतेचे आणि जाणिवांचे सातत्य टिकवून ठेवण्यासाठी व तसेच मानसिक, बौद्धिक आणि शाररीक क्षमतेत उत्क्रांती घडवून आणण्यासाठी प्रजोत्पादन

घडवून आणले. त्यासाठी त्यांच्या अनेकविध प्रजाती अंतर्गत भिन्न लिंगी आकर्षण निर्माण होईल अशी संरचना केली.

अगाध बुद्धिमत्तेच्या जोरावर विश्वाने हा सर्व खेळ उत्स्फूर्तपणे स्वत:हून मांडलेला असून हा खेळ कधीही संपुष्टात येऊ शकतो. तथापि याशिवाय या वैश्विक प्रयोगशाळेत जे असंख्य मानव निर्माण होत आहेत त्यांना उच्च अध्यात्मिक मार्गाने या खेळातून मुक्त करण्याचे व त्यायोगे स्वत्वाचा शोध घेण्याचे उद्दिष्ट विश्वाने निर्धारित केलेले असल्याचे दिसून येते. अनेक ऋषीमुनी, प्रेषित आणि संतमहात्मे यांचे या बंधमुक्ततेचे मार्गदर्शन साक्षात ग्रंथ रूपाने अस्तित्वात असूनही आजचा मानव समाज आपल्या जीवनाचे हे स्वस्वरुपानुभवाचे परम उद्दिष्ट हरवून बसला आहे.

याच विश्वाने त्याच्या बुद्धिमत्तेच्या पुढच्या टप्प्यावर सर्वोत्तम सात्विक गुणांचीसुद्धा उधळण केली. त्याचा परिणाम म्हणून याच मानवी समाजातून अनेक थोर संत, महात्मे, ऋषी, मुनी, योगी, उदात्त नेते व संवेदनशील असे शास्त्रज्ञ निर्माण झाले. त्यामुळे आदर्श व निरोगी समाज रचनेचा पाया रचला गेला. मानवाच्या मार्फत सुरु असलेल्या स्वत:च्या शोधासाठी विश्वाला अधिकाधिक सात्विकता आणि सर्जनशीलता हवी होती. मात्र त्यासाठी त्याला मानवी अवतारात सर्व भौतिक व मानसिक मर्यादांमध्ये राहून स्वत्वाचा शोध घ्यावयाचा असल्याने या वैश्विक प्रयोगशाळेत अनेक गोष्टींना तोंड द्यावे लागत आहे. तरीही परम सत्याचा शोध आणि त्यात स्वत:चे विलीनीकरण करून घेणे याबाबत विश्वाने संत, महात्मे, ऋषी, मुनी व योगी यांच्या माध्यमातून समाजाला वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे. विश्वाने विश्वाची ओळख त्यांच्याद्वारा करून घेतली आहे. परंतु हे निसर्गचक्र अजून थांबलेले नाही, त्याने अपरिमित अशी गती स्वत:हून धारण केली असल्याने विश्वाने पुन्हा या संत व महात्म्यांच्या रूपाने वारंवार ही धरती पुनीत केली आहे.

आता मानव जातीचा अध्यात्मावरील व विवेकाधिष्ठित जीवनप्रणालीवरील विश्वास कमी होऊन भौतिकवाद व चंगळवाद बळावला आहे. याला परिणामाला कलियुग असे आपण म्हणतो. विश्वाने पुन्हा उत्स्फूर्तता दाखविली आणि अतिबुद्धिमान शास्त्रज्ञांच्या रूपाने गेल्या शतकात पुन्हा ते भूतलावर प्रकट झाले. त्यांनी क्वांटम शास्त्राचा शोध लावला आणि अध्यात्मिक व विवेकाधिष्ठित जीवनप्रणालीला एक भक्कम असे वैज्ञानिक अधिष्ठान त्यामुळे प्राप्त होते आहे. संतश्रेष्ठ श्री

ज्ञानेश्वरमहाराजांनी त्यांच्या पसायदानात लिहिल्याप्रमाणे संपूर्ण मानवजात जोपर्यंत स्वधर्मरुपी सूर्याला पाहण्याची पात्रता स्वत:मध्ये निर्माण करत नाही, तो पर्यंत विश्व आपले परम उद्दिष्ट टिकवून ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न करत राहणारच आहे. या प्रयत्नाचाच एक भाग म्हणून ह्या पुस्तकाची निर्मिती आहे हे आपण येथे आपल्या सदसदविवेकबुद्धीच्या साक्षीने जाणून घेऊयात.

"यदा यदा ही धर्मस्य ग्लानिर्भवति भारत। अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥ परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ॥" प्रमाणे आता पुन्हा ईश्वरीय अवतार किंवा एखादा संत वा महात्मा वा ऋषीमुनी जे अखिल मानवजातीचे अध्यात्मिक उत्थापन घडवून आणू शकतील, अशा विभूतींचा अवतार प्रकट होणे दुरापास्त वाटते. याचे कारण असे कि कलियुगात मानवाचा त्याच्या स्वत:वरीलच विश्वास उडाला असून नि:स्वार्थपणे समोरच्या व्यक्तीवर वा त्याच्या वचनावर विश्वास ठेवण्याची सुबुध्दी त्याला होणे या कलियुगात अशक्य नाही पण फारच विरळा आहे. वेळप्रसंगी समाजात प्रचंड मोठी वैचारिक वा अध्यात्मिक क्रांती घडवून आणेल अशा दिव्य व्यक्तीला नीट जगूसुद्धा देणार नाहीत, हे आजपर्यंतच्या अनेक घटनांद्वारा येथील समाज व्यवस्थेनेच सिद्ध केलेले आहे. आता ज्याचा त्याने स्वत:चा वैयक्तिक मार्ग अवलंबिणे आणि आपल्या चैतन्यमयी मूळ स्वरूपात स्थिर होणे, अशीच या पृथ्वीवरील मानव समाजाची स्थिती निर्माण झाली आहे.

दुसरा एक महत्त्वपूर्ण विचार या मागे असा आहे की परमेश्वराच्या अवतरांनंतर ज्या अनेक ऋषी, मुनी व साधूसंतांनी पृथ्वीवर अवतार धारण केले त्यांनी सदसदविवेकबुद्धीची बीजे जनमानसात रुजविण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. ही सदसदविवेकबुद्धी जेव्हा मनामध्ये रुजते तेव्हा त्यातून साक्षात परमेश्वरी तत्वे विलसू लागतात. त्यामुळे जेव्हा धर्माला ग्लानी येईल आणि जेव्हा अधर्म माजेल तेव्हा ज्यांनी या सदसद्विवेकबुद्धीला तिच्या परमसीमेपर्यंत नेवून त्यांच्यामध्ये ईश्वरत्व प्रकट केले आहे ते सामान्य वाटणारे जनमानस धर्माचे पुनर्संस्थापन करतील असा मला विश्वास वाटतो. "विज्ञानाची संजीवनी व भक्तीचे पाणी साधनेच्या पत्रातून घालून साधुसंतांनी दिलेले सदसदविवेकबुद्धीचे बीज जनमानसात पुन्हा रुजावे" हे पुस्तक लिहिण्यामागचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

भौतिक पातळीवरून क्वांटम पातळीचे परीक्षण केले असता क्वांटम क्षेत्र हे आभासी असल्याचे दिसून येते आणि क्वांटम पातळीवरून भौतिक पातळीवर दृष्टीक्षेप टाकला असता भौतिकता ही एका स्वप्नाहून कमी मुळीच नाही असे दिसून येते. हीच अनिर्वचनियता या विश्वात भ्रांतीरुपी खोल दरी निर्माण करते. जे सत्य वाटते व जे वास्तव वाटते त्याचे अर्थानुबोधन होण्यासाठी मनोबुद्धीरूपी क्वांटम परिणाम निर्माण होणे अनिवार्य आहे. मात्र ह्या क्वांटम परिणामांना अवतरीत करणारे क्वांटम क्षेत्र स्वत: अदृश्य व अमूर्त असा केवळ क्षमताधिष्ठित शक्याशक्यतांचा उर्जा तरंग असून आभासी सत्यतेपेक्षा कमी मुळीच नाही. अशा या वास्तव व आभासी सत्यतांच्या दरीत आंदोलित होणारे जीव त्यांचे भ्रांत जीवन युगानुयुगे अनुसरतात असे दिसून येते आहे. या दोन्ही सत्यतांना प्रकाशित करणारे परम तत्व हे चैतन्य तत्व असून ते या दोनही सत्यतांच्या पलीकडे आहे. हे चैतन्य तत्व त्यांना प्रकाशित करत असून सजीवांमध्ये साक्षीभावाने विलसत आहे. या चैतन्य तत्वाला वेदांतात परब्रह्म वा परमात्मा असे संबोधले गेले आहे.

पंचमहाभूते आणि त्यांच्या सर्व स्थूल-सूक्ष्म अवस्था तसेच त्यांच्यामध्ये होणारे सर्व प्रकारचे उर्जास्थित्यंतर, त्यातून निर्माण होणारी कार्यकारणभावाची शृंखला, अहंभाव, भावभावना, इच्छा, वासना, अपेक्षा, महत्वाकांक्षा, त्रिगुण, षड्रिपू, गुणावगुण, वृत्ती-प्रवृत्ती इत्यादी यांच्याशी “आपण स्वत: चैतन्य” म्हणून आपला संबंध नाही हे क्वांटम शास्त्र आपल्याला प्रकर्षाने दाखवून देते. वेदांनी आणि उपनिषदांनीहि हेच कंठारवाने सांगितले आहे. मात्र भौतिक पातळीवर त्यांचा आपल्याशी संबंध आहे, हे जे आपल्याला प्रकर्षाने जाणवते ती आपली भ्रांती होय. आपले शरीर म्हणजे आपण नाही तसेच मनाने निर्मिलेला “मी-पणा” वा “अहं” हे आपले मूळ स्वरूप नसून, विश्वव्यापक चैतन्य आपले मूळ स्वरूप आहे. या विश्वव्यापक चैतन्याचे जीवस्वरूप कूटस्थ “मी” असून त्याच्या परमोच्च संवेदनांच्या आधारे आपल्याला आपल्या मूळ स्वस्वरूपात म्हणजेच चैतन्यात विलीन व्हावयाचे आहे. हेच एकमेव जीवन उद्दिष्ट विश्वाने आपल्यासमोर ठेवले आहे. हेच जीवन-उद्दिष्ट वेदांनी आणि क्वांटम शास्त्राने अधोरेखित केलेले आहे. विश्वाने मानवामार्फत स्वत:चा शोध घेण्याचे जे असंख्य प्रयत्न केले त्यातूनच हे अध्यात्म शास्त्र आणि त्याचे अधिष्ठान म्हणून आता क्वांटम शास्त्र निर्माण झाले, हे स्वयंस्पष्ट आहे असे दिसून येते.

२ क्वांटम शास्त्रीयदृष्ट्या साधनेचे महत्व

मनरूपी क्वांटम क्षेत्रातील विविध क्वांटम परिणाम जसे मानवाला या मायेमध्ये अडकवून ठेवण्यास जबाबदार ठरतात, तसेच ते या मानवाला बंधमुक्ततेच्या दिशेने घेऊन जाण्यासही खूप मोठी भूमिका बजावतात असे दिसून येते. मनाने त्याच्या सर्वोच्च पातळीवर जाऊन जीवनाच्या उद्दिष्टाबाबत गंभीरपणे विचार केल्यास आणि विवेक धारण करून चिकाटीने साधना केल्यास त्या साधकाच्या मनामध्ये निर्माण होणारे क्वांटम परिणाम अद्वैतता, श्रध्दा व भक्ती या मार्गावर त्या साधकाला टिकून राहण्यास सहाय्यकारी ठरतात. क्वांटम झेनो परिणामांसारखे क्वांटम परिणाम मनाला विश्वाच्या सर्व परिणामांपासून अलिप्त, तटस्थ व उदासीन करतात. मनामध्ये वैराग्य आणि निरंकारत्व निर्माण करतात. साधकाला शून्यावस्थेत संक्रमित करतात आणि मुक्तीच्या उंबरठ्यावर सोडून माघारी फिरतात. पुढे साधक त्या परम सत्यतेत विलीन होतो, त्या चैतन्यरुपी परम तत्वात त्या परम तत्वाचा दिव्यानुभव म्हणून चिरंतन अस्तित्व तो साधक प्राप्त करतो. श्री गौतम बुद्धांनी अनापना आणि विपश्यना याद्वारे तर अनेक ऋषीमुनी यांनी अष्टांग योगाद्वारे हे क्वांटम झेनो परिणाम शरीर व मनामध्ये अवतरीत केले आणि बंधमुक्तता जनसामान्यांच्या आवाक्यात आणून दिली.

मनामध्ये सतत स्फुरत राहणारे विचार हा क्वांटम सुपरपोझिशनचा (Quantum Superposition) परिणाम आहे. विचार हा क्वांटम उर्जारुपी मन:शक्तीचा अविष्कार आहे. या विश्वाचे निरीक्षण व विचारांचे निरीक्षण ही क्वांटम मोजमाप (Quantum Measurement) प्रक्रिया आहे. या निरीक्षणातून मनामध्ये क्षोभ म्हणजे काही आंदोलने निर्माण होतात. याला क्वांटम क्षोभ (Perturbation within the Quantum Field) असे म्हटले जाते. या आंदोलनांना मनाकडून अंतर्गत प्रतिसाद दिला जातो. याला क्वांटम प्रतिसाद (Response within the Quantum Field) असे म्हटले जाते. या सर्व चक्रीय क्वांटम परिणामांमुळे निर्माण झालेल्या

अनुभवांचे, विचारांचे, वृत्तींचे, इच्छांचे, वासनांचे, आकांक्षांचे, महत्वाकांक्षांचे आणि षड्रिपूंचे अहंशी क्वांटम अनुबंध निर्माण होतात. त्यातून भौतिक पातळीवर जी नाती निर्माण होतात ती नाती जीवांमध्ये ऋणानुबंध निर्माण करतात. मनरूपी क्वांटम क्षेत्रात घडून येणाऱ्या या सर्व घटनांना क्वांटम एनटँगलमेंट (Quantum Entanglement) परिणाम असे संबोधले जाते.

त्यानुसार अहं-ला विश्वाच्या त्या परिस्थितीचे अर्थबोधन होऊन विश्वाचे सापेक्ष ज्ञान प्राप्त होते. अर्थानुबोधाच्या या क्वांटम प्रक्रियेला मध्यावधी क्वांटम कोलेप्स परिणाम (Intermediate Quantum Collapse Effect) संबोधले जाते. याला नेहमीच्या भाषेत आपण "डोक्यात प्रकाश पडणे" असे म्हणतो. त्यानंतर "अहं"कडून काही निर्णय घेतले जातात आणि त्यानुसार भौतिक पातळीवर त्याच्याकडून शरीर, मन व बुद्धीच्या सहाय्याने स्थूल पातळीवर प्रयत्न केले जातात. याला मनाची क्वांटम डीकोहेजन अवस्था (Quantum Decohesion State) असे म्हटले जाते. जे अपेक्षिले आहे त्याच्या प्राप्तीसाठी विविध क्रिया घडून येतात, आणि कर्त्याला त्याचे इच्छित स्थूल भौतिक अनुभवांच्या माध्यमातून प्राप्त झाल्याचा आभास निर्माण होतो. याला क्वांटम मूर्त अवस्था (Quantum Collapse) असे शास्त्रज्ञ मानतात. अशा रीतीने ही क्वांटम उर्जा विश्वात सतत विविध परिणाम निर्माण करत तिच्या स्थूल व सूक्ष्म स्वरुपात संक्रमित होते आहे. क्वांटम उर्जेच्या या स्थित्यंतरामधून कार्यकारणभावाची शृंखला निर्माण होत असून त्यानुसार हे विश्व त्यामुळे आपोआप कार्यान्वित झाल्याचे दिसून येते आहे. ही उर्जा चंचल असून साधकाच्या मनात अनिश्चितता निर्माण करते. ही अनिश्चितता चक्रीय पद्धतीने प्रकट होते. संवेदना, विचार, मोजमाप, क्षोभ, प्रतिसाद, कार्य, संवेदना, विचार ही ती अनिश्चिततेची चक्रीय गती होय.

या उर्जा संक्रामकतेच्या कार्यकारणभावातून सत्व, रज आणि तम हे त्रिगुण सजीवांच्या जाणीवकक्षेत निर्माण झाले. हे तीनही गुण कमी अधिक प्रमाणात सर्वच प्राणीमात्रांमध्ये आढळून येतात. रज आणि तम गुण विश्वाच्या आभासी सत्यतेला झाकोळून टाकतात आणि भौतिक सत्यतेला परम सत्यता मानून जीवाला भ्रांतमय जीवन जगण्यास प्रवृत्त करतात. याउलट सत्व गुण विश्वाच्या आभासी सत्यतेला आणि त्याच्या सापेक्ष असलेल्या भौतिक वास्तवतेला स्वत:समोर प्रकट करतो. सत्व गुण उच्च

विवेक निर्माण करतो आणि या आभासी सत्यतेच्या आणि वास्तव सत्यतेच्या खोल भ्रांतमय दरीवर सत्कार्माचा आणि सद्सदविवेकाचा सेतू बांधण्यास अहं-ला मदत करतो. अहं-ला त्याच्या ब्रह्म स्वरूपाच्या साक्षात अनुभवाकडे घेऊन जाण्यास साधकामधील अमर्याद असा हा सत्वगुण सहाय्यकारी होतो.

शरीराच्यामार्फत आपण विश्वाकडे पाहणे, विश्वाची जी उर्जास्पंदने संवेदनारूपाने मेंदूकडे संक्रमित होतात त्यानुसार त्यांचे मोजमाप घेणे, त्यावरून विचार निर्मिती होणे, विचारांचे मनाच्या अंतर्गत निरीक्षण होणे, क्षोभ निर्माण होणे आणि त्याला प्रतिसाद दिला जाणे या सर्व चक्रीय क्रिया क्वांटम शास्त्राच्या माध्यमातून आपण आता समजून घेऊ शकतो. या सर्व अस्थिर मनाच्या चक्रीय क्रिया सर्वच संतांना ठाऊक होत्या. या मनरूपी क्वांटम उर्जेने जर विवेकरूपाने स्वत:ला स्वत:समोर सादर केले आणि जर त्यायोगे रज व तम गुणांमध्ये व्यय होणारी ही क्वांटम उर्जा तिच्या सात्विकतेमध्ये संपूर्णपणे रुपांतरीत झाली, तर त्या मनोनिर्मित अहंभावाला बंधमुक्ततेकडे वाटचाल करणे सोपे होईल. म्हणून साधकाच्या मनावर सकारात्मक आघात करणारे दोहे, भजने इत्यादी साहित्य साधुसंतांकडून निर्माण झाले. उर्जेचे हे मायावी क्वांटम स्वरूप संत कबीरांसारख्या संतांनी जाणले आणि या क्वांटम उर्जेचे संपूर्ण नियंत्रण साधकामध्ये प्रस्थापित करण्यासाठी आणि या उर्जेला तिच्या निर्गुण अवस्थेत स्थिर करण्यासाठी त्यांनी साधकाला मार्गदर्शन केले. त्यांची निर्गुण भजने समजून घेताना आपल्या मनामध्ये वरील सर्व क्वांटम परिणाम निर्माण होतात. परंतु त्यांची परिणीती ही त्या मनावर नियंत्रण प्रस्थापित करण्यामध्ये होते, मायेच्या प्रभावातून बाहेर पाडण्यात होते व अशा या दिव्य क्वांटम परिणामांतून सात्विक गुणांची जोपासना होते, हे निश्चित आहे.

संत श्री कबीर दास यांच्या रूपाने हे विश्व उत्स्फूर्तपणे स्वयंभू साकार झाले. संत श्री कबीर दास हा मनरूपी क्वांटम उर्जापुंज इतका उच्च कोटीचा सात्विक गुणसंपन्न होता कि त्यांच्या सानिध्यात येणारे इतर सर्व रजोगुण आणि तमोगुण निरस्त व निष्प्रभ होऊन जात. रजोगुण आणि तमोगुण यामध्ये गुंतून राहिलेली उर्जा त्यांच्या सानिध्यात रुपांतरीत होऊन ती सात्विकतेत परावर्तीत होत असे. इतका हा संत श्री कबीररुपी जाज्वल्य उर्जापुंज विश्वातून साकार झाला. अखिल विश्वाने त्याच्यातील सर्व सात्विकता एकवटून तिचे मूर्त स्वरूप साकार करण्यासाठी संत श्री कबीरदास व इतर सर्व महान साधू संतांच्या जीवनाच्या माध्यमातून स्वत:ला प्रकट केले. साधकाला याच सर्वोच्च अध्यात्मिक पातळीवर जाऊन बंधमुक्त होण्यासाठी विश्वाच्या

या सर्वोच्च स्पंदनाने त्याच्या साहित्यनिर्मितीतून अखिल मानव जातीस मार्गदर्शन केले. संत श्री कबीरदास यांच्या सत्वयुक्त क्वांटम परिणामरुपी विचारांचे स्थूल भौतिक मूर्त स्वरूप म्हणजे त्यांचे साहित्य होय. त्यापैकी काही निवडक अभंग घेऊन साधनमार्गाचे विवेचन पुढे केले आहे.

माया महा ठगनी हम जानी

माया महा ठगनी हम जानी

माया म्हणजे अनेक वस्तू विषय ज्यामुळे मन त्यामध्ये अडकून रहाते व परम आनंद मिळू शकत नाही. मन सहज त्या मायेकडे आकर्षित होते म्हणून मायेला ठगनी किंवा मनमोहिनी म्हटले आहे. त्यातून शेवटी अशांती, न संपणारी तृष्णा व अपेक्षाभंगाचे दु:ख होत असल्याने ती आभासी ठरते. माया कितीही आकर्षक असली तरी आपल्या चिरंतन चैतन्यस्वरूपापासून आपल्याला भ्रमिष्ट करून ती वेगळे पाडते. या आभासी लक्षणाने तिला संत श्री गुरु कबीर दास यांनी ठगनी असे म्हटले आहे. हे तिचे स्वरूप ते स्वत: जाणून आहेत व त्याप्रमाणे साधने दरम्यान ते साधकाला सतर्क राहण्याचा सल्ला देत आहेत.

आपल्या इच्छा व वासनांच्या पूर्तीमधून आपल्याला आनंद व समाधान होत असेल तर ती आपली सपशेल भ्रांती ठरते. कारण कोणत्याही स्थूल वस्तू, विषयामध्ये आनंद निर्माण करण्याची क्षमता नाही. हा आनंद किंवा सुख निर्माण झाल्याचा आभास होण्याचे कारण आपले चैतन्य आहे. जेव्हा प्रयत्न करून इच्छा वा वासनांची पूर्तता होते तेव्हा जीवाला त्या अभासातून ग्लानी येते. “अहं”सह मन व बुद्धी यांच्यामधील अनेक क्वांटम परिणाम एका क्षणापुरते त्या ग्लानीत लुप्त होऊन जातात. त्या क्षणाला चैतन्याच्या परम संवेदनांचा स्पर्श मनाला होतो. पुढच्या क्षणाला अहं त्या संवेदनांनी सुखावलेला असतो. परंतु त्याला हा सुखाचा उद्गम कळून आलेला नसल्याने त्या सुखाचे कारण तो इच्छापूर्ती वा वासनापूर्तीमध्ये मानतो. क्वांटम परिणामांचे हे मायावी स्वरूप साधकाला सपशेल फसविते. आणि म्हणून संत श्री कबीरदास येथे “माया महा ठगनी...” असे म्हणतात.

तिरगुन फांस लिये कर डोले बोले मधुरी बानी

माया त्रिगुणांनी युक्त अशी आहे. सत्व, रज व तम हे ते तीन त्रिगुण आहेत, जे साधकाला बाधित करण्याची व त्यांचे बंदी करून ठेवण्याची क्षमता राखून असतात. या तिन्ही गुणांनी युक्त असलेली व्यक्ती मायेच्या आधीन असते व मधुर वाणीने साधकाला भुरळ घालते. साधकाने हे तीन फासे त्याच्यावर पडू नयेत म्हणून सतत सतर्क राहण्याचा सल्ला ते देतात.

या विश्वात जे जे काही आहे ते ते सर्व साधकाला या न त्या कारणाने बाधित करण्याची क्षमता राखून असते. तीन गुणांचे असे बेमालूम संमिश्रण असलेल्या विविध संवेदना व अनुभव साधकाला सतत मोहित करत असतात.

ज्यावेळेस विश्वाच्या संवेदना शरीर व मनामधून संक्रमित होतात तेव्हा हे तीन गुण धारण केलेले क्वांटम उर्जा तरंग कमी अधिक प्रमाणात मन व मेंदू यांच्या संयुक्त प्रणालीमध्ये आंदोलित होतात. त्यातून मन स्वत: त्या अनुभवाप्रमाणे गुणवैशिष्ट्ये धारण करते आणि अहं त्या मनाचे अंतर्गत निरीक्षण करतो. या द्वंद्वात्मक निरीक्षणामुळे खूप मोठी क्वांटम आंदोलने निर्माण होतात व त्यातून मनामध्ये विविध भाव निर्माण होतात. तीन गुणांच्या कमी जास्त प्रमाणावर आधारीत या भावांचे सहा प्रमुख विभागात वर्गीकरण केले आहे, जसे काम, क्रोध, मद, मोह, मत्सर, लोभ हे होत. जर मोहरुपी भाव उत्पन्न झाला तर अहं त्या मोहामुळे स्वसंमोहित होतो आणि मनाच्या क्वांटम सुपरपोझिशनरुपी खूप मोठ्या उर्जातरंगाच्या आंदोलनाला तो अहं त्याक्षणी बळी पडतो. त्या "अहं" ची सदसदविवेकबुद्धी त्या भ्रांत अवस्थेत भ्रष्ट होते. या सर्व क्रिया चैतन्याच्या परम प्रकाशात घडून येत असतात, पण त्याची जराशीसुद्धा जाणीव द्वंद्वात अडकलेल्या अहं ला होत नाही. असा हा क्वांटम परिणामरुपी फासा मन स्वत: निर्माण करते आणि स्वत:च त्यामध्ये अडकून पडते. विश्वाच्या या आभासी सत्यतेतून हाती काहीही न लागल्याने त्या भ्रांतीसमोर शेवटी ते मन विवश होते आणि कधीही न संपणाऱ्या तृष्णेने व्याकुळ होते.

केसव के कमला वे बैठी शिव कि भवन भवानी

ईश्वर हे निव्वळ सत्वयुक्त उर्जेचे स्वरूप असून त्यामध्ये चैतन्याच्या परम संक्रमित झाल्याने त्या उर्जेने ईश्वरीय स्वरूप धारण केलेले आहे. वेदांत असे सांगतात कि ईश्वर आणि परब्रह्म यात फरक आहे. तो या सत्वयुक्त क्वांटम ऊर्जेमुळे घडून येतो. ही विश्वाची स्वसंवेद्य अशी रचना आहे. ब्रह्माशी संग करून माया तिच्या अतिशुद्ध स्वरूपात विष्णुपदाजवळ लक्ष्मीरूपाने व शिवाजवळ भवानी रूपाने नांदत असते. ज्यामुळे विष्णुलीला व शिवलीला निर्माण झाल्या. तथापि केवळ अंतिम परब्रह्मस्वरूप चैतन्याचा विचार करता व परम उर्जातत्वाने स्वत: तिच्यातील अपरिमित अशा क्षमतांच्या (मायेच्या) सहाय्याने लक्ष्मीरूप व भवानीरूप धारण केलेले असल्याने अतिशय सत्वगुणयुक्त मायेचे वर्णन त्यांनी येथे याप्रमाणे केले आहे.

पंडा के मुरत वे बैठी तीरथ मे भई पानी

देवळांमध्ये मूर्तीरूपाने व तीर्थाच्या ठिकाणी जलतीर्थ स्वरूपाने ही माया साकार झाली आहे. सतत मोहित होणाऱ्या मनाला एकाग्र करण्यासाठी पंडीत मूर्तीची प्रतिष्ठापना करतात. मन त्या मूर्तीवर मोहित होऊन स्थिर होते ही मायेचीच करणी आहे.

आपण पाहिले कि माया म्हणजेच क्वांटम उर्जा तरंगांमधील अपरिमित अशा अमूर्त क्षमतांचा मूर्त अविष्कार होय. मूर्तीकडे पाहिल्यावर मन तसाच आकार धारण करते. आपण ज्यावेळेस डोळयांच्या माध्यमातून मूर्तीकडे पाहतो तेव्हा ते फोटोन्स मेंदू व मन यांच्या प्रणालीमध्ये प्रवेश करतात. मूर्तीचे सौंदर्य आणि भाव मन स्वत: धारण करते आणि अहं या देखाव्याचे मनाच्या अंतर्गत निरीक्षण करतो. पुन्हा क्षोभाची आंदोलने आणि प्रतिसादाची आंदोलने निर्माण होतात आणि तेथे सात्विक भाव निर्माण होतो. त्या भावात मन संमोहित होते आणि क्षणभर भौतिक किंवा ऐहिक जीवनाचा त्याला विसर पडतो. मनाला याचीच सवय होते. ते कर्मकांडात अडकते आणि स्वस्वरुपानुभवापासून दूर जाते. साधकाच्या बाबतीत हे असे होऊ नये यासाठी या ओळी येथे संत श्री कबीर दास यांनी लिहिल्या आहेत.

तीर्थाच्या ठिकाणी लोक पवित्र स्नान करतात व जलतीर्थ प्राशन करतात ह्या गोष्टी जे सात्विक भाव क्वांटम परिणामांच्या रूपाने मनामध्ये निर्माण करतात ते भाव मन:शुद्धीसाठी आवश्यक वाटत असले, तरी प्रत्यक्ष चैतन्याची अनुभूती येण्यासाठी ते अनावश्यक आहेत. त्यात गुंतून ठेवण्याची त्यांच्यामध्ये क्षमता असल्याने मूर्ती व जलतीर्थ यांना मायेचेच स्वरूप असल्याचे संत श्री गुरु कबीरदास येथे साधकाला निक्षुन सांगतात. या मनरुपी क्वांटम क्षेत्रामध्ये किती नाती, किती घटना, किती प्रसंग, किती वस्तू आणि किती विषय त्यांचे ऋणानुबंध निर्माण करत असतात. कशामुळे निर्माण होतात हे ऋणानुबंध? त्यामागे हाच Quantum Entanglement परिणाम आहे. हे अनुबंध जनसामान्यांना मायेत गुंतवून ठेवतात तर साधकाला हे सर्व अनुबंध ध्यानामध्ये घडून येणाऱ्या क्वांटम झेनो (Quantum Zeno) परिणामरुपी शस्त्राने तोडून टाकावे लागतात.

योगी के योगिन वे बैठी राजा के घर रानी

योग्याच्या जवळ योगिनी रूपाने माया वावरते आणि राजाच्या घरी राणी म्हणून वावरते. तथापि येथे दोन्ही ठिकाणी संसार संग निर्माण होत असल्याने योगी व राजा दोघेही मायेमध्ये अडकतात, कारण संसार हे मायेचेच स्वरूप आहे. येथे राजा-राणी हे

रूपक गृहस्थाश्रमात रमणाऱ्या पतीपत्नींसाठी वापरले आहे. येथे राणी अथवा योगिनी यांच्यातील स्त्रीत्वाला दोष दिला नसून त्यांचा संग संसार निर्माण करतो व मनाला त्यात अडकून पडावे लागते असे सूचित केले आहे.

विश्वातील पदार्थ आणि वस्तू यांच्या संवेदना मनामध्ये संक्रमित झाल्यावर जसे विविध भाव तेथे निर्माण होत असतात तसे विश्वातील विविध विषय मनामध्ये प्रकट झाले तरीसुद्धा त्यामुळे तेथे भाव निर्माण होतात. त्यातून द्वंद्व निर्माण होते आणि विविध क्षमतांना मूर्त स्वरूप देण्याची वृत्ती बळावते. आपल्या समवेत जे सजीव असतात त्यांच्या संपर्कातून विषयांची आपोआप निर्मिती होते. विषय म्हणजे अनेक क्षमतांचे बीज होय. मनाच्या अंतर्गत अहं कडून जे क्वांटम निरीक्षण होत असते, आणि मनामध्ये असंख्य क्षमता मूर्त स्वरूप धारण करण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपतात. याला क्वांटम डिकोहेजन स्थिती म्हणतात. साधकाला कायम अस्थिर, उतावीळ व अस्वस्थ करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये असते ज्यातून काही द्वंद्वात्मक कर्मे घडून येतात आणि साधक त्यात अडकून राहतो.

काहु के हिरा वे बैठी काहू के कौडी कानी

काही जणांना सोने, चांदी, हिरे, माणके इत्यादी मौल्यवान व मनाला आकर्षित करणाऱ्या वस्तूंचा व विषयांचा मोह असतो, तर काही लोकांसाठी त्यांच्याकडील तुटका-फुटका संसारसुद्धा त्यांच्यामध्ये कमालीची आसक्ती निर्माण करतो. हा मोह व आसक्ती ही दोन्ही मायेचीच रूपे असल्याने साधकाला अत्यंत बाधक असल्याचे येथे सूचित केले आहे. आपल्या संपर्कात असलेल्या वस्तूंची गुणवैशिष्ट्ये जेव्हा आपल्या पंचेंद्रियांमार्फत मेंदू व मन यांच्या संयुक्त

प्रणालीपर्यंत पोहोचतात, तेव्हा हे गुणवैशिष्ट्यांचे क्वांटोन्स मनामधील क्वांटम बल क्षेत्रात चक्रीय संवेग धारण करतात. मोजमाप-क्षोभ-प्रतिसाद या चक्रीय क्वांटम परिणामांतून मोह व आसक्ती यांची निर्मिती होऊन अहं त्यामुळे संमोहित होऊन जातो. येथे मोह व आसक्ती यांच्या प्रकटीकरणाने ही निर्गुण क्वांटम उर्जा सगुण स्वरूप धारण करते असे वाटते पण ते तसे होत नाही. क्वांटम परिणामांचा प्रकाशाच्या वेगाहून अधिक असलेला वेग आणि मनाच्या सुक्ष्मातीसुक्ष्म कार्याबद्दल जीवाला असलेले अज्ञान यामुळे जीवाला तो एक भास होतो की "मला मोह झाला अन मी त्याला बळी पडलो." वस्तूंची व संपत्तीची प्राप्ती व त्यांचे आसक्तीयुक्त जतन हेच तो जीव जीवनाचे उद्दिष्ट समजतो. हे सर्व साधकाने समजून घ्यावे आणि साधक त्याच्या परम उद्दिष्टापासून पदच्युत होऊ नये यासाठी हे प्रातिनिधिक उदाहरण संत श्री कबीर दास यांनी येथे दिले आहे.

भगतन के भगतीन वे बैठी ब्रह्माकी ब्रह्माणी
भक्ताच्या भक्तीमध्येसुद्धा ती ब्रह्म म्हणून असते. याचा अर्थ भक्त भक्ती करत असताना त्याच्या मनाच्या माध्यमातून भक्ती करत असतो. परंतु मन हे प्राकृतिक असल्याने त्याला ब्रह्म गृहीत धरून भक्ती करावी लागते. अशा प्रकारे त्या भक्ताची भक्ती जोपर्यंत (तो स्वत: आणि ते परम तत्व) द्वय निर्माण करून केली जाते आहे, तोपर्यंत तेथे माया द्वंद्वभावाने आढळून येते.

मायावी क्वांटम परिणाम घडून येण्यासाठी द्वंद्व निर्माण होणे आवश्यक असते. श्री ज्ञानेश्वर माउलींनी चांगदेवपासष्ठीमध्ये अनुभावक आणि अनुभाव्य, दर्शक आणि दृश्य, ज्ञाता आणि ज्ञेय याप्रमाणे द्वंद्वे नमूद केली असून त्याप्रमाणे भक्त आणि आराध्य हे द्वंद्व मनामध्ये अहंभाव निर्माण करतात. आराध्याची अनेक प्रकारे भक्ती करण्यात व्यक्ती गुंतून जाते. हे अवास्तव द्वंद्वात्मक कर्मकांड साधकाच्या साधनेला बाधक ठरते. संत श्री कबीरदास हे किती सूक्ष्म विचार करून साधकाला सावध करत आहेत हे याठिकाणी दिसून येते.

कहे कबीर सुनो भाई साधो यह सब अकथ कहानी
आता शेवटी संत श्री गुरु कबीरदास येथे खूप वेगळ्या पद्धतीने साधकाला मायेचे आभासी स्वरूप सुस्पष्ट करून सांगतात. अवघे विश्व मायेत आकंठ बुडालेले असल्याने व माया स्वत:च स्वत:शी अंग-संग झाल्याने, मायेचे हे स्वरूप सहजासहजी कोणाच्या लक्षात येत नाही आणि ते कोणाकडून सांगितलेहि जात नाही. असंख्य जीवांच्या रूपाने व असंख्य वस्तूविषयांच्या रूपाने उर्जा स्वत: तिच्यातील क्षमता वापरून त्यांच्यातून संक्रमित होत असते आणि स्वत:मध्ये सतत बदल घडवून आणीत घेत असते. त्यामुळे या उर्जेच्या परिणामांतून बाहेर येऊन तिची ही कहाणी सांगणारे कोणीही नसल्याने तिची ही कहाणी अकथित राहून जाते.

परंतु साधक जेव्हा तथाकथित मायेमधून मुक्त होऊन ब्रह्मपद प्राप्त करेल, तेव्हा ती माया अशी अदृश्य झालेली असेल कि हे मायेचे सर्व वर्णनचमुळी एक “अकथित कहाणी” आहे असे त्या साधकाला वाटेल. ज्यावेळेस साधक भौतिक वास्तव सत्यतेच्या आणि क्वांटम आभासी सत्यतेच्या पलीकडे जाईल तेव्हा तेथे त्याला हे विश्व स्वप्नवत असल्याचे व कधीच प्रकट झाले नसल्याचा अवर्णनीय असा अनुभव येईल. या अनुभवाचे कथन तो करू शकणार नाही आणि त्यामुळे उर्जेचे निर्गुण स्वरूप हे अकथित राहून जाईल.

म्हणून या आभासी व भ्रांती निर्माण करणाऱ्या मायेपासून सतत सावध राहण्याचा सल्ला संत श्री गुरु कबीरदास साधकाला देत आहेत. यावरून असे सहज सिद्ध होते कि संत श्री गुरु कबीरदास हे सदा मुक्त व ब्रह्मरूप होते, आणि केवळ मानवजातीच्या कल्याणासाठी त्यांनी मानवरुपात त्यांचे स्वत्व सादर केले होते.

पंडीत श्री कुमार गंधर्व यांनी हे भजन म्हटले आहे. या भजनाचा अर्थ नेमका हृदयापर्यंत पोहोचावा म्हणून इतक्या विविधतेने त्यांनी गाण्यातील जागा निश्चित करून घेतल्या आहेत कि ऐकणाऱ्याला खाली दिलेल्या अर्थापेक्षा अधिक अर्थ (शब्दातीत) केवळ ऐकण्यानेच समजतो. गाण्याची लय ऐकणाऱ्या व्यक्तीमध्ये सहजता निर्माण करते ज्यामुळे अगदी नकळत मायेच्या पाशापासून तो त्या वेळेपुरता तरी अलग होऊन जातो, आणि तोच तो एक क्षण पकडला गेला तर चैतन्याचा थेट स्पर्श

मनाला झाल्याने येणाऱ्या आनंदाश्रूंनी संत श्री गुरु कबीर दास यांच्या चरणी निश्चितच अभिषेक होईल.

कौन ठगवा नगरिया लूटल हो

कौन ठगवा नगरिया लूटल हो
कौन ठगवा नगरिया लूटल हो ||

येथे नगराची उपमा शरीराला दिली आहे. "ठगवा" हा शब्द "न सांगता चोरपावलाने येणाऱ्या मृत्यूसाठी" वापरला आहे. हा केवळ शाररीकच मृत्यू असा अर्थ घेऊन चालणार नाही. तर गाफील राहिलेल्या साधकाच्या सदसदविवेकबुद्धीला लुटणाऱ्या मायेसाठी "ठगवा" हा शब्द वापरला गेला आहे असेही आपल्याला म्हणता येईल, कारण मायेच्या आधीन असलेली व्यक्ती मृत्यूला सत्य मानतेच त्यामुळे मृत्यू अस्तित्वात नसूनही मृत्यूचे भय त्या मायाधीन व्यक्तीस असतेच. या भयापोटी ती मायेच्या आधारे कितीही मृत्यूस चुकवीत राहिली तरी तो मृत्यू त्या मायेच्या रूपानेच त्या व्यक्तीला गाठतो.

चंदन काट के बनल खटोला,

तापर दुलहिन सूतल हो ||



चंदनाच्या लाकडापासून पलंग तयार झालेला आहे. याचा अर्थ आपले शरीर. शरीराला चंदनाची उपमा दिली आहे कारण साधकाने त्याचा देह जगत कल्याणासाठी चंदनासारखा झिजवून त्यातून सुगंधरूपी अद्वैत आनंद व निरंकारत्व साधायचे आहे. आता या चंदनरुपी देहात जो आत्मा आहे त्याला नववधूची उपमा दिली आहे. झोप हे अज्ञानाचे लक्षण आहे. ती एक अज्ञानरूप ग्लानी आहे. आत्म्याचे स्वस्वरूपाबद्दलचे अज्ञान म्हणजेच त्याची भ्रांतमय निद्रा. या अज्ञानवश ग्लानीतून साधकाने उठावे यासाठी कठोपनिषदात "उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य

वरान्न बोधत...” हा श्लोक आला आहे. ती आत्मारुपी नववधू या पलंगरुपी शरीरामध्ये अज्ञानवशात ते स्वत:चे समजून त्यावर निजते असे रूपक येथे संत श्री कबीरदास यांनी सादर केल्याचे दिसून येते.

उठो सखीरी मांग सवारौ,
दुलहा मोसे रुठल हो ||

आता या झोपी गेलेल्या नववधूला तिची सखी उठवीत आहे आणि त्या नववधूला तिची सखी म्हणते आहे कि “अग सखी ऊठ साजशृंगार कर नाहीतर नवरदेव माझ्यावर रागावतील.” आता यात ही नववधूची सखी कोण? ही सखी आत्म्याची किंवा आत्मारुपी नववधूची सखी आहे. आत्म्याची सखी म्हणजे सत्वगुणयुक्त सदसदविवेकबुद्धी होय, जी ते परमतत्व जाणते. ती सदसदविवेकबुद्धी परमात्म्याचा निरोप आत्म्याला देत आहे. या निरोपाचे काही फलित झाले नाही तर तो परमात्मा त्या सदसदविवेकबुद्धीवर नाराज होणार आहे, कारण अज्ञानवश मृत्यूनंतर पुन: जन्म आणि मायेच्या प्रभावाखाली आत्म्याला किंवा आत्मारुपी नववधूला यावे लागणार आहे.

सत्वगुणयुक्त सदसदविवेकबुद्धी व संतांचे मार्गदर्शन आत्म्याला जागृत करत असते आणि सतत सांगत असते कि तू या शरीरामार्फत मायेमध्ये गुंतू नकोस कारण येथे सर्व फसवणूक आहे परम सत्य असे काहीच नाही. सत्वगुणयुक्त सदसदविवेकबुद्धी ही परमात्म्याला जाणत असल्याने ती हे सुद्धा जाणून आहे कि या आत्म्याचे निजधाम हे परमात्मा आहे व त्याप्रमाणे हा परमात्मा त्या आत्मारुपी नववधूचा पती आहे. म्हणून ती सदसदविवेकबुद्धी तिच्या सखीला म्हणते, “त्या पतीला जर असे कळले कि तू अजूनही त्या मायावी शरीरात अज्ञानवश झोपलेली आहेस तर तो परमात्मारुपी नवरदेव माझ्यावर नाराज होईल.” “मांग सावारो” म्हणजे “साजशृंगार कर” याचा शब्दश: अर्थ न घेता, याचा अर्थ त्या आत्म्याने त्या सत्वगुणयुक्त सदसदविवेकबुद्धीच्या आधारे अद्वैतभाव, ध्यानधारणा, शुचित्व, समाधी, निरांकारत्व, योग आणि बंधमुक्ती हे साधनस्वरूप दागिने ल्यायावयाचे आहेत जे त्या आत्म्याला परमात्म्याशी एकरूप होण्याचे साधन होणार आहेत.

संवेदना, अनुभव, प्राप्त झाल्यानंतर ज्ञान आणि तत्व याप्रमाणे मनामधील क्वांटम परिणाम बुद्धीचा अविष्कार घडवून आणतात. मनामधील प्रत्येक क्षमता व माहितीचे जितके खोलवर जाऊन सूक्ष्म निरीक्षण होईल तितके बुद्धी तीक्ष्ण होत जाईल. बुद्धीचा अविष्कार हा क्वांटम परिणाम आहे. मोजमाप-क्षोभ-प्रतिसाद ही क्वांटमक्षेत्ररुपी मनाची चक्रीय क्रिया जितक्या सूक्ष्म पातळीपर्यंत जाऊ शकते त्या मनाच्या क्षमतेला बुद्धी असे म्हणता येईल. मनामधील क्षमताविस्ताराची त्याची जी अवस्था आहे ती बुद्धी होय. मनाची ही वैशिष्ट्यपूर्ण क्वांटम अवस्था इतर सर्व क्वांटम सुपरपोझिशनरुपी विचारांना निष्प्रभ करते. ही क्वांटम उर्जेची अवस्था किंवा बौद्धिक क्षमता मनामधील गैरसमजाचे विचार आणि कुसंस्कार खोडून काढते. ज्यावेळेस वस्तू आणि विषय यांच्यापासून बुद्धी अलिप्त होते तेव्हा ती सात्विक गुण धारण करू लागते.

परंतु या बुद्धिरूप मनाच्या अवस्थेला जेव्हा सत्वगुणांची साथ लाभेल तेव्हा ती सामान्य बुद्धी सदसदविवेकबुद्धी म्हणून प्रकट होते. जेव्हा बुद्धीला हे समजून येते किंवा तिच्या अनुभवास येते की माझे कार्य चैतन्याच्या परमप्रकाशात सुरु आहे तेव्हा ती बुद्धी सात्विक गुणांनी युक्त होते. जेथे सात्विक गुण तेथे ईश्वरी शक्ती प्रकट होते. ही ईश्वरी शक्ती म्हणजेच सदसदविवेकबुद्धी शक्ती होय. आपल्याला आपल्या स्वस्वरूपात म्हणजेच चैतन्य तत्वात जन्म-जीवन-मृत्यू या चक्रापलीकडील चिरंतन तत्वात स्थिर होण्यास ईश्वर सहाय्यकारी होतो. सदसदविवेकबुद्धी ही मनाची अशी विशुद्ध अवस्था आहे की ज्यामध्ये परमात्म्याचे प्रतिबिंब अधिक सुस्पष्टपणे पाहिले जाऊ शकते. मानवी रुपात ईश्वरीय अविष्कार घडवून आणण्याची क्षमता सदसदविवेकबुद्धीमध्ये आहे, आणि त्यामुळे साधकाला त्याची स्वत्वाची ओळख येथे प्रकर्षाने घडून येते. म्हणून संत श्री कबीर दास सदसदविवेकबुद्धीला आत्म्याची सखी असे संबोधतात.

आये जमराजा पलंग चढि बैठा

नैनन अंसुवां टूटल हो ||

आता काळरूपी यमराज या चंदनरुपी पलंगावर चढून बसले आहेत. याचा अर्थ कणाकणाने हे शरीर खंगत असते आणि त्यामुळे ते हळूहळू त्या अटळ मृत्यूकडे वाटचाल करीत असते. जन्माला आल्यानंतर "पलंगावर हक्काने चढून बसणाऱ्या यमराजाप्रमाणे" मृत्यू हक्काने त्या शरीरासमवेतच असतो. आता या सदसद्विवेकबुद्धीचे वेळेत ऐकले नाही आणि हे कलेवर पडण्यापूर्वीच या
शरीराच्या सहाय्याने त्या आत्म्याने स्वस्वरुपानुभव जर करून घेतला नाही तर? म्हणजेच त्या आत्मारूपी नववधूने सदसदविवेकबुद्धीरुपी सखीच्या सहाय्याने अद्वैतभाव, ध्यानधारणा, शुचित्व, समाधी, निरांकारत्व, योग आणि बंधमुक्ती हे साधनस्वरूप दागिने ल्यायले नाहीत तर त्या आत्मारुपी नववधूला दु:ख होणार आहे. हे अज्ञान घेऊन त्याला पुन्हा नवीन शरीर धारण करून मानवी अवतार धारण करावा लागणार आहे ज्यात पुन्हा माया त्या आत्म्याला भरकटवून टाकण्यासाठी तत्पर आहे.

शरीर हे विश्वाने निर्माण केलेले क्वांटम परिणामांचे अधिष्ठान आहे. परंतु शरीरामधील पदार्थमय स्वरुपात घटीत झालेली उर्जा तिच्यामध्ये सतत अवस्थांतर घडवून आणीत असते. हे अवस्थांतर निरंतर सुरु असते ज्यामध्ये मृत्यू हा एक भौतिक पातळीवरील लहानसा टप्पा आहे. आपण चैतन्य असून आपल्याला अवस्थांतर नाही. मात्र क्वांटम परिणामांमुळे शरीराशी एकजीवत्व निर्माण झाल्याने आपणास आपलेच अवस्थांतर होत असल्याचे जाणवते. विश्वाने आपल्याला आपल्या जीवनाचे परम उद्दिष्ट विज्ञानाच्या आणि अध्यात्माच्या माध्यमातून कथित करून ठेवले आहे. हे परम जीवन उद्दिष्ट प्राप्त करून घेणे म्हणजेच स्वस्वरुपानुभव प्राप्त करून घेणे ही जीवनाची सार्थकता आहे. त्यासाठी निरोगी शरीराचे अधिष्ठान आवश्यक आहे. द्वैतातून अद्वैताकडे जाण्याचे व्रत विश्वाने आपल्या मानवाच्या रूपाने हाती घेतले असून उत्तम शरीरप्रकृतीशिवाय ते शक्य नाही.

उत्तम शरीरप्रकृती ठेवून ध्यान, अनापना, विपश्यना, सिद्ध समाधी योग याद्वारे क्वांटम झेनो परिणाम निर्माण करून जर ती आत्मरूपी नववधू परमात्मस्वरूप ब्रह्माशी एकरूप झाली नाही तर तिच्या शरीराचे अधिष्ठान गळून पडेल आणि तिला दु:ख होईल.

चार जने मिल खाट उठाईन,

चहुं दिसि धूं धूं उठल हो ||

चंदनकाष्ठापासून तयार केलेला पलंग चौघेजण उचलून नेतील आणि त्याला जाळतील. म्हणजे साधक असो व सामान्य व्यक्ती त्याचे कलेवर हे शेवटी सरणावर जळणार आहे व धुं धुं करून अग्निशिखा त्यातून फुटून येणार आहेत. याचा अर्थ सामान्य जीवाचे कलेवर व स्वस्वरुपानुभव प्राप्त झालेल्या व्यक्तीचे कलेवर यावर एकसारखेच अग्निसंस्कार होणार आहेत. परंतु यात फरक असा आहे की त्या सिद्धाचे कलेवर हे ते त्या सिध्द जीवाचे दिव्यत्व प्राप्तीचे एक साधन होते आणि त्याच्या महानिर्वाणानंतर ते साधन जाळण्याशिवाय कोणताही उपाय नाही ही कठोर वस्तूस्थिती संत श्री गुरु कबीरदास येथे नमूद करीत आहेत.

कहत कबीरा सुनो भाई साधो

जगसे नाता छूटल हो ||

संत श्री गुरु कबीरदास येथे साधकाला सांगताहेत की आता हे अग्निसंस्कार झाल्यावर शरीराच्या माध्यमातून जगाशी असलेले त्या व्यक्तीचे नाते संपुष्टात येते. बंधमुक्त व्यक्तीचेसुद्धा त्याच्या शरीराच्या माध्यमातून असलेले भौतिक जगतातील वास्तव्य व नाते त्याच्या भौतिक मृत्यूनंतर संपुष्टात येते. आता जगाशी असलेले आपले नाते शरीराची धारण क्षमता संपल्याने म्हणजे अज्ञानवश मृत्यूप्रलयाने संपुष्टात आणावयाचे? का शरीराचे पतन होण्यापूर्वीच स्वस्वरुपानुभव प्राप्त करून म्हणजेच दासबोधात सांगितलेला “विवेकप्रलय” साधून जगाशी असलेले मानसिक नाते संपुष्टात आणावयाचे? हे पर्याय ते साधकासमोर ठेवत आहेत. येथे वाक्यार्थ, रूपक व लक्ष्यार्थ या तिन्ही गोष्टीना महत्व असून, त्याप्रमाणे या रचनेचा सखोल व अचूक वेध घेणे आवश्यक आहे.

क्वांटम कोलेप्स परिणामात निरीक्षकाने इच्छिलेले त्याच्या प्रयत्नांती त्याच्या अनुभवास येते. येथे कोलेप्स म्हणजे प्रलय असा अर्थ घेतला असता कशाचा प्रलय होतो. निरीक्षकाच्या अपेक्षेनुरूप असंख्य भौतिक, जैविक, रासायनिक गुणवैशिष्ट्यांची, त्रिगुणात्मक दोषांची जंत्री तिच्या अमूर्त स्वरुपात क्वांटम उर्जा तरंगात निर्माण होते आणि प्रयत्नांती त्या सर्वांचा रचनात्मक प्रलय भौतिक वास्तवतेत प्रत्यक्षपणे घडून येतो. "मला मृत्यू आहे" हे अज्ञान आहे. जेव्हा हे शरीर, मन, व बुद्धी या वस्तूविषयमय जगात अज्ञानवश गुंतवून ठेवतो तेव्हा नैसर्गिक देह पतनाच्या वेळेस ते अज्ञान मनामध्ये मृत्युभावरूपाने अवतरते, प्रलय पावते किंवा त्या अज्ञानरूपी उर्जा तरंगाचा क्वांटम कोलेप्स परिणाम जिवामध्ये मृत्यूभावास जागृत करतो. हाच तो मृत्यूप्रलय होय ज्यामुळे निरीक्षक त्याचे अस्तित्व अज्ञानवश गमावून बसतो.

जेव्हा विवेकप्रलय होतो तेव्हा सात्विकतेच्या आत्यंतिक उच्च पातळीवर साधकाच्या मनामध्ये केवळ विवेक भरून राहिलेला असतो. स्वस्वरूपानुभव होताना हाच विवेक त्याची सर्वोच्च पातळी गाठतो आणि मनाच्या अंतर्गत निरीक्षणातून स्वस्वरूपानुभवरुपी विवेकाचा प्रलय घडून येतो. या प्रलयात जीवाचा अहंभाव नाहीसा होतो आणि साधक स्वस्वरुपानुभावात स्थिर होतो. विवेक ही मनाची सर्वोच्च अशी अद्वैत व समत्वभावरुपी अमूर्त क्वांटम उर्जा अवस्था आहे. त्याच अवस्थेचा अनुभवात्मक मध्यावधी क्वांटम कोलेप्स परिणाम विवेकाचा प्रलय घडवून आणतो आणि विश्वाच्या निरीक्षकाला ज्ञान आणि अज्ञान यांच्या पलीकडे चिरंतन अस्तित्वात विलीन करून टाकतो.

संत श्री गुरु कबीर दास यांचे हे खुपच उद्बोधित असे निर्गुण भजन असून पं. कुमार गन्धर्वजी आणि श्रीमती कलापनीजी यांनी अत्यंत सुंदर चाल दिली आहे. ही रचना अत्यंत गुह्यतम असे जीवनरहस्य उलगडवून दाखविते. मानवी जीवनाचे उद्दिष्ट काय आहे हे या रचनेतून सुस्पष्ट होते.

उड जाएगा हंस अकेला...

उड जाएगा हंस अकेला, जग दर्शन का मेला

जैसे पात गिरे तरुवर के, मिलना बहुत दुहेला

ना जानू किधर गिरेगा, लग्या पवन का रेला ||१||

येथे आत्म्याला हंसाची उपमा दिली आहे, जो मानवरूपी जीवनात मीपणा धारण करून अज्ञानवश अवतरतो. क्वांटम उर्जा परिणाम चैतन्याच्या परम संवेदनांना जीवामध्ये अवतरीत करतात. या परम संवेदनेतून जीवाचा अहं निर्माण होतो. हे जग केवळ असंख्य वस्तू विषयांचे एक उर्जा प्रदर्शन असून हेच आपले अंतिम ठिकाण असल्याप्रमाणे तो अहं तथाकथित भौतिक जीवन जगतो. वास्तविक आत्मा हा चिरंतन असून हे मायावी

विश्व म्हणजे त्या चैतन्याच्या पार्श्वभूमीवर मांडलेले एक उर्जा संक्रामकतेचे प्रदर्शनच आहे. येथे केवळ दर्शक भावाने राहणे व कोणतीही मानसिक गुंतवणूक न ठेवता येथून आपल्या परमसत्य चैतन्यरूपी अशा निजधामाकडे प्रयाण करणे हेच त्या अहंचे जीवन उद्दिष्ट असले पाहिजे.

भौतिक विश्व हे कठोरता आणि त्याची असलेली निश्चितता यामध्ये साकार होत असते. निसर्गात परतीचे सर्व मार्ग बंद असतात. एकदा एखाद्या झाडाचे वाळलेले पान अलगद गळून पडले कि पुन्हा झाडाला ते लावता येत नाही, त्याप्रमाणे जीवाचे जीवपण संपुष्टात आले कि या विश्वरूपी प्रदर्शनात पुन्हा त्याच जन्मातील त्याच भूमिकेत पुन्हा येणे अशक्य आहे. झाडाला पुन्हा नवीन पालवी ज्याप्रमाणे येते त्याप्रमाणे त्याचे येणे हे त्याच्या नवीन जन्मात होते. एकदा गेलेली व्यक्ती वा जीव पुन्हा आपल्याला त्या पुर्वीच्या भौतिक स्वरुपात भेटू शकत नाही. ज्याप्रमाणे ते झाडाचे वाळलेले पान वाऱ्यामुळे नक्की कोठे पडेल ते सांगता येत नाही, त्याप्रमाणे त्या

जीवात्म्याला पुन्हा जीवपण कोठे लाभते ते सुद्धा आपल्याला कळू शकत नाही. त्या जीवात्म्याला त्याच्या कर्मांनुसार व त्याच्या इच्छांनुसार जी गती प्राप्त झालेली असते त्या गतीला वाऱ्याची उपमा दिली आहे.

मृत्युसमयी मनरूपी क्वांटम उर्जापुंज त्याची अहंभावात्मक कणस्वरूप अवस्था सोडून तरंगरूपाने वैश्विक उर्जेत सम्मिलित होतो. त्यावेळेस त्या उर्जापुंजामध्ये असलेल्या गुणवैशिष्ट्यांच्या कणांना जो संवेग प्राप्त झालेला असतो, तो संवेग त्या जीवाच्या इच्छा, वासना, वृत्ती व प्रवृत्ती या क्षमता अमूर्त स्वरुपात स्वत:समवेत घेऊन जातो. तीच त्याची गती होते. पुन्हा नवीन जन्मात पूर्वीच्या कार्यकारणभावाच्या शृंखलेच्या अनुषंगाने जेथे त्या क्वांटम उर्जापुंजाची फ्रिक्वेन्सी जुळून येईल तेथे तो पुन्हा स्थूल शरीर रुपात प्रकट होतो. पण हे कसे, केव्हा व कोठे होते ते त्या जीवाला कळत नाही आणि त्या जीवाच्या आप्तेष्टांनाही कळत नाही.

जब होवे उमर पुरी, जब छूटेगा हुकुम हुजुरी
जम के दूत बडे मजबूत, जमसे पडा झमेला ||२||

वयानुसार शरीर खंगत जाणे या जैविक प्रक्रियेतसुद्धा क्वांटम उर्जा पातळीवर खूप मोठे बदल होत असतात. वार्धक्यात अथवा ज्यावेळेस त्या जीवाचे आयुष्य संपणार असते त्यावेळेस यम त्याच्या दूतांना हुकुम देतो आणि मजबूत अशा त्या दुतांशी त्या जीवाला झगडा करावा लागतो. असे रूपक येथे संत श्री कबीरदास यांनी प्रस्तुत केले आहे. हे सर्व त्या जीवास भोगावे लागते कारण त्याचे परमात्म्याप्रती किंवा स्वत:च्या चिरंतन अस्तित्वाविषयी असलेले अज्ञानच त्या यमाचे व त्याच्या दुतांचे

रूप घेते आणि भौतिक तापयुक्त अशा दुतांसमवेत त्या जीवाला झगडत बसावे लागते. मनामधील भीती, तृष्णा व षड्रीपुंना बळी पडण्याच्या अनेक वृत्ती त्याला त्याच्या मूळ निर्गुण स्वरूपापासून अलिप्त ठेवतात. त्यामुळे मृत्यू हा त्याच्या तथाकथित अर्थपूर्ण रीतीने त्या जीवाला प्रभावित करत असतो. तसेच हे वस्तू विषययुक्त भौतिक जगत विकारमय असल्याने शेवटी त्या भौतिक तापांपासून त्या अज्ञानी जीवाची सुटका होऊ शकत नाही. अज्ञानरुपी यमाचे भौतिक तापरुपी दूत त्या जीवाचे जीवपण हिरावून घेतात.

जीवनमुक्त व्यक्ती शरीराच्या व मनाच्या सर्व प्रभावांपासून खूप दूर गेलेली असते. अशा व्यक्तींचे भौतिक पातळीवरील "व्यक्ती"पण जरी इतर लोक अनुभवत असले तरी अशी ही जीवनमुक्त व्यक्ती ही त्या व्यक्तित्वाच्या पलीकडे गेलेली असते. त्यामुळे जन्म-जीवन-मृत्यू ही उर्जा अवस्थांतरे त्याच्यावर प्रभाव पाडू शकत नाहीत. अशा जीवनमुक्त व्यक्तीच्या शरीराचा स्थूल मानाने मृत्यू जरी झाला तरी त्याची यत्किंचीतही बाधा त्या व्यक्तीला होत नाही.

दास कबीरा हर के गुण गावे, वा हर को पारं पावे,

गुरू की करनी गुरू जाएगा, चेले की करनी चेला ॥३॥

यातून सुटका करून घेण्यासाठी श्री संत कबीर दास हे आपल्याला देवाची भक्ती करण्यास व त्याचे गुणगान गात जीवन पार पाडण्यास सांगत आहेत. अशा निस्सीम भक्तियोगाने याच जन्मात परमेश्वरप्राप्ती

लवकरात लवकर करून घ्यावी, जेणेकरून त्याच्या कृपेने अज्ञानवश मायेतून जीवाची सुटका झाल्याने जन्म मरणाच्या फेऱ्यातूनसुद्धा त्या जीवाची कायमचीच सुटका होईल. ज्याची भक्ती करावयाची व ज्याला अनन्यभावे शरण जावयाचे आहे ते परम तत्व गुरुहून महान असल्याने, गुरु

असो वा त्याचा शिष्य, ते जशी भक्ती करतील त्याप्रमाणे त्यांना त्यांची गती प्राप्त होईल. एकाचे प्रयत्न व भक्तीचे श्रेय दुसऱ्याच्या कामी येणार नाही हा सल्ला संत श्री कबीर दास येथे आपल्याला देत आहेत.

श्री संत गुरु कबीर दास यांचे हे निर्गुण भजन जीवनाचे एक प्रखर वास्तव आपल्यासमोर सादर करते. हे भजन गाताना पं. कुमार गंधर्व यांनी त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गायकीने आत्यंतिक आर्ततेने जीवनाचे हे प्रखर वास्तव आपल्या मनाच्या तळापर्यंत पोहोचविले आहे. त्यामुळे अंतर्बाह्य मन ढवळून निघते अन त्याची अंतर्शुद्धी प्रक्रिया तत्काळ सुरु होते.

अवधूता गगन घटा गहरानी रे

अवधूता गगन घटा गहरानी रे

येथे अवधूत म्हणजे योगी किंवा साधक होय. साधक त्याची सत्वगुणयुक्त साधना करीत असताना त्याच्या संपूर्ण शरीर व मन यामध्ये बदल घडून येत असतात. कुंडलिनी शक्ती जागृतीनंतर त्या शक्तीचे संक्रमण ऊर्ध्व दिशेने सुरु होते आणि ६ चक्रांना भेदून ती सहस्त्रकमलदलात चैतन्यतत्वाशी एकरूप होते असे वेदांतात वर्णन केले आहे. येथे गगन हा शब्द सहस्त्रकमलदलासाठी वापरला आहे. येथे या साधनेमुळे सत्वगुणयुक्त ढगांची गर्दी झाली असल्याचे रूपक दिसून येते.

पश्चिम दिशा से उलटी बादल, रुम झूम बरसे मेहा

उठो ग्यानी खेत संभारो, बिगै निसरेगा पानी ||१||

कुंडलीनी शक्ती ही मानवाच्या नाभीकमलामध्ये स्थित असते आणि तेथून हा उर्जा प्रवाह ऊर्ध्व दिशेने म्हणजे उलट्या दिशेने सुरु होतो. साधक हा एक ज्ञानी व्यक्ती असून या सत्वगुणयुक्त ढगांमधून साधनेद्वारा ज्ञानजल
बरसत आहे. जसा शेतकरी त्याच्या शेताचे बांध व्यवस्थित बांधून घेतो आणि पाण्याचे रक्षण करतो, तसे योग्याने हे ब्रह्मरंध्रात निर्माण झालेले ज्ञानरूपी जल वाया जाऊ नये म्हणून साधना करताना सावधतेने त्याची मनरुपी शेती सांभाळायची आहे.

निरत सुरत के बैल बनावो, बीजा बोवो निज धानी

दुबध्या धूप जमन नहि पावे, बोवो नामकी धानी ||२||

पूर्वीच्या काळी (अजूनही काही प्रमाणात) आधीच्या वर्षीच्या स्वत:चे धान्यातून बाजूला काढून ठेवलेले धान्य/बी शेतकरी पेरायचे. धान्य/बी पेरताना बैलांच्या सहाय्याने शेतकरी शेतातून औत चालवितो. साधकाला मनरूपी शेतीमध्ये नामस्मरणरुपी बी पेरावयाचे आहे. यासाठी तटस्थ निरीक्षण आणि लक्षपूर्वक गुरु उपदेश जाणणे या दोन क्रिया साधकाला करावयाच्या आहेत. या दोन क्रियांसाठी दोन बैलांचे रूपक येथे वापरले आहे. शेतजमिनीमध्ये जसे गवत व इतर खुरटी झाडे चालत नाहीत तसे साधकाने त्याच्या मनरूपी शेतजमिनीमधून शंकाकुशंका व द्विधाअवस्था काढून टाकावयाच्या आहेत. अशा उत्तम मशागत केलेल्या मनरूपी शेतामध्ये भगवदनामरूपी धान्य पेरावयाचे आहे.

चारो कोने चार रखवाले, चुग ना जावे मृग धानी

काट्या खेत भींडा घर ल्यावे, जाकी पुरान किसानी ||३||

शेतकरी त्याच्या शेताच्या चारही बाजूने शेताचे रक्षण करत असतो, जेणे करून हरीण व इतर गुरेढोरे त्याच्या शेतीचे नुकसान करणार नाहीत. तसेच साधकाला त्याच्या मनरूपी शेतीचेसुद्धा चारही बाजूने रक्षण करावायचे आहे. मनाची प्रशांत अवस्था, मनाची खोल धीरगंभीर अवस्था, मनाचे विश्वव्यापकत्व आणि मनाची मायेपासूनची तटस्थता हे चार रक्षक मनरूपी शेतीचे रक्षण करतात. त्या मनरुपी शेतीमध्ये निर्माण होणारे धान्य म्हणजे साधनेचे फलित असून, शेतकरी जसा ते धान्य घरी घेऊन जातो तसे साधकाला त्याच्या साधनेचे फलित दिव्य अनुभवांच्या माध्यमातून प्राप्त होते.

पाच सखी मिल करे रसोई, जिहमे मुनी और ग्यानी

कहे कबीर सुनो भाई साधो, बोवो नामकी धानी ||४||

ज्यावेळेस साधक त्याच्या साधनेच्या सर्वोच्च अवस्थेमध्ये स्थित होतो त्यावेळेस साधक आणि विश्व यामध्ये जे समत्व निर्माण होते ते साधकाला सहाय्यकारी ठरते. त्या साधकामधील पंचमहाभूते आणि विश्वातील पंचमहाभूते त्याच्या मदतीसाठी तत्पर होतात. जणू काही या पाच तत्वांनी तयार केलेला साधनफल-रुपी प्रसाद ऋषीमुनी व ज्ञानी साधक चाखत आहेत. म्हणून पुन्हा संत श्री कबीरदास येथे सांगत आहेत की या मनरूपी शेतीमध्ये साधनारूपी मशागत करताना भगवदनामरूप धान्य पेरले पाहिजे आणि अतिशय दिव्य व परम अशी साधना फले साध्य म्हणून साधकाने प्राप्त करून घेतली पाहिजे.

गुरु ज्ञानी...

सुनता हैं गुरु ज्ञानी ज्ञानी
गगन में आवाज हो रही झिनी झिनी - (धृ)

जो गुरूंना जाणतो त्या साधकाच्या चिदाकाशात निर्माण होणाऱ्या दिव्य, मंगल, सौम्य आणि सुमधुर अशा ध्वनीची जाणीव त्या साधकाला होते आहे.

पाहिले आए पाहिले आए,
नाद बिंदु से पीछे जमया पानी पानी हो जी,
सब घट पूरण पूर रह्या है
अलख पुरुष निर्बानी हो जी ॥ 1 ॥

जेव्हा जे विश्व साकार होणार होते तेव्हा त्याचा हुंकार नादबिंदू रूपाने विश्वाच्या अप्रकट अवस्थेत निर्माण झाला. या नादबिंदूच्या मूर्त स्वरूपात येण्याने सर्वत्र

पंचमहाभूतांची बीजे त्याच्या सभोवती निर्माण झाली. या पंचमहाभूतात्मक शरीरात गुरु वास करून राहत असतात आणि याच देहाच्या (घट) सहाय्याने ते संपूर्ण सत्य बोलत आहेत कि अलख पुरुष म्हणजे परम पुरुष म्हणजे परब्रह्म हे त्या नादबिंदूच्याहि पलीकडे त्यातून निर्माण होणाऱ्या वाणीला प्रकाशित करणारे मूक असे निर्वाण रूप असून त्या निर्वाण रूपाने प्रत्येक चराचरात त्याचे वास्तव्य आहे. ही गुरुवाणी सिध्द मार्गावरील साधकाला ऐकू येते आहे.

वहां से आया पता लिखाया,
तृष्णा तऊने बुझाई बुझाई ..
अमृत छोडसो विषय को धावे,
उलटी फाँस फंसानी हो जी ॥ 2 ॥

अशा या अमूर्त अवस्थेतील विश्वातून हे साधका तू आला आहेस आणि या शरीर, मन व बुद्धि यांनी युक्त अशा जीवरुपी अस्तित्वाने तू तुझी ओळख निर्माण केली आहेस. या तुझ्या इच्छारुपी प्रकटीकरणातून विषय आणि त्याबद्दलची तृष्णा निर्माण झाली. आजपर्यंत तू विषयांना पकडून त्यांना वश होऊन तुझी तृष्णा भागवित राहिलास आणि ज्या अमृताचा तू अधिकारी आहेस आणि ज्या अमृतरुपी ज्ञानाने सर्व तृष्णा नाहीशा होतात त्याचा तू त्याग केलास. ही स्वत:ची होणारी फसवणूक आणि हा विषयांचा उलटा फासा तू तोडून टाक. ही गुरुवाणी तो साधक ऐकत आहे.

गगन मंडलू में गौ भी आनी
भोई पे दही जमाया जमाया...
माखन माखन संतों ने खाया,
छाछ जगत बापरानी हो जी ... ॥ 3 ॥

ह्या विश्वरूपी गायीच्या परम ज्ञानरूपी दुधापासून जे अनुभवरुपी दही निर्माण झाले त्यातील विवेक व साररुपी लोणी सिध्द योगी व संत यांना प्राप्त झाले असून इतर सामान्य जीवांना मात्र केवळ ताकावर समाधान करून घ्यावे लागते. जे शरीर, मन व बुद्धीरुपी ताक प्राप्त झाले आहे त्याला वैराग्याच्या व साधनेच्या सहाय्याने घुसळून त्यातून साररुपी लोणी काढण्याचा अधिकार सामान्यांनासुद्धा आहे.

बिन धरती एक मंडल दीसे,
बिन सरोवर जूँ पानी रे
गगन मंडलू में होए उजियाला,
बोल गुरु-मुख बानी हो जी ॥ 4 ॥

हे साधका तू स्थूल पृथ्वीरुपी जडतत्व न पाहता ती ज्यामध्ये आहे ते आकाशमंडल पहा. सरोवराला व त्याच्या मर्यादेला न पाहता त्यातील संपूर्ण जलतत्वाला पहा. अशी दृष्टी प्राप्त करणारा साधक या चित्तरुपी गगन मंडलात म्हणजेच चिदाकाशात परम चैतन्यमयी प्रकाशाला अनुभवतो. ही गुरुमुखातून बोलली गेलेली वाणी आहे.

ओऽहं सोऽहं बाजा बाजे, त्रिकुटी धाम सुहानी रे
इडा पिंगला सुखमन नारी,
सून ध्वजा फेहरानी हो जी ॥ 5 ॥

साधकाच्या या चिदाकाशात ओहम व सोहम रुपी ध्वनी घुमत आहे. चिदाकाशात अवतरीत झालेले हे जीव, जगत आणि जगदीश्वर हे त्रिकुटीरुपी विश्वरूप परम धाम अत्यंत रम्य असे आहे. जेव्हा जीव ईश्वराच्या भजनात त्याचे सर्वस्व विरघळवून टाकतो, तेव्हा शरीरातील इडा, पिंगला आणि सुषुम्ना या नाड्यामधून चैतन्य शक्ती वाहू लागते आणि त्या कार्यान्वित होऊ लागतात. याच चैतन्यशक्तीच्या सहाय्याने बंधमुक्तीचा ध्वज तुला फडकावयाचा आहे.

कहत कबीरा सुनो भई साधो,

जाई अगम के बानी रे..

दिन भर रे जो नज़र भर देखे,

अजर अमर वो निशानी हो जी ... ॥ 6 ॥

संत श्री कबीर दास साधकाला उद्देशून म्हणतात, कि हे साधका तू ह्या चैतन्याच्या अगम्य अशा वर्णनाने जागृत हो, त्याचा महिमा तू जाणून घे आणि त्या मार्गाने तू जा. हेच चैतन्य जिवामध्ये वास करून “मी” रूपाने दिवसभराच्या जागृत अवस्थेत तुझे प्रत्येक कर्म न्याहाळत आहे. याचा अर्थ तुझे प्रत्येक कर्म हे त्याच्या परम प्रकाशात घडून येते आहे, रात्री हा सर्वोच्च “मी” रुपी भाव त्याच्या सुषुप्त अवस्थेत जातो. अशा रीतीने हे चैतन्य तत्व अजर व अमर आहे, ही त्याची निशाणी लक्षात ठेव.

हिरना समझ बूझ बन चरना

हिरना समझ बूझ बन चरना||

एक बन चरना, दूजे बन चरना

तीजे बन पग नहिं धरना ||

साधक त्याच्या परम व दिव्य अशा साध्याकडे प्रयाण करत असताना त्याला अनेकप्रकारे स्वत:च्या शरीर, मन व बुद्धीचे रक्षण करावे लागते. आपले शरीर व मन ही उर्जेची अनुक्रमे स्थूल व सूक्ष्म स्वरूपे आहेत. आपण विश्वाचा एक अविभाज्य भाग असून आपल्या शरीर व मन या उर्जासमुहातून इतर अनेकविध उर्जासमूह किंवा उर्जापुंज उत्स्फूर्तपणे व अनिवार्यपणे संक्रमित होत असतात. त्यांना रोखणे अशक्यप्राय आहे. असे विविध गुणधर्मांचे आणि विविध क्षमतांचे उर्जापुंज संक्रमित होत असताना संवेदना, अनुभव, मानसिक आंदोलने आणि प्रतिसाद यांचे उर्जा तरंग क्वांटम क्षेत्ररुपी मनामध्ये निर्माण होत असतात. त्यांचे निरीक्षण करणारा अहं स्वत:ला भोक्ता समजतो, ही निसर्गाची वैशिष्ट्यपूर्ण रचना आहे. या अहं चे स्वसंमोहित होणे टाळणे, या अहं ला ग्लानि येऊ न देणे व या अहं चे आत्मभान सांभाळणे हे साधकाचे कर्तव्य असते. यासाठी साधकाला त्या अहं ला एका वैशिष्ट्यपूर्ण अवस्थेत व वातावरणात ठेवावे लागते.

यासाठी संत श्री कबीरदास यांनी साधकासाठी हरीण आणि त्याची शिकार करण्यासाठी टपलेले अनेक मायावी विकार हे त्या साधकाचे शिकारी अशी रूपके या भजनामध्ये वापरलेली आहेत. साधकरुपी हरणाने पहिल्या प्रकारच्या वनात म्हणजे जेथे एकतत्व विलसत आहे तेथे आपल्यातील अहं ला स्थिर करावे असे सुचविले आहे. हे पहिले वन क्वांटम आभासी व भौतिक वास्तव या दोन्ही जगतापासून अलिप्त असून केवळ समाधीच्या माध्यमातूनच तेथे पोहोचता येते. दुसऱ्या वनात म्हणजे क्वांटम मनरूपी क्षेत्रात सतत गुंजणाऱ्या गुरुवाणीच्या सानिध्यात म्हणजेच योग्यांच्या सहवासात स्वत:ला ठेवावे. मात्र तिसरे वन म्हणजे जेथे भौतिक वास्तवता विषय आणि वस्तू यांची प्रलोभने निर्माण करत असते, तेथे जाऊ नये असा सल्ला संत श्री कबीरदास साधकाला देतात.

ही भौतिक वास्तवता वास्तविक अस्तित्वात नसून मनरूपी क्वांटम क्षेत्राच्या माध्यमातून क्वांटम आभासी सत्यता तिला अर्थ प्राप्त करून देते. भौतिक वास्तवता ही संपूर्णपणे क्वांटम आभासी सत्यतेवर टिकून आहे. परंतु क्वांटम आभासी सत्यता तर केवळ संभाव्यतेच्या क्षमतांचे उर्जापुंज आहेत. वास्तव आणि आभासी या दोन सत्यता द्वंद्व निर्माण करतात. सापेक्षता निर्माण करतात, आणि त्यातून भ्रांत मनोवस्था निर्माण होते.

तीजे बनमें पांच पारधी,

उनके नजर नहिं पडना ||

या तिसऱ्या वनात अनेक विषय आणि वस्तू त्यांच्यामधून संक्रमित होणाऱ्या पाच प्रकारच्या संवेदनांनी साधकाला बाधित करण्याची क्षमता राखून असतात. हेच ते पाच पारधी होत ज्यांच्या नजरेसही हरीणरुपी साधकाने पडू नये असा सल्ला संत श्री कबीरदास साधकाला देतात.

विश्वातील प्रत्येक पदार्थ, वस्तू आणि विषय हे पंचमहाभूतापासून निपजले आहेत. क्वार्क हा अणूच्या गर्भातील सुक्ष्मतीसुक्ष्म कण फार्मियोन गटामध्ये येतो आणि तो विविध गुणवैशिष्ट्यांचा कारक होतो. विश्वातील या पंचमहाभूतात्मक वस्तूविषयांकडून ज्या संवेदना निर्माण होतात त्यासुद्धा ५ प्रकारात मोडतात. जसे शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध हे होत. या संवेदना पदार्थांची गुणवैशिष्ट्ये मन व मेंदू यांच्या प्रणालीमध्ये संक्रमित करतात. या संवेदना क्वांटम माहिती प्रणालीचे उर्जापुंज असतात. या गुणवैशिष्ट्यपूर्ण माहितीचे विघटन मन व मेंदू यांच्या प्रणालीमध्ये घडून येते. हे क्वांटम उर्जापुंज अनेक अमूर्त क्षमता राखून असतात. त्याचबरोबर मनरूपी क्वांटम क्षेत्रातसुद्धा अनेक क्षमता अमूर्त स्वरुपात असतात. ज्यावेळेस वस्तू व विषयांचे क्वांटम उर्जापुंज मन व मेंदू यांच्या प्रणालीमधून संक्रमित होतात, तेव्हा क्वार्कच्या चक्रीय संवेगातून इच्छा, वासना, वृत्ती उफाळून येतात. हे इतक्या वेगाने घडते कि त्याची जाणीव वेगळेपणाने जीवाला होत नाही. हे पाच संवेदनांचे पाच शिकारी जीवाच्या अहं ला संमोहित करतात. मनामधील षड्रीपुंच्या भक्ष्यस्थानी अहं सहज पडतो. याप्रमाणे ही माया बेसावध व अज्ञानी जीवाच्या अहं ची सतत शिकार करत असते. त्याचे आत्मभान हरवून त्याला भ्रमिष्ट करत असते. जीवनाच्या परम उद्दिष्टापासून पदच्युत करत असते. एवढेच काय आत्यंतिक सावध

असणाऱ्या साधकरुपी हरणाची शिकार करण्याचे सामर्थ्य या ५ संवेदनांमध्ये असून त्यापासून कायम तटस्थ राहावे असा सल्ला संत श्री कबीरदास साधकाला देतात.

पांच हिरना, पचीस हिरनी

उन में एक चतुर ना ||

विश्वातील पाच प्रकारच्या संवेदनांना जाणून घ्यावयाच्या मनाच्या पाच क्षमता व तसेच पंचप्राण, पंचमहाभूते, पंचज्ञानेंद्रिये, पंचकमद्रिये, अंत:करण, चित्त, बुद्धी, अहंकार व मन या पंचवीस तत्वांसाठी मादी हरणांची उपमा संत श्री कबीर दास यांनी दिली आहे. परंतु यापैकी कोणीही चतुर नसून या पाच नर हरणांच्या संपर्कात या पंचवीस हरण्या आल्या की त्यातून साधकाचे मन संभ्रमित होते.

तोये मार तेरो मास बिकावे

तेरे खालका करेंगे बिछोना

या तिसऱ्या मायावी वनात जर हरणाचा बळी गेला तर त्याचे मांस विकून त्याच्या कातडीचा बिछाना करून त्यावर हे शिकारी बसतील. याचा अर्थ जर साधक या मायावी वनात त्या पाच संवेदनांचा शिकारी झाला तर त्याची सदसदविवेकबुद्धी हरवून जाईल. षड्रिपू त्याच्या शरीराचा ताबा घेतील आणि त्यामधील अहंला स्वत:च्या मूळ परम स्वरूपाचे भान न राहिल्याने त्याचे चिरंतन अस्तित्व तो गमावून बसेल. अशा रीतीने साधकाचा आत्मघात होईल. असा कडक इशारा संत श्री कबीरदास येथे साधकाला देत आहेत.

कहे कबीराजी सुनो भाई साधो

गुरू के चरण चित धरना ||

संत श्री कबीरदास साधकाला संबोधून म्हणतात कि या तिसऱ्या वनात जरी जायची वेळ आली तरी श्री गुरुचरण तू कधीही सोडू नकोस. श्री गुरूंचे सानिध्य व त्यांच्या अमोलिक मार्गदर्शनापासून तू दूर जाऊ नकोस. तेथेच साधकाच्या मनामध्ये

अपरिमित अशी मन:शक्ती निर्माण होईल जी या तिसऱ्या वनातील सर्व तथाकथित पारध्यांना निष्प्रभ करून टाकेल.

श्री गुरूंच्या आशीर्वादाने व त्यांच्या कृपेने जी मन:शक्ती निर्माण होईल ती दिव्य असते. ही दिव्य मन:शक्ती साधकाच्या अहं ला स्वसंमोहित होऊ देत नाही व ग्लानी येऊ देत नाही. ही मन:शक्ती साधकाच्या अहं चे आत्मभान टिकवून ठेवण्यास सहाय्यकारी होते. अहं हा क्वांटम प्रणालीमधील निरीक्षक असून त्याच्या केवळ निरीक्षणातून संवेदना व अनुभवाचे मोजमाप घेतले जाते. आता असे जरी झाले तरी दिव्य मन:शक्तीच्या जोरावर तो त्यापासून तटस्थ राहू शकणार आहे. मनाकडून होणाऱ्या मोजमाप-क्षोभ-प्रतिसाद-मोजमाप या चक्रीय क्वांटम परिणामांपासून तो तटस्थ राहू शकणार आहे. त्यामुळे इच्छा, वासना व वृत्ती यांची निर्मिती थांबणार आहे. षड्रिपू, भीती, तृष्णा यापासून साधक खूप दूर असणार आहे. श्री गुरु शक्तीची ही जाणीव संत श्री कबीरदास यांना आहे व म्हणूनच ते साधकाला वरीलप्रमाणे सल्ला देतात.

गगन की ओट निसाना हैं भाई

संत कबीर यांनी साधकाला ईश्वराच्या अद्वैत स्वरूपाची साधना करताना या रचनेमध्ये खूप वेगळ्या पद्धतीने मार्गदर्शन केले आहे. आकाश किंवा अवकाश हे उर्जेचे शून्य उर्जा क्षेत्र आहे असे क्वांटम शास्त्राच्या आधारे स्पष्ट होते. या शून्य उर्जा क्षेत्रामध्ये असलेल्या असंख्य शक्यतांना केवळ चैतन्यमयी निरीक्षकाच्या इच्छेने झालेल्या निरीक्षणातून मूर्त स्वरूप लाभले आहे. असे क्वांटम शास्त्र सिध्द करते. याच शून्य तत्वाच्या शून्य उर्जा पातळीवर पोहोचण्यासाठी तोच इरादा ठेवणे आवश्यक आहे. साधकाने अवकाशात दृष्टी स्थिर ठेवून निरीक्षणात सातत्य आणल्यावर ते शून्यत्व साध्य करणे साधकाला शक्य होणार आहे. असा हा विज्ञान अध्यात्म संयोग आताच्या काळात आपल्याला दिसून येतो.

दाहीने सुर चंद्रमा बाये तिन के बीच छिपाना हैं भाई

चंद्र आणि सूर्य ही उर्जेची भैतिक स्वरूपे आहेत. त्या दोघांच्या मध्ये लपून रहायचे आहे असे या ओळीत म्हटले आहे. भौतिक जीवन जगताना साधकाला भवतापाला सामोरे जावे लागते. तसेच काही सुखद असे आयुष्यात गारवा निर्माण करणारे क्षणही येत असतात. याप्रमाणे दोन विरुद्ध अनुभव साधकाला येत असतात त्यांची तुलना सूर्य आणि चंद्र यांच्याशी केली आहे. या अशा दोन्ही सुख आणि दु:ख या द्वंद्वात्मक अनुभवांमध्ये समत्वाने राहावयाचे आहे. मात्र हे समत्व आपण धारण केले आहे या अभिनिवेशातून साधकाने स्वत:ला मुक्त ठेवायचे आहे. नाहीतर सम्यकत्वाची ही जाणीव साधकाचा अहंकार वाढवून त्याला त्याच्या ध्येयापासून पदच्युत करेल. म्हणून सूर्य आणि चंद्र यांच्या मध्ये लपून राहायचे आहे असे ते येथे सुचवितात. स्थूल पातळीवर साधना करताना शीत आणि उष्ण या दोन विरुद्ध शाररीक अनुभवांपासून मन तटस्थ करण्यास ते सुचवीत आहे.

तन की कमान सुरत का रौन्दा शबद बाण ले ताना हैं भाई

साधकाने योग मार्गाचे अवलंबन करून शरीरामध्ये तटस्थता आणि वैराग्याच्या सर्वोच्च क्षमता निर्माण करावयाच्या आहेत. अत्यंत स्थिर मन आणि शरीराने अविचल राहून त्याने ध्यान करावयाचे आहे. साधकाच्या धनुष्याची हीच कमान असेल. ध्यानामध्ये असताना त्याने त्याचे लक्ष्य निश्चित करून जे ध्यान तो लावेल ती त्या धनुष्याची प्रत्यंचा म्हणजे ताण-दोर असेल. साधकाकडून होणारे मंत्रउच्चारण म्हणजे त्याचा प्रत्यक्ष बाण असेल. ज्या अवकाशात हा बाण सुटेल ते अवकाश म्हणजे साधकाचे अंतर्मन असेल. मनरूपी क्वांटम क्षेत्र हेच या विश्वाच्या द्वंद्वात्मक अस्तित्वाचे महाकारण आहे. मनरूपी क्वांटम क्षेत्र हे विश्वाच्या क्षमतांचे उर्जा क्षेत्र आहे. सुख आणि दु:ख तसेच शीत आणि उष्ण ही सूर्यचंद्राप्रमाणे द्वंद्वाची उदाहरणे आहेत. द्वंद्व निर्माण होणे ही मनरूपी क्वांटम क्षेत्राची क्षमता आहे. यासाठी वैश्विक शक्ती किंवा इच्छाशक्ती कार्य करते आणि ते द्वंद्व मनाच्या अनुभव कक्षात प्रकट केले जाते. मी पणा सोडून व समत्व साधून हे द्वंद्व भेदायचे आहे. वस्तुत: मनरूपी क्वांटम उर्जा क्षेत्र हे त्याच्या न्यूनतम उर्जापातळीवर विश्वाचे शून्यत्व धारण करून असते आणि ते प्रत्येक साधकाच्या मनामध्ये विराजमान असते हे ओघाने आलेच.

मारत बाण बिधा तन ही तन सतगुरु का परवान हैं भाई

आता हा जीवन-शक्तीरुपी बाण सतगुरूच्या आदेशाने सोडला जात आहे. सतगुरु हे सुद्धा साक्षात शुन्यत्वाचे प्रतिक आहेत. साधक जरी त्याच्या अंतर्मनातून हे शून्यत्व भेदत असला तरी सतगुरुना त्याची जाणीव होणार आहे.

मारयो बाण घाव नाहीं तन में जिन लाग तिन जान हैं भाई

हा मारलेला बाण शरीराला घाव करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही कारण साधकाने जे वेधले आहे ते त्याच्या अंतर्मानातील शून्यत्व वेधले आहे. मात्र साधकाकडून हे शून्यत्व भेदले गेल्याची जाणीव त्या सतगुरूंना आणि साधकाला निश्चितच असते.

कहे कबीर सुन भाई साधो जिन जाना तिन माना हैं भाई

संत श्री कबीर दास म्हणतात की ज्या साधकाने हा शून्यत्व भेदण्याचा अनुभव घेतला आहे तो अनुभव त्याला प्रत्यक्ष आलेला असल्याचे त्याने मान्य केलेले आहे. मात्र त्याचे वर्णन करण्यासाठी कोणतेही शब्द त्याच्याकडे नसणार आहेत. म्हणून ज्याचे त्याने स्वत:च्या प्रयत्नाने त्याच्या अंतर्मनातील शून्यत्व भेदले पाहिजे.

जो दिसे सो नही.. हैं सो कहा ना जाई

क्वांटम शास्त्र आपल्याला असे सांगते की, हे विश्व अजून अस्तित्वातच आलेले नाही आणि तशी मुळी शक्यताच उद्भवत नाही. किती अगम्य आणि विचित्र वाटते नाही का ? पण इथे संत श्री कबीर दास जसे म्हणतात त्याच संदर्भात संत श्री रामदास स्वामी यांनीसुद्धा त्यांच्या दासबोधात हेच सांगितले आहे की हे विश्व स्वप्नवत आहे.

भौतिक पातळीवर आपल्याला जे वास्तव स्वरूपात अनुभव येतात त्या अनुभवांना त्यांचे वास्तव स्वरूप दिले जाते ते मनाकडूनच. परंतु मन ही एक आभासी सत्यता आहे. ते आहे पण दिसत मात्र नाही. याचा अर्थ वास्तव सत्यतेला आभासी सत्यता अधिप्रमाणित करते.

विश्वाचे क्वांटम क्षेत्र हे आभासी सत्याचे क्षेत्र आहे. त्यामध्ये भौतिक पातळीवर वास्तव म्हणून अनुभव निर्माण करण्याच्या असंख्य क्षमता शक्यता असतात. चैतन्याश्रीत मनाच्या निरीक्षणातून त्या क्षमतांना त्यांचे मूर्त स्वरूप प्राप्त झाल्याचे वाटते खरे पण तसे घडत नाही. कारण आपल्या अनुपस्थितीत विश्वाला अस्तित्व नसेल. आणि आपल्या या जीवरुपी उपस्थितीत जे आपल्याला दिसते त्याचा अर्थच जर समजला नाही तर त्या दिसण्याच्या अनुभवाला त्याचे वास्तव स्वरूप येणार नाही. विश्वाच्या प्रत्येक वास्तव अशा अनुभवाला मनरूपी आभासी क्षेत्रात अर्थानुबोधन घडून येत असते. हे अर्थानुबोधन क्वांटम परिणामांमुळे घडून येते. त्यामुळे केवळ क्वांटम पातळीचा विचार करता वास्तव भौतिकता अस्तित्वात नाही. क्वांटम उर्जा क्षेत्राच्या पातळीवर तेथे केवळ प्रकटीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या क्षमता शक्यताच असल्याने ते स्वतंत्रपणे अस्तित्वात आहे असेही म्हणता येत नाही. त्याचे वर्णन करणे अशक्य आहे. हीच ती विश्वाची अनिर्वचनियता होय. स्वामी निश्चलदास यांनी त्यांच्या विचार सागर रहस्य ग्रंथात याचे सविस्तर वर्णन केले आहे.

बिन देखे परतीत न आवे... कहे न कोई पतीयाना

पाहिल्याशिवाय प्रतीत होत नाही हा संपूर्णपणे क्वांटम सिद्धांत आहे. पाहणे म्हणजे केवळ डोळयांनी पाहणे नव्हे. तर पाचही इंद्रियांच्या मार्फत विश्वाचे मोजमाप घेणे

होय. कोपनहेगन गृहितकानुसार चैतन्याश्रीत निरीक्षक जेव्हा पाचही इंद्रियांच्या मार्फत विश्वाचे निरीक्षण करेल तेव्हाच विश्वाच्या त्या त्या अनुभवाचे मोजमाप घडून येईल. आणि जोपर्यंत या अनुभवाचे शब्दात कथन होत नाही तोपर्यंत त्याचा अर्थ समजणार नाही. मनाला अनुभव आल्यावर ते त्याच्या अंतर्गत त्याच्या सूक्ष्म जिव्हेने बोलते, त्याच्या सूक्ष्म कानाने त्याचे बोलणे ऐकते. क्वांटम शास्त्रात या संवेदना-अनुभव-ज्ञान-प्रतिसाद या अर्थानुबोधन प्रक्रियेला क्वांटम कोलेप्स परिणाम संबोधला जातो. साध्या भाषेत बोलायचे तर डोक्यात प्रकाश पडणे. या अशा विश्वाच्या एखाद्या अनुभवाचे जोपर्यंत निरीक्षण होत नाही, तोपर्यंत त्याला त्या निरीक्षकाच्या संदर्भात एकतर अस्तित्वच नसते किंवा ऐकीव माहितीच्या अनुषंगाने केवळ आभासी अस्तित्व असते.

समझ होवे तो रब्बी चीन्हो.. अचरज होवे अयाना

जो या विश्वाच्या अनुभवांचे खंडणमंडण करेल तो ज्ञानी स्थितप्रज्ञ असेल आणि अज्ञानी व्यक्ती जादू घडल्याप्रमाणे आश्चर्य व्यक्त करतील.

कोई ध्यावे निराकार को कोई ध्यावे अकारा

जो ज्ञानी अद्वैत तत्व जाणून घेतो तो निराकार तत्वाला त्याच्या साधनेचे अधिष्ठान करतो आणि ज्यांना अद्वैत तत्व समजून घेणे कठीण होते ते वैशिष्ट्यपूर्ण अशा आकाराची पूजा करतात.

जा बिधी इन दोनो ते न्यारा... जाने जानणहारा

जे परम आत्मतत्व तत्व द्वैत आणि अद्वैत या दोघांना प्रकाशित करते ते त्या दोघांहून आगळेवेगळे आहे. त्यामुळे आकार आणि निराकार यांच्याही पलीकडे जाऊन ते आत्मतत्व स्वत:मध्ये कसे प्रकट करावे हे जाणणारा साधक “जाणता साधक आहे” असे संत कबीर दास म्हणतात.

वो राग तो लिखिया ना जाई मात्रा लखे न काना

असे या सर्व व्यक्त आणि अव्यक्त यांच्या पलीकडील व त्यांना प्रकाशित करण्या़ऱ्या परम आत्मतत्वाचे वर्णन करण्यासाठी कोणताही राग अस्तित्वात नाही. शब्दांची रचना अस्तित्वात नाही आणि कोणताही शब्द, मात्रा वा काना त्याचे वर्णन करू शकणार नाही.

कहत कबीर सो पढे न परले सुरत निरत जिन जाना

संत कबीर दास म्हणतात जे वाचनिय आहे त्या माध्यमातून त्या परम तत्वाला जाणणे अशक्य आहे. त्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण अध्यात्मिक दृष्टी विकसित करणे आवश्यक आहे. आणि त्याप्रमाणे जाणीवक्षेत्रात निर्माण होणा़ऱ्या परम अशा जाणिवांच्या माध्यमातूनच त्या परम तत्वाला समजून घेता येईल. अर्थात त्याचे वर्णन करण्यासाठी त्यावेळेस तेथे कोणीही नसेल. कोणीही त्या परम तत्वाच्या अनुभवाचे कथन करू शकणार नाही. अनुभवांचे मोजमाप घेणारा साधकाचा अहंभाव त्या परम अशा अनुभवात अनुभवाक आणि अनुभाव्य म्हणून स्थित होईल.

मोको कहां ढूंढे रे....

मोको कहां ढूंढे रे बंदे मैं तो तेरे पास में

ना तीरथ में ना मूरत में ना एकान्त निवास में

ना मंदिर में ना मस्जिद में ना काबे कैलास में

मैं तो तेरे पास में बंदे मैं तो तेरे पास में

ना मैं जप में ना मैं तप में ना मैं बरत उपास में

ना मैं किरिया करम में रहता नाहीं जोग संन्यास में

नाहीं प्राण में नाहीं पिंड में ना ब्रह्मांड आकाश में

ना में प्रकृति प्रवार गुफा में नाहीं स्वासों की स्वांस में

खोजि होए तुरत मिल जाउं इक पल की तालास में

कहत कबीर सुनो भाई साधो मैं तो हुं विश्वास में.

आपण पाहिले की वैश्विक उर्जा तिच्या स्थूल व सूक्ष्म रूपाने आपल्या अनुभवास येत असते. पदार्थ, वस्तू, विषय, शरीरे ही स्थूल रूपे तर मन, बुध्दी, अहंकार, चित्त ही त्या उर्जेची सूक्ष्म रूपे आहेत. परमात्व तत्वाच्या सानिध्यात सूक्ष्म उर्जेच्या क्वांटम अवस्थेत तिच्यातून चैतन्य सळसळले आणि चैतन्याश्रीत मनरूपी निरीक्षक निर्माण झाले. या प्रक्रियेच्या निगडीत खूप संशोधन होत आहे. आणि त्यामध्ये ही बाब सुस्पष्ट होत आहे की चैतन्य तत्वाशिवाय मनरूपी उर्जेला तिचे जाणीव क्षेत्रच प्राप्त होऊ शकणार नाही. स्थूल देहामध्ये मेंदूच्या सहाय्याने या मनरूपी निरीक्षकाने मी पणा किंवा अहंकार निर्माण करून जीवन जगण्यास प्रारंभ केला. या सूक्ष्म मनाच्या सहाय्याने वैश्विक उर्जेने स्वत:चे पदार्थमय स्थूल स्वरूप जाणून घेण्यास सुरुवात केली.

अशा या स्थूल व सूक्ष्म उर्जा अवस्थांपासून वेगळे असणाऱ्या आणि विश्वातील त्या सर्व उर्जा अवस्थांना प्रकाशित करण्याऱ्या परम आत्मतत्वाला जाणण्यासाठी कोठेच जाण्याची आवश्यकता नाही आणि असे कितीही प्रयत्न केले तरी ते वेगळेपणाने प्राप्त होण्यासारखे नाही. मात्र या स्थूल वस्तुमय जगतापासून अलिप्त होऊन मनाला एकाग्र अवस्थेत घेऊन जाणे व तेथे त्या मनाचा लय साधणे. या मार्गाने आपण स्वत: ते चैतन्य तत्व आहोत याचा साक्षात अनुभव येणार आहे. म्हणजेच आपण स्वत: ते आत्मतत्त्व आहोत या वेदवाक्यावर असलेला गाढ विश्वास आणि श्रद्धा यामध्ये आपली परम ओळख लपून राहिली आहे. असे संत श्री कबीर दास येथे साधकाला सांगत आहेत.

साधो ये मूरदोंका गांव

पीर मरे पैगंबर मरी हैं मरी हैं जिंदा जोगी

राजा मरी हैं परजा मरी हैं मरी हैं वैद और रोगी

चंदा मरी हैं सूरज मरी हैं मरी हैं धरणी आकासा

चौदा भुवन के चौधरी मरी हैं इन्हू की का आसा

नौहुं मरी हैं दसहुं मरी हैं मरी हैं सहज अठ्ठासी

तैतीस कोटी देवता मरी हैं बडी काल की बाजी

नाम अनाम अनंत रहत हैं दुजा तत्व न होई

कहे कबीर सुनो भाई साधो भटक मरो मत कोई.

मृत्यू म्हणजे उर्जेचे अवस्थांतर. सजीव स्वरूपात असताना देहामधून चैतन्याचे अप्रकटीकरण होणे म्हणजे मृत्यू होय. परम आत्मतत्त्व हे सर्व अवस्थांच्या पलीकडे व सर्व अवस्थांना प्रकाशीत करणारे असल्याने त्याला अवस्थांतर नाही. एक परम आत्मतत्व सोडल्यास उर्जेच्या प्रत्येक आविष्काराला अवस्थांतर आहे. उर्जा तिच्या सजीव व निर्जीव या दोन्ही अवस्थेत विश्वामध्ये प्रतीत होते. त्यामुळे तिचे अवस्थांतर होणे ही बाब निश्चित असते. देवता या सात्विक उर्जेच्या सर्वोच्च अशा अवस्था असल्याने त्यांच्यामध्ये अवस्थांतर होऊ शकते. मात्र या परम देवता व परम शक्ती या कालातीत अवस्थेत राहू शकतात. भौतिक चौकटीत या उर्जेच्या अवस्थांतराला आपण मृत्यू असे म्हणत असलो तरी उर्जेच्या वैश्विक व अद्वैत अवस्थेच्या पार्श्वभूमीवर मृत्यू हा अस्तित्वात नाही. जेथे द्वैत आहे तेथे मृत्यू हे उर्जा अवस्थांतर अनुभवाच्या कक्षेत येते. जेथे अहंभावीत निरीक्षक नाही तेथे मृत्यू नाही.

साधक स्वत: ते परम आत्मतत्त्व आहे. मात्र ते जाणण्यासाठी कोणत्याही इंद्रियाची आवश्यकता नाही व ते कोणत्याही माध्यमाशिवाय जाणलेसुद्धा जाणार नाहीये. म्हणून ते साधकाला काया-वाचा-मने कुठेही भटकू नकोस असे सांगतात. पुढे ते साधकाला असे सांगतात की, “त्या अनिर्वचनीय व अवर्णनीय अशा “अनाम” परम तत्वाच्या परम अवस्थेत स्थिर होणे आवश्यक आहे”. त्यामुळे त्या साधकाला त्याच्यातील अनंतपणा प्राप्त होणार आहे.

युगन युगन हम योगी

युगन युगन हम योगी,
अवधूता, युगन युगन हम योगी.

हे अवधूता साधका युगायुगापासूनचे आम्ही योगी आहोत असे संत श्री गुरु कबीरदास येथे स्वत:ची ओळख देत आहेत. हे पटवून देत असताना ते योग्याच्या काही खुणा सांगतात जे त्याचे प्रत्यक्ष अनुभव होऊन राहिले आहेत.

आवे ना जाये, मिटे ना कबहुं,
शबद अनाहत भोगी.

ना आम्ही कधी येथे आलो होतो, ना येथून कुठेही गेलो होतो, ना आम्ही कधी अस्तित्वविहीन झालो होतो. आम्ही त्या अनाहत स्वरांचे भोगी होऊन राहिलो आहोत. योगी म्हणजे चैतन्याला जाणणारा चैतन्य साक्षात जगणारा. म्हणून येथे योग्याचे वैशिष्ट्य सांगताना संत श्री गुरु कबीरदास चैतन्याचीच वैशिष्ट्ये सांगत आहेत.

सब ठौर जमात हमरी,
सब ही ठौर पर मेला,

आम्हाला सगळीकडे आमच्यासारखेच सजीव दिसून येत आहेत, आणि त्या सर्वांचा सगळीकडे सारखा एकसमान वावर दिसून येत आहे. आमच्याहून वेगळे आता कोणी आम्हाला दिसत नाही. याचा अर्थ संत श्री गुरु कबीरदास हे जीवनमुक्त पुरुष होते आणि प्रत्येक सजीवात ते चैतन्यस्वरूप परब्रह्म असे एकच तत्व पाहत आहेत आणि या मायामुक्त अवस्थेत त्यांना त्यात मुळी भेदाभेद करताच येणे शक्य नाही अशा स्व-आत्म अवस्थेचे ते येथे वर्णन करीत आहेत.

हम सब मांय, सब हैं हम मांय,
हम है बहूरी अकेला.

येथे पुन्हा संत श्री गुरु कबीरदास त्यांच्यातील परम तत्व चैतन्याची खूण येथे देत आहेत. आम्ही सर्वांमध्ये आहोत व सर्व काही आमच्यामध्ये सामावले गेलेले आहे. असे असूनही आम्ही एकटे व एकमेव असल्याचे आम्हाला वाटत आहे. हे चैतन्य म्हणजेच परब्रह्म जे नेहमी एकटे असते कारण माया ही स्वप्नवत असून प्रचंड विविधता व भेदाभेद निर्माण करून ती सजीवांना सतत भ्रांत करत असते.

हम ही सिद्ध, समाधी हम ही,
हम मौनी, हम बोले.

एक योगी त्याच्या लक्ष्याकडे म्हणजेच स्वस्वरूपाच्या अनुभवाकडे जात असताना समाधी व सिद्धी या क्षमता धारण करीत असतो. तो अधिकाधिक काळ मौनात राहत असतो. या विविध पायऱ्या चढून अनादीकालापासून संत श्री गुरु कबीरदास आता योगियांचे योगी झाले आहेत, म्हणून ते म्हणतात कि या सिद्धी, समाधी, मौन व बोली यांच्या अनुभवात ते स्वत: अनुभव होऊन राहिले आहेत. येथे आता दृश्य, द्रष्टा व दर्शन तसेच अनुभाव्य, अनुभावक असे काहीही द्वंद्व राहिले नसून मी त्यांचा एकमेव एक अनुभव होऊन राहिलो आहे.

रूप सरूप अरूप दिखा के,
हम ही मै हम तो खेले

येथे एक योगी स्थूल शरीराच्या माध्यमातून आपल्यासमोर त्याची ओळख देत आहे. परंतु तो आतून परब्रह्मस्वरूप असल्याने तो त्या परम चैतन्याच्या खुणेने येथे निक्षून सांगतो कि अहो सर्व रूप, सरूप व अरूप यांच्या पलीकडील आम्ही आहोत. म्हणजेच या रूप, सरूप व अरूप यांना प्रकाशित करणारे जे परम तत्व आहे ते आम्ही आहोत. आमच्यासारखे आम्ही आहोत आणि आम्हीच ही शरीररूपाने प्रकट होण्याची खेळी खेळत आहोत.

कहें कबीरा सुनो भाई साधो,
नाहीं न कोई इच्छा,
अपनी मढ़ी में आप में डोलूँ,
खेलूँ सहज स्वइच्छा.

साधनेच्या मार्गात दोन महत्वपूर्ण टप्पे दिसून येतात. एक म्हणजे क्षमता, संधी आणि सुविधा यांची रेलचेल आहे, त्यांचे मोजमाप होतेय, त्याची जाणीव मनामध्ये निर्माण होतीय, त्याप्रमाणे क्षोभ निर्माण होतोय, त्यातून अधीरतायुक्त क्वांटम डिकोहेजन बल निर्माण होतेय, साधकाच्या विवेकशक्तीच्या विरोधात शरीर व मनाची उर्जा क्वांटम डिकोहेजन अवस्थेच्या रूपाने निर्माण होत आहे, परंतु साधक त्या प्रबळ अशा आसक्तीपासून तटस्थ राहण्यात व विवेक आणि वैराग्य टिकवून ठेवण्यात सफल होतो. साधनेच्या दुसऱ्या टप्प्यावर म्हणजे या सर्व तीनही घटकांची रेलचेल असूनही कोणतीही प्राकृतिक, मानसिक किंवा मायावी इच्छा-आकांक्षा व वासना त्या

योग्यांच्या मनात मुळी निर्माणच होत नाहीये. सामान्यपणे कोणतीही इच्छा पूर्ण झाल्यानंतर त्या पूर्णत्वाचा अर्थ ज्यामुळे प्रकट होतो व जाणीवेच्या कक्षेत ज्या परम प्रकाशात त्या अर्थाला जाणले जाते, त्या चैतन्याच्या स्वस्वरूपानुभवात आम्ही स्वेच्छेने डोलत आहोत. असे संत श्री कबीरदास येथे प्रतिपादन करीत आहेत. जसे चैतन्य हा सहजता व उत्स्फूर्तता यांचा स्त्रोत आहे, त्याप्रमाणे येथे स्वेच्छा म्हणजे सहजता व उत्स्फूर्तता असा अर्थ घ्यावा लागेल. अखंड विवेकस्वरूप होऊन राहणे ही स्वेच्छा अवस्था येथे दिसून येते.

संत श्री गुरु कबीरदासजी येथे त्यांचे निजी स्वरूप साधकाला उलगडवून दाखवीत आहेत. जणू काही ते स्वत:च्या ओळखीच्या निमित्ताने त्या साधकाला योगी व्यक्तीच्या स्वस्वरुपानुभावाची माहितीच करून देत आहेत. पं. कुमार गंधर्वजी यांनी अत्यंत मृदू स्वरात हे निर्गुण भजन गायले असून त्यातील आर्तता आनंदाश्रूंच्या स्वरुपात आपल्या प्रत्यक्ष अनुभवास येते.

शून्य गढ शहर

ही रचना संत श्री गुरु गोरखनाथ यांची असून साधनेदरम्यान साधकाची असलेली अवस्था ते येथे वर्णन करत आहेत.

शून्य गढ शहर शहर घर बस्ती, कौन सूता कौन जागे है

हे वर्णन शिष्य वा साधकाचे व त्याच्या मन:स्थितीचे आहे. साधकाला हे निश्चित माहित असते कि हे सर्व जीव जगात शून्यातून निर्माण झाले असून ते शेवटी शून्यवत होणार आहे.

क्वान्टम प्रणाली ही एका वैशिष्ट्यपूर्ण अशा न्यूनतम उर्जा पातळीवर तिचे अस्तित्व टिकवून असते. अशा न्यूनतम उर्जा पातळीला क्वान्टम पोकळी(Quantum Vacuum) किंवा शून्य बिंदू उर्जा (Zero Point Energy) असे संबोधले जाते. क्वान्टम प्रणालीच्या अंतर्गत असलेल्या तरंगांमुळे ती या न्यूनतम उर्जा पातळीवर टिकून रहाते असे दिसून आले आहे. या उर्जेला शून्य बिंदू उर्जा असे जरी संबोधले असले तरी प्रत्यक्षात तेथे एक न्यूनतम उर्जा पातळी निर्धारित झालेली असते.

सन १९०० साली मेक्स प्लेंक यांनी मांडलेल्या न्यूनतम क्वान्टम उर्जा पातळीच्या ($E = \hbar\omega/2$) अनुषंगाने शून्य बिंदू उर्जा पातळी ही संकल्पना आईनस्टाईन व ओट्टो स्टर्न यांनी सन १९१३ मध्ये जगासमोर आणली व त्यानंतर तिचे अस्तित्व प्रयोगशाळेत सिध्द करण्यात आले आहे .

हे शून्य बिंदू उर्जा तत्व विविध क्वान्टम क्षेत्रांना जसे इलेक्ट्रोमेग्नेटिक क्षेत्र, फर्मीयॉन क्षेत्र, बोसॉन क्षेत्र इत्यादी क्षेत्रांना लागू होते. या शून्य बिंदू पातळीवर स्थिर असणाऱ्या अशा क्वान्टम क्षेत्राला (Zero Point Field) अथवा Ground State असेसुद्धा संबोधले जाते. शून्य बिंदू उर्जा ही क्वान्टम प्रणालीचा अंतर्भूत घटक व अविभाज्य असे वैशिष्ट्य असून या उर्जेला वैश्विक स्थिरांक (Cosmological Constant) असे संबोधण्यात येते.

जर आपण एका मूलकणाला (Subatomic Particle) स्थिर करू शकलो तर त्याचा वेग शून्य होऊन त्याची गतीज उर्जा शून्य होईल आणि स्थितीज उर्जेच्या एका किमान पातळीवर तो स्थिर होईल. तथापि हे सर्व न्युटोनिअन भौतिक शास्त्राच्या पार्श्वभूमीवर तर्कशुध्द वाटत असले तरी क्वान्टम पातळीवर तो सुक्ष्म मूलकण मात्र हायझेनबर्गच्या अनिश्चितता सिद्धांतानुसार तो त्याची उर्जा त्यांच्या दोनही अवस्थेत (म्हणजेच त्याच्या संवेगामध्ये व स्थिरतेमध्ये) एकाचवेळी धारण करेल. याचा अर्थ क्वान्टम उर्जा पातळीवर त्या मूलकणाने धारण केलेली कमीतकमी उर्जा ही भौतिक पातळीवरील त्याच्या कमीतकमी उर्जा पातळीपेक्षा अधिक असल्याचे दिसून येईल. तिची मांडणी खालीलप्रमाणे केली आहे.

$|\Omega >= E_{(\text{Quantum minimum})} - E_{(\text{Classical minimum})} > 0$

सर्व जगताच्या सर्वोच्च पातळीवर निर्विवादपणे स्वयंसिध्द असलेली ही न्यूनतम उर्जा त्या त्या मूलकणांचे क्वान्टम उर्जाक्षेत्र निर्धारित करते. अशी ही शून्य बिंदू उर्जा सर्व विश्वाचा आधार असून या उर्जा पातळीवर विश्वाचे एकत्व नि:संदिग्धपणे सिध्द झालेले आहे. वैश्विक चैतन्याने भरलेले आणि भारलेले असे हे न्यूनतम उर्जा क्षेत्र म्हणजे केवळ पोकळी नसून पूर्णत्वाला पूर्णत्व प्रदान करणारे अभूतपूर्व उर्जा क्षेत्र

असल्याचे एरविन लास्लो (Ervin Laszlo) हा शास्त्रज्ञ म्हणतो. या उर्जा क्षेत्राचे वर्णन तो Akashik Field असे करतो, ज्याला आपल्या वेदांतामध्ये महदाकाश असे म्हटले गेले आहे. हे उर्जा क्षेत्र जरी आपल्या पंचज्ञानेंद्रियांच्या पलीकडे अदृश्य असले तरी त्यामध्ये गुणदोषात्मक विश्वाला साकार करण्याच्या अमर्याद क्षमता आहेत. आपले दृश्य स्वरूप हे त्याच्या अदृश्य स्वरूपाचाच एक अविभाज्य असा भाग आहे. एकाच वेळेस आपण या दोनही अवस्थेत असतो, ज्याचे भान आपल्याला या भौतिक जगतात नसते. स्वामी निश्चलदास यालाच या भौतिक जगताची अनिर्वचनीयता असे संबोधतात. दृश्य विषय वस्तूंचा व त्यांच्या विविध रचनांचा अमर्याद स्त्रोत आणि अशा या भौतिक जगताचे अदृश्य स्वरूपातील अमर्याद व चिरंतन अस्तित्व म्हणजेच हे शून्य बिंदू उर्जा क्षेत्र होय.

या अभूतपूर्व अशा क्वान्टम क्षेत्रामध्ये काळ आणि अवकाश यासह सर्व जगताचे गुणवैशिष्ट्यपूर्ण असे अमूर्त स्वरूप माहितीरुपी तरंगस्वरुपात रहस्यमयरित्या दडलेले आहे. सर्व उर्जा क्षेत्रांची जननी म्हणजे हे न्यूनतम क्वान्टम उर्जा क्षेत्र असेच त्याचे वर्णन करावे लागेल. सर्व दिशांमध्ये स्थित असल्याने या उर्जेला आदिश राशियुक्त (Scalar Property) परिमाण लाभलेले आहे. डॉ. जॉन किली यांच्या मते ही उर्जा सर्व विश्वाचे अक्रियाशील केंद्र (Neutral Centre) आहे असे म्हटले आहे. त्यांनीसुद्धा ही उर्जा आपल्या प्रत्यक्ष जीवनाचेच अमूर्त असे स्वरूप असल्याचे म्हटले आहे. वेदान्ताप्रमाणे ज्या सूक्ष्माचे वर्णन करणे शक्य असते ते चैतन्याहून स्थूल असते. याचा अर्थ हे शून्य बिंदू क्वान्टम उर्जाक्षेत्र म्हणजे वैश्विक मन किंवा महदाकाश आहे असा निष्कर्ष निघतो.

या निर्गुण अशा शून्य बिंदू क्षेत्रामधील उर्जा उत्स्फूर्तपणे संक्रमित होऊन तिच्यामध्ये अनेक स्थित्यंतरे झाली. म्हणून संत श्री गुरु गोरखनाथ म्हणतात कि या शून्य तटबंदी असलेल्या मनरूपी शहरामध्ये जीव शरीररूपी आभासमय अशी वस्ती करून राहिला आहे. आता ते प्रश्न उपस्थित करतात कि या कायारूपी शहरात कोण झोपले आहे व कोण जागे आहे. याचा अर्थ या कायारूपी शहरात अज्ञानी कोण आहे व ज्ञानातीत कोण आहे ?

लाल हमरे हम लालन के, तन सोता ब्रह्म जागे है

येथे लाल हा शब्द परमेश्वराला उद्देशून आहे. परब्रह्मरुपी चैतन्य आपण आहोत. तथापि आपल्याला त्याचा प्रत्यक्ष अनुभव येत नसल्याने आपण परब्रह्मरुपी चैतन्याच्या स्त्रोतापासून स्वत:ला अलिप्त समजतो. या द्वंद्वातून या ओळी लिहिल्या

गेल्या आहेत. अन्यथा आपण चैतन्याशी एकरूप व तदाकार आहोत. स्थूल मानाने साधकाचे पदार्थमय अज्ञानवश शरीर झोपते आणि त्यातील परब्रह्मरुपी चैतन्य सतत जागेच असते असा निर्वाळा ते देतात.

जल बिच कमल कमल बिच कलियाँ, भँवर बास ना लेता है

साधकाचे मन त्याच्या इतके ताब्यात असते कि कमळ व त्यातील कळया आणि दरवळणारा सुगंध यामुळे तो भुंगारुपी साधक मायेमुळे मोहित होत नाही व त्या मायारूपी सुगंधाचा अनुभव घेण्यासही जात नाही. मायेमध्ये न गुंतणाऱ्या साधकाचे हे वर्णन आहे. याचा दुसरा अर्थ असा आहे कि समाधी अवस्थेमध्ये साधकाच्या सहस्त्रदलकमलामध्ये त्याच्या आत्मरूप जाणीवा त्याने स्थिर केल्या असूनही त्याला त्याचा मोह होत नाही इतका तो तटस्थ आहे.

या विश्वात मनाची क्वांटम आभासी पातळी आणि शरीराच्या माध्यमातून कळून येणारी भौतिक वास्तविकता हे मुलभूत उर्जाफिरक दिसून येतात. त्यामुळेच जीवाच्या जाणीव क्षेत्रात विश्वाचे अनेक संवेदना व अनुभवरुपी परिणाम सतत निर्माण होत असतात. त्या परिणामांना सतत प्रतिसाद देण्याची सामान्य जीवाची वृत्ती असते. मात्र जसा भुंगा सुगंधाला भुलून कमलदलात अडकून पडतो तसा हा साधक सामान्य भुंगा नाहीये. हा साधक त्या मायेच्या प्रभावी जाळयात अडकणारा सामान्य व्यक्ती नाहीये.

इस नगरी के दस दरवाजे, जोगी फेरी नित देता है

शरीराला दोन डोळे, दोन नाकपुडया, कान, दोन गुहयइंद्रिये आणि एक मुख व एक ब्रह्मरन्ध्र अशी दहा रंध्रे असून योगी त्या दरवाजांवर कडक पहारा ठेवून असतो. या इंद्रीयांद्वारा विश्वाच्या ज्या संवेदना मेंदू व मन यांच्या संयुक्त प्रणालीपर्यंत संक्रमित होतात त्यावर व त्यामुळे निर्माण होणाऱ्या कार्यकारणभावाच्या शृंखलेवर साधकाचे कडक नियंत्रण असते. त्या साधकाचे क्वांटम परिणामरुपी मनच त्या मनोक्षेत्रातील मायावी क्वांटम परिणामांपासून तटस्थ राहण्यासाठी प्रयत्नशील झाले आहे. संवेदना-अनुभव-प्रतिसाद-संवेदना हे चक्र घडून न येण्यासाठी तो साधक सतत तत्पर झालेला आहे. या शरीरातील १० इंद्रियांमुळे तो मायेमध्ये खेचला जात नाहीये ना यावर त्याची कडक नजर असते.

तन की कुण्डी मन का सोटा, ज्ञानकी रगड लगाता है

साधक शरीराचे पात्र व मनरूपी वरवंटा करून त्यातून तो परमज्ञान घुसळून काढतो. त्यासाठी शरीर व मन साधनेसाठी सुयोग्य करतो व आत्यंतिक निरोगी राखतो तेव्हाच त्यातून परमज्ञान उजळून निघते.

शरीर हे पंचमहाभूतात्मक असून तो उर्जेचा स्थूल भौतिक परिणाम आहे. मन हा उर्जेचा सूक्ष्म क्वांटम परिणाम आहे. दोन्ही परिणाम एकमेकांच्या विरुद्ध आहेत असे प्राथमिकदृष्ट्या दिसून येते. तथापि शाररीक अस्तित्वाची जाणीव आणि त्या अनुषंगाने मनाकडून जो माझे आणि मला हे प्रतिसाद दिले जातात, ती एक अभूतपूर्व घटना मानवी लागेल. "अहं/मी" रुपी क्वांटम परिणाम आणि शरीररुपी भौतिक परिणाम यांना जोडणारा संवेदना हा महत्वपूर्ण घटक आहे. या संवेदनेमुळे मनरूपी क्वांटम क्षेत्रात जे मोजमाप, क्षोभ व प्रतिसाद निर्माण होतात त्यातून विचार, भाव, इच्छा, वासना, आसक्ती, इरादे इत्यादी घटक प्रकट होतात. हे क्वांटम बलाचे म्हणजेच मनोबलाचे परिणाम आहेत. (नव्हे ते प्रकट झाल्यासारखे वाटतात/ भास निर्माण होतो). हे घटक क्वांटमस्वरूप अहं ला भौतिक वस्तुनिष्ठतेशी बांधून ठेवतात. भासाच्या चौकटीत हे सत्यच आहे. भौतिक पातळीवरील संदर्भ ठेवून जीवाने ते सत्यच मानल्याने त्या इच्छापूर्तीच्या संदर्भातील असंख्य विचार निर्णयामध्ये परावर्तीत होतात. विचार हे क्वांटम सुपरपोझिशनरुपी उर्जा असून निर्णय ही क्वांटम डोकोहेजन रुपी उर्जा आहे. क्वांटम डोकोहेजन रुपी उर्जा किंवा निर्णय जिवामध्ये अधीरता निर्माण करतात. तो क्वांटम उर्जातरंग प्रत्यक्ष भौतिक स्वरूपात परावर्तीत होण्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपतो. जीवाने याला प्रतिसाद म्हणून जर काही भौतिक क्रिया केल्यास त्या इच्छा त्यांचे मूर्त भौतिक स्वरूप साकारतात. परंतु या सर्व तांत्रिक क्रिया या क्वांटम पातळीवर आभासी सत्यता (Virtual Reality) आणि भौतिक पातळीवर वास्तव सत्यता (Apparent Reality) निर्माण करत असल्याने त्या दोन सत्यतांमध्ये जीव सपशेल फसतो. एकमेवत्व संपुष्टात येते आणि द्वंद्वात्मक भौतिकवाद उफाळून जीव मायेला बळी पडतो.

हे आभासी बंध तोडून टाकण्यासाठी त्याच शरीराचा व मनाच्या परस्पर संबंधाचा परम अर्थ साधक समजून घेतो. शरीरामार्फत जी भौतिक वास्तवता अनुभवास येते आणि मनामार्फत जी क्वांटम आभासी सत्यता अनुभवास येते त्यातून निर्माण होणारी सापेक्षतेची दरी ओलांडण्यासाठी तो त्यांच्याच सहाय्याने परम ज्ञान जाणून घेतो.

त्याला असे परम ज्ञान प्राप्त होते कि ज्याच्या आधारे तो हे अनुभवतो कि भौतिक सत्यता आणि क्वांटम आभासी सत्यता यांना चैतन्य किंवा आत्मतत्व हे प्रकाशित करत असून त्यांच्यापासून ते चैतन्य नेहमीच अलिप्त असे आहे. त्यामुळे तो अशा निष्कर्षाप्रत येतो कि हे विश्व खरोखरच अनिर्वचनीय असून आत्मा किंवा चैतन्य म्हणून "मी" त्या दोन्ही सत्यतांपासून अलिप्त आहे.

पाञ्च पचीस बसे घट भीतर, उनकू घोट पिलाता है

पाच महातत्वे आणि शरीरातील पंचवीस घटक यांना तो परमज्ञानरुपी घोट पाजत असतो, म्हणजेच साधनेद्वारे तो काया वाचा मने शुद्धरूप व ज्ञानरूप होत असतो.

मन ही एक सुक्ष्मतीसुक्ष्म उर्जा असून तिच्यामध्ये जर अपूर्व व अपरिमित अशी सात्विक शक्ती निर्माण झाली तर संपूर्ण शरीराचा कायापालट ती घडवून आणू शकते. पंचमहाभूतांच्या सर्व परिणामांपासून ते शरीर अबाधित ठेवू शकते. शरीराच्या सर्व प्रभावापासून मन अलिप्त होऊ शकते आणि शरीराच्या पतनापुर्वीच म्हणजे लौकिक अर्थाने मृत्यू येण्यापुर्वीच ते मन "अमन" होऊन जाते. जेव्हा ते मन परम ज्ञान व त्यानुरूप साधना करून उच्च अध्यात्मिक अनुभव प्राप्त करून घेऊ लागते तेव्हा या सर्व क्रिया त्या मनाकडून आपोआप घडून येतात.

अगन कुण्डसे तपसी तापे, तपसी तपसा करता है

मनाचे "अमन" होणे म्हणजे मनामध्ये निर्गुण उर्जेचे संक्रमण होणे आणि त्याचे चैतन्याशी तादात्म्य पावणे होय. तपस्या करत असताना साधक जरी भौतिक जीवन जगत असला तरी आता तेथे त्याचे मन असूनही ते विश्वाच्या सर्व परिणामांपासून अलिप्त राहते. मनाला "अमन" करण्याची अभूतपूर्व सिद्धी प्राप्त होण्यासाठी साधक वैराग्याच्या ज्ञानरूपी अग्निकुंडामध्ये त्याच्या अखंड अशा साधनेने तावून सुलाखून निघतो आणि तपस्या करून तो तपस्वी होऊन राहतो.

पाञ्चो चेला फिरे अकेला, अलख अलख कर जपता है

आता शरीराशी असलेले सर्व आभासी बंध तुटले. मन प्रशांत आणि प्रगाढ झाले. आता सर्व भौतिक विश्व त्याला स्वप्नवत वाटू लागते आहे. तो शरीरामधील सर्व इंद्रियांच्या प्रभावातून तटस्थ झालाय. त्या सर्व इंद्रियांमध्ये त्याच्याच शरीरातील पंचतत्वे

उर्जासंक्रमण व उर्जा स्थित्यंतर घडवून आणीत होती. आता साधकाने शरीर व त्यामधील पंचतत्वे जिंकली. अशा रितीने ती त्याच्या संपूर्ण नियंत्रणात जरी आली तरी तो त्यांच्यापासून तटस्थ व एकटा राहतो आणि अखंडपणे त्या निर्गुण निराकाराच्या जपामध्ये मनाला गुंतवून ठेवतो. जपसाधना केल्याने मनामध्ये विचाररुपी क्वांटम सुपरपोझिशन्स निर्माण होत नाहीत. त्यामुळे पुढे कोणतेच क्वांटम परिणाम घडून येत नाहीत. त्यामुळे मनामध्ये प्रचंड शक्ती निर्माण होते. जपसाधना संपल्यावर निर्माण होणाऱ्या वैचारिक शृंखलेपासून तो साधक सतत तटस्थ राहू शकतो.

एक अप्सरा सामें उभी जी, दूजी सूरमा हो सारे है

साधकाला सुरवातीला अविद्यारूपी माया मोहित करते ज्यासाठी अप्सरा हे रूपक संत श्री गुरु गोरखनाथ यांनी वापरले आहे. त्यानंतर तो विद्यावान झाल्यावरहि विद्यारूपी मायेचे स्वरूप डोळ्यातील अंजन होऊन राहते. जसे डोळ्यांना त्यातील अंजन दिसत नाही तसे त्या साधकाला त्या विद्येमुळे सर्व काही कळते पण त्या विद्येला प्रकाशित करणारे आत्मतत्व त्याला कळत नाही. म्हणून विद्या व त्यामुळे सतत भारावून जाणे हे एक प्रकारे मायेचेच स्वरूप आहे. त्यासाठी त्यांनी मायेचे स्वरूप स्त्रीच्या माध्यमातून दाखविले आहे. येथे स्त्रीतत्वाला दोष दिलेला नसून मोहमयी मायेची करणी स्त्रीच्या माध्यमातून प्रदर्शित केली आहे.

तीसरी रम्भा सेज बिछावे, परण्या नहीं कुँवारा है



मायेचे तिसरे स्वरूप म्हणजे चैतन्याश्रीत मन होय. जणू काही एखाद्या मायारूपी रंभेने तयार केलेल्या बिछान्या प्रमाणे ते मन स्वत:च नवनवीन कल्पना रंगवून विश्वाची उभारणी करते व तिच्या मोहजालात या साधकाला अडकविण्याचा प्रयत्न करते. परंतु हा साधक त्या मायेशी असंग राहून एखाद्या लग्न न केलेल्या ब्रह्मचारी व्यक्तीप्रमाणे तटस्थ राहतो.

क्वांटमक्षेत्र हे बल आणि गुणवैशिष्ट्ये यांनी तयार झालेले असते. आता या क्षेत्रात गुणवैशिष्ट्ये संक्रमित होताहेत परंतु त्याचे "मी" पणाने निरीक्षण होत नसल्याने त्यातून कोणतेही भाव निर्माण होत नाहीयेत. अशा अवस्थेत क्वांटम बल जे पूर्वी अनेक क्वांटम परिणामांमध्ये (इच्छा, वासना, इरादे, आसक्ती, वृत्ती, प्रवृत्ती, प्रतिसाद इत्यादी) विखरून जात होते ते आता एकवटू लागले आहे. आता क्वांटमक्षेत्ररुपी मनामध्ये विश्वाची अमोघ अशी सात्विक शक्ती एकवटू लागली आहे. त्यामुळे अज्ञान, ज्ञान आणि त्यांना धारण करणारे मन यांच्याही पलीकडे साधक गेला आहे. मायेच्या प्रभावाखाली असूनही तो प्रभावहीन आहे, जसे तो "परण्या" म्हणजे विवाहित नसून ब्रह्मचारी आहे.

परण्या पहिले पुतुर जाया, मात पिता मन भाया है

या पुरुष आणि प्रकृतीरुपी जोडप्याला लग्न न करता हे ब्रह्म पुत्ररूपाने लाभले आहे असे रूपक येथे दिसून येते. यात पुरुष आणि प्रकृती यांचे मिलन कदापीही झालेले नसूनही जो निस्सीम साधक आहे, त्या रूपाने अनिर्वचनीय असे ब्रह्मच साकार झाले आहे, असे येथे वर्णिले आहे. आणि हा साधक या माता पित्यांचा अगदी लाडका असून त्यांना आवडणारा असा आहे.

क्वांटम परिणाम हा मायेचा म्हणजे वैश्विक उर्जेचा मायावी अविष्कार असून केवळ चैतन्याच्या संवेदनेमुळे जे जाणीव क्षेत्र तेथे निर्माण झाले त्यामुळे ते स्वत्वरूपाने जिवामध्ये प्रकट झाले आहे. येथे चैतन्य किंवा आत्मतत्व मायेशी संग करीत नसून त्याच्या केवळ असण्याने माया चैतन्याशी जोडली गेली आहे असे वाटते. यात चैतन्य म्हणजे पुरुष आणि क्वांटम परिणाम म्हणजे माया असून त्यांचे लग्न व मिलन झालेलेच नाहीये.

मात्र असे असूनही आपण पाहिले की क्वांटम परिणामातून चैतन्याच्या "मी" रुपी परम संवेदना संक्रमित होतात. सर्व प्राणीमात्रांमध्ये ह्या "मी" रुपी संवेदना अगदी एकसारख्याच असतात. तथापि जेव्हा मनाकडून या संवेदनेला प्रतिसाद दिला जातो तेव्हा प्रत्येकाचा अहं स्वतंत्र होतो. म्हणून येथे विवाहापूर्वीच "मी" रुपी पुत्र झाल्याचे वर्णन आले आहे. हा "मी" रुपी पुत्र चैतन्य आणि माया या दोघांना जोडतो म्हणून तो त्या दोघांना पूरक आहे. असे असल्याने तो त्या दोघांना प्रिय आहे असे रूपक घेतले आहे. तसेच या साधकामुळेच त्याच्या समाधी अवस्थेत या पुरुषरुपी शिव आणि

प्रकृतीरुपी पार्वतीचे मिलन होणार आहे, या अर्थानेसुद्धा त्या दोघांना तो “मी” प्रिय आहे असे म्हणता येईल.

शरण मच्छिन्दर गोरख बोले, एक अखंडी ध्याया है

अशा सर्वोत्तम साधकाच्या उच्च अध्यात्मिक अवस्थेत संत श्री गुरु गोरखनाथ त्यांचे गुरु श्री मच्छिन्द्रनाथ यांना सतत शरण आले असून त्यांची ही चैतन्यरूपी अखंड ध्यानावस्था आहे.

ज्यावेळेस सूर्याकडे जाणारी कोणतीही वस्तू सूर्यापासून काही अंतरावरच अग्निस्वरूप होते त्याप्रमाणे उच्च अध्यात्मिक पातळीवर मन सत्वगुणयुक्त होऊन राहते. अशा अग्निमय वस्तुजवळ इतर कोणतीही आगंतुक वस्तू जरी गेली तरी ती आगंतुक वस्तूसुध्दा अग्निमय होऊन जाते, तसे अशा साधकाच्याजवळ रज व तम हे गुण जरी आले तरी ते त्वरीत सत्वात रुपांतरीत होतात. हीच वस्तू सूर्याच्या आणखी जवळ जाऊ लागली कि त्या वस्तुमधील अग्नीला पूरक असे सर्व द्रव्य संपुष्टात येते आणि त्या वस्तूची वाफ होऊन जाते तसे अध्यात्माच्या सर्वोच्च पातळीवर मनामध्ये परम चैतन्यरुपी संवेदनांचा महापूर आल्यावर ते मन आपोआपच “अमन” होऊन जाते. मन “अमन” झाल्यावर त्यामधील सर्व अहंभावात्मक संवेदना पुन्हा त्या चैतन्याच्या स्त्रोतात विलीन होऊन जातात. तेथे हे सर्व जाणणारे किंवा मोजमाप घेणारे कोणीही नसते. म्हणून तो चैतन्यस्वरूप साधक एक अखंड ध्यान म्हणून विश्वात स्थिर होतो असे वर्णन केले आहे.

पंडित श्री कुमार गंधर्व यांनी गायलेले हे भजन या अत्याधुनिक जगात आपण युट्यूबवर ऐकू शकतो. त्यामुळे हा अर्थ आणि त्यांच्या गाण्यातील आर्तता यांचा सुरेख संगम येथे अनुभवता येतो. मनाला मोकळे सोडून या परम अर्थ रुपी तळ्यामध्ये अलगद सोडून द्यावे आणि आपण निश्चिंत होऊन हे भजन ऐकावे. डोळ्यातून सुरवातीला पश्चात्तापयुक्त अश्रू व नंतर हा परम अर्थ आणि सर्वोच्च गायनकला यांचा अवर्णनीय अनुभव यामुळे आनंदाश्रूसुद्धा नकळतच ओघळतील यात शंका नाही.

सखिया वा घर सबसे न्यारा

सखिया वा घर सबसे न्यारा, जहा पुराण पुरुष हमारा,

माया अनेक रूपाने स्वत:ला साकार करत असते. त्यातील मायेचे एक अष्टसात्विक स्वरूप तिच्या इतर रूपांना म्हणजेच सख्यांना उद्देशून येथे कबुल करते कि ते चैतन्याचे परम धाम अतिशय अवर्णनीय असून तेथे पुराण पुरुषोत्तम वास करीत आहे. ज्या पुरुषाशिवाय म्हणजे चैतन्याशिवाय विश्व अस्तित्वविहीन होईल त्या चैतन्याची मुळी जाणीवच मायेला कधी नसते. आता तिच्या अष्टसात्विक स्वरूपात तिला हा साक्षात्कार झाला असून त्या परम धामाचे वर्णन ती येथे अत्यंत समर्पकतेने करते आहे.

विश्वाने अत्यंत बुद्धिमान अशा शास्त्रज्ञांच्या रूपाने विज्ञानाला अशा सर्वोच्च पातळीवर नेऊन ठेवले आहे कि जेथे ते विज्ञान अध्यात्माचे अधिष्ठान झाले आहे. आता हे सर्व जगत नक्कीच हे मान्य करेल कि केवळ एक चैतन्यच या विश्वाच्या अर्थपूर्ण अस्तित्वाचे अधिष्ठान झाले आहे. हे चैतन्यच विज्ञानाचे विज्ञान झाले असून, त्याची वैज्ञानिक पातळीवर “आत्मतत्व/चैतन्यतत्व” म्हणून आपल्याला दखल घ्यावीच लागेल.

जहा नहि सुख-दुख, साच-झूठ नहि, पाप न पुन्न पसारा,
या चैतन्याच्या किंवा परब्रह्माच्या निजधामी सुख-दु:ख, सत्य-असत्य नसून पाप आणि पुण्याचा पसारा सुद्धा नाहीये. संतांना त्यांच्या अमन अवस्थेत निर्गुण तत्वाचा व अद्वैत तत्वाचा साक्षात अनुभव आला. जे परम तत्व या परस्पर विरोधी गोष्टींना प्रकाशित करते ते या द्वंद्वभावाच्या पलीकडील आहे, असे या अनुरोधाने सुस्पष्ट होते आहे.

साधक हा स्थूल भौतिकीच्या अनुभवांना व जाणीवांना बाजूला ठेवून मनाच्या सूक्ष्म आभासी क्वांटम अवस्थेला क्वांटम झेनो परिणामात स्थिर करतो. अनापना, विपश्यना, श्वासानुसंधान किंवा नामजप याद्वारे क्वांटम झेनो परिणाम साधला असता सातत्याने एकाच गोष्टीचे निरीक्षण होते आणि मनामधील इतर क्वांटम परिणाम नाहीसे होतात. आता साधक क्वांटम परीनामांच्याही पलीकडे जातो. तेथे काही काळ थांबून जेव्हा तो पुन्हा सामान्य अवस्थेत येतो तेव्हा तो अवर्णनीय अनुभव त्याला अध्यात्मिकतेच्या उच्च पातळीवर घेऊन जातो. तेथील अनुभव सिध्द ऋषीमुनी व संत त्यांच्या साहित्यात लिहितात. येथे संत श्री कबीर दास याचेच वर्णन करीत आहेत.

नहि दिन रैन, चंद नही सुरज, बिना ज्योती उजियारा,

येथे कोणतीही स्थूल भौतिकता नसल्याने दिवस, रात्र, चंद्र, तारे नाहीत. मात्र येथे कोणत्याही वेगळ्या स्त्रोताशिवाय म्हणजे ज्योतीशिवाय प्रकाश असून त्यामुळे हे परम धाम उजळून निघाले आहे. हा त्या परम तत्वाचा स्वयंप्रकाश आहे.

नही तह ज्ञान, ध्यान नही जप तप, वेद कितेब न बानी,
या निजधामी ज्ञान, ध्यान तसेच जप-तप असे काहीही दिसून येत नाही. वेद पुराणे आणि वाणीचेसुद्धा येथे काहीही काम नाही. परम तत्व हे साध्य असून ज्ञान, ध्यान, जप-तप, वेद, अनेक पुस्तकांचे वाचन आणि वाणी ही साधने आहेत. यांच्या सहाय्याने साधक या परम निजधामी जेव्हा पोहोचतो तेव्हा तेथे या साधनांचे अस्तित्वच नाहीसे होते.

करनी, धरनी, रहनी, गहनी ये सब जहा हिरानी,
येथे कोणी कर्ता व कोणतेही कर्म नाही, ना येथे जाणे येणे, धरून ठेवणे व सोडणे असे सर्व काही भौतिक क्रिया कर्मे येथे हरवून गेलेली आहेत, जसे काही कधी हे निष्पन्नच झालेले नाही.

धर नही अधर, न बाहर भीतर, पिंड ब्रह्मंड कछु नाही,
येथे वर वा खाली असे काहीही नाही. येथे आतील व बाहेरील असे काहीच नाही. येथे सुक्ष्म वा स्थूल जीवजगत नाही त्यामुळे या जीवजगताकडून वेगळेपणाने वर्णिले जाणारे ब्रह्मांडसुद्धा नाही. येथे इतके ब्रह्म ऐक्य साधले गेले आहे कि कोणतीही भिन्नता नाही व आता ब्रह्म वेगळे व मी वेगळा असा दुजाभाव येथे नाही.

पांच तत्व गुन तीन नही तह, साखी शब्द न ताही,
पंचमहाभूते व तीन गुण जसे सत्व, रज व तम असे येथे अस्तित्वात नाहीत. कोणाची साक्ष काढली जाईल असे शब्द येथे नाहीत. येथे सर्व भौतिकता त्यातील द्वंद्वासह संपुष्टात आल्याने वर्णन करण्यासारखे येथे काहीही नाही, आणि अद्वैतात राहून अद्वैताचे वर्णन करण्यासाठी वाणी साथ देत नाही.

मूल न फूल, वेली नहि, बीजा बिना वृछ फल सोहे,

येथे कोणत्याही सजीवांचे वा प्रकृतीचे मूळ नाही. वेली, फुले, वृक्ष नाहीत. थोडक्यात येथे कोणताही कार्यकारणभाव अस्तित्वात नाही. मात्र येथे बीजाशिवाय वृक्षांना अमृतमयी मधुर फळे आढळून येतात.

ओहं सोहं अर्ध उर्ध नही, स्वासा लेखन को है,
येथे सर्वच ओमकारस्वरूप असल्याने ओमकार व सोहम अशी तत्वे येथे नाहीत. सोहम मधील स: फक्त अस्तित्वात असून अहम त्यामध्ये मिसळून गेलेला आहे. तसेच जिथे अर्ध वा ऊर्ध्व स्वरसुद्धा नाहीत तिथे श्वास म्हणजे प्राणाचे तरी वर्णन येथे कसे करू.

जहा पुरुष तहवा कछु नाहि कहे कबीर हम जाना,
जेथे केवळ परम पुरुष चैतन्य तत्व आहे तेथे माया उद्भवत नाही. माया त्या परम पुरुषाला कधीच स्पर्श करू शकत नाही. समाधीअवस्थेत तिने स्वत:च स्वत:चा निरास करून घेतल्यावर शून्यत्वाच्या टप्प्यावर त्या परम चैतन्याच्या अपरोक्ष अनुभवात तिचे अस्तित्वच लोप पावते हे संत श्री गुरु कबीरदास जाणून आहेत असे ते ठामपणे साधकाला सांगतात.

हमरी सैन लखे जो कोई, पावै पद निरवाना.
स्वत: ब्रह्मरूप असूनहि केवळ जनकल्याणासाठी मानव जीवन स्वीकारून संत श्री गुरु कबीर दास यांनी मायेच्या तडाख्यातून सकल मानवजातीला वाचविण्यासाठी चैतन्याचे सर्व रहस्य तळहातावर ठेवून सुस्पष्ट करून दिले आहे. पंडीत कुमार गंधर्व यांनी त्यात आर्जव व आर्तता इतकी ओतप्रोत भरली आहे की.....असे वाटते साक्षात संत श्री गुरु कबीरदासच त्यांच्या रूपाने अखिल मानवजातीला हे जीवनरहस्य सांगत आहेत. साधकाला ते निश्चितपणे सांगतात कि तू जर मी सांगितलेल्या परम चैतन्याच्या या खाणाखुणा ओळखल्यास, म्हणजेच जर तू त्या परम तत्वाला स्वत्वभावाने जाणून त्याचा अपरोक्ष (प्रत्यक्ष) अनुभव घेतलास तर तुला ते महानिर्वाणरुपी पद खासच प्राप्त होईल.

पं.कुमार गंधर्वजी यांच्या या भजनातील आर्तता थेट हृदयापर्यंत पोहोचते. अशा निर्गुणी भजनात डोळ्यात अश्रू उभे रहाणे ही तर खूपच नेहमीची गोष्ट असून, या भजनात अवर्णनीय असा शब्दातीत अनुभव येतो. संत श्री गुरु कबीरदास यांनी त्या

परम तत्वाला साक्षात तळहातावर ठेवून त्याचे अत्यंत समर्पक असे वर्णन केले आहे जे केवळ जगन्मुक्त व्यक्तीच करू शकते.

निर्भय निर्गुण गुण रे गाऊंगा

निर्भय निर्गुण गुण रे गाऊंगा

संत श्री गुरु कबीर दास हे मुळात मुक्त व सिद्ध पुरुष होते. मानवी शरीर धारण करून आपल्या मार्गदर्शनासाठी ते आले होते. त्या मानवी शरीराचाच वापर करून त्यावरील मायेचे आवरण त्यांनी दूर केले व आपले मूळ स्वरूप तत्काळ जाणले. मायेचे आवरण दूर करण्यासाठी आपली मायावी ओळख त्यागून निर्गुण समाधी अवस्था प्राप्त करावी लागते. स्वत:ची सर्व गुणदोषयुक्त ओळखच पुसून काढणे हे सामान्यतः भीतीदायक आहे कारण अस्तित्व गमावण्याची भीती प्रत्येकातच असते. तरी त्यावर मात करून निर्भय होऊन निर्गुणाचे गुण गाण्याचे धैर्य त्यांनी प्राप्त केले हे अभूतपूर्व आहे. निर्गुणाचे गुण गाण्याचे सामर्थ्य त्यांनी मानव जन्मात प्राप्त केले आणि सर्व जण हे करू शकतात हे त्यांनी सिद्ध करून दाखविले.

मुल कमलदल आसन बांधू जी
उल्टी पवन चढ़ाऊंगा ।।



संत श्री ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये मुलबंधावर आसन बांधून कसे बसावे याचे वर्णन केले आहे. असे आसन बांधल्यावर वायूरूपाने शरीरातून खाली वाहणारी वैश्विक शक्ती मेंदूच्या दिशेने वर प्रवास करण्यास सुरुवात करते. त्यामुळे कुंडलिनी शक्ती जागृत होऊन मेंदूतील सहस्त्रारचक्राला ती भेदून टाकते आणि साधकाला स्वस्वरूपाचा अनुभव मिळवून देते.

क्वांटम शास्त्राच्या माध्यमातून या कुंडलिनी शक्तीचे जागरण, संक्रमण आणि वैश्विक चैतन्याशी तिचे होणारे मिलन या सर्व उच्च अध्यात्मिक क्रिया आपण समजून घेतल्या पाहिजेत. वस्तुत: हा एक प्रदीर्घ असा संशोधनाचा विषय आहे. हे येथे विषद करण्यामागचे कारण असे आहे की "अनुभवाशिवाय बोलू नये" असे म्हणतात, परंतु ज्या व्यक्तीमध्ये ह्या क्रिया घडून आल्या आहेत अशी व्यक्ती क्वांटम शास्त्राचा अभ्यास करून त्या क्रियांचा मेळ विज्ञानाशी घालण्याचा योग येणे ही बाब मला दुर्मिळ वाटते. म्हणून क्वांटम शास्त्रातील विविध सिद्धांत आणि परिणाम व तसेच आपल्या ग्रंथांमध्ये व वेदांतात कुंडलिनी जागृती विषयी नमूद केलेल्या विविध परिणामांच्या व सुसंगत अशा तर्काच्या सहाय्याने आपण हे किमान प्राथमिक पातळीवर समजून घेऊ शकतो. त्यामध्ये आपण वेळोवेळी सुधारणासुद्धा करू शकतो. हा विज्ञान आणि अध्यात्माचा तर्कसुसंगत संबंध मानवाला त्याच्या विचारांच्या सर्वोच्च अशा अध्यात्मिक पातळीवर घेऊन जाण्यास मदत करेल.

आपण हे जाणतो कि या विश्वामध्ये उर्जा ही वस्तुत: निर्गुण स्वरुपात असून क्वांटम शास्त्रामध्ये तिला विश्वाचे शून्य बिंदू उर्जा क्षेत्र म्हटले गेले आहे. ही उर्जा सगुण स्वरुपात असल्याचे जे जाणवते ते का? याचे कारण मनामध्ये निर्माण झालेल्या द्वंद्वात्मक भौतिकवादामध्ये आहे. मनामध्ये हा द्वंद्वात्मक भौतिकवाद निर्माण होण्याची कारणे - १) वास्तव भौतिकता आणि आभासी क्वांटम परिणाम या दोन सत्यतामधील न मिटवता येणारा फरक, २) या फरकामुळे निर्माण होणारी सापेक्षतेची अमर्याद दरी, ३) स्थूल व सूक्ष्म विश्वाचा निरीक्षक हा अदृश्य स्वरुपात जीवाचा अहं/मी असून तो ज्याचे निरीक्षण करतोय ते मात्र सर्व स्थूल भौतिक आहे, ४) चैतन्याशिवाय संवेदना व अनुभवांचे अर्थानुबोधन घडून न येणे, ५) चैतन्याच्या "मी" रुपी संवेदना आणि मनाने त्याला प्रतिसाद देत निर्माण केलेला अहंभावात्मक "मी" यामधील फरक.

विश्वात उर्जा संक्रमण वा विस्थापन होत असताना ती ज्या उद्दिष्टासाठी संक्रमित व विस्थापित होत आहे व केली जात आहे, याची त्या उर्जेला काहीही जाणीव नसते. मात्र तिच्या या वाहनामुळे पदार्थांच्या गुणांमध्ये बदल घडून येतो. उर्जेचे वहन आणि त्यानुसार होणारे पदार्थांच्या गुणांमधील बदल याची सर्व क्वांटम माहिती संवेदना रूपाने चैतन्याश्रीत मनाच्या जाणीव क्षेत्रापर्यंत पोहोचते आणि अहं/मी रुपी या निरीक्षकाला त्याचे अर्थानुबोधन होऊन त्याची जाणीव होते. पदार्थांचे

गुणवैशिष्ट्यपूर्ण क्वांटम कण जेव्हा या ऊर्जेमध्ये संवेग प्राप्त करतात तेव्हा विविध विचार, भाव, वृत्ती, इच्छा, वासना, इरादे तेथे प्रकट होतात आणि त्यामुळे निरीक्षक प्रभावित होतो. या सर्व प्रकारात उर्जा तिच्या क्वांटम व भौतिक या दोन्ही पातळीवर कमी अधिक तीव्रतेमध्ये आढळून येते. मात्र सर्वत्र व सर्व परिस्थितीत ती उर्जा कायम निर्गुण अवस्थेत असल्याचे स्पष्टपणे समजून येते.

वेदांतानुसार आणि आता क्वांटम शास्त्रानुसार या विश्वाचे मूळ निर्गुण उर्जा तत्व आहे. प्रत्येक सजीव हा विश्वातील प्रत्येक घटकाशी अविभाज्यपणे जोडला गेलेला असल्याने त्या निर्गुण उर्जा तत्वाशी आपण मानवसुद्धा जोडले गेलेलो आहोतच. या विश्वात असामान्य, अनंत व अपरिमित असे बुध्दीतत्व असून जीव प्रत्यक्ष स्थूल रूपाने अवतरीत होत असताना सूक्ष्म उर्जारूपाने त्यांचे देहसुद्धा त्याच समवेत निर्माण झाले असले पाहिजेत. अन्यथा या सूक्ष्म ज्ञानेन्द्रियांनी स्मृतीमधून त्यांच्याशी निगडीत अशा पाच प्रकारच्या संवेदनांचा आस्वाद पुन्हा पुन्हा घेतला नसता. आंब्याचा मौसम नसतानाही आंब्याची चव सूक्ष्म जीभेकडून जाणली जाते. समोर आप्तेष्ट नसतानाही त्यांची प्रतिमा मन:चक्षुसमोर तत्काळ उभी राहते. आवडत्या गायकाचा आवाज क्षणार्धात आहे तसा सूक्ष्म कानात घुमू लागतो. गुलाबाचा सुगंध स्मृतीकेंद्रातून सूक्ष्म घ्राणेंद्रियाकडून पुन्हा अनुभवता येतो.

अशा या सूक्ष्म उर्जारुपी देहामध्ये विविध अवयव व इंद्रिये यांची तत्वे अमूर्त स्वरुपात असली पाहिजेत जी स्वयंप्रकटीकरणाच्या दरम्यान क्वांटम कोलेप्स परिणामाने इंद्रियरुपी स्थूल भौतिक स्वरूपात प्रकट झाली असली पाहिजेत. हे सूक्ष्म उर्जा देह तत्व म्हणजेच मन होय ज्याला त्याच्या स्वयंप्रकटीकरणासाठी स्थूल देहामध्ये क्वांटम क्षेत्र उपलब्ध झाले आहे. ही सर्व रचनाच इतकी रहस्यमय आणि मेंदू पोखरून टाकणारी आहे कि हा तर्क आणि संकल्पनासुध्दा त्यापुढे फिक्या पडतील. हे सर्व अशाच रीतीने साकार व्हावे हे ठरविणारे महान बुद्धीतत्व स्वयंभू व उत्स्फूर्तपणे विश्वात निश्चितच आहे, असे म्हणण्याशिवाय आता पर्याय नाही, अशी परिस्थिती आहे.

या सूक्ष्म उर्जा देहाचे संधान तिच्या निर्गुण वैश्विक उर्जास्त्रोताशी असणे स्वाभाविक आहे. ही जोडणी कुंडलिनी स्वरूपात मानवाच्या नाभी स्थानी असल्याचे वेदांतात नमूद केले आहे. आपण आता खालील प्रमुख गोष्टी येथे तर्काने व अनिवार्यपणे

मानायला हव्यात. जसे १) या सूक्ष्म उर्जा देहामध्ये सहा ठिकाणी पदार्थांचे सूक्ष्म क्वांटम कण आणि बलाचे सूक्ष्म कण यांची वैशिष्ट्यपूर्ण अशी स्थायी स्वरूपाची क्वांटम स्थाने निर्माण झाली आहेत. २) ही स्थाने सहा प्रकारची उर्जा चक्रे असून त्यामध्ये जी गुणवैशिष्ट्ये सामावलेली आहेत ती त्यांच्या क्वांटम अवस्थेत अमूर्त स्वरूपात असतात. ३) मात्र स्थूल देह साकारताना याच तत्वांच्या अनुषंगाने त्या त्या सहा ठिकाणी देहाचे ते ते गुणवैशिष्ट्य मूर्त पावले आहे. ४) या सहा उर्जा चक्रांची सूक्ष्म उर्जा अवस्था सूक्ष्म उर्जा देहामध्ये कायम स्थित असते.

मात्र या सहा उर्जा चक्रांमध्ये सुसंगती आणि सुसूत्रता प्रस्थापित झालेली नसल्याने व तसेच सतत द्वंद्वात्मक भौतिकवादाला मानव बळी पडत असल्याने ही उर्जा चक्रे अशुद्ध स्वरुपात व कमी जास्त तीव्रतेने कार्यान्वित झालेली असल्याचे दिसून येते.

इडा, पिंगला आणि सुषुम्ना या तीन सूक्ष्म उर्जा-वाहिन्या शरीरात असल्याचे वेदांतात म्हटले आहे. यातील सुषुम्ना ही उर्जा-वाहिनी कुंडलीनी स्थानापासून सहा उर्जा चक्रांना जोडत मेंदूपर्यंत गेली असून तिच्या दोन्ही बाजूस इडा, पिंगला व इतर नाड्या किंवा उर्जा-वाहिन्या असल्याचे ग्रंथसाहित्यात नमूद केले आहे. क्वांटम शास्त्रीयदृष्ट्या या उर्जा-वाहिन्या सूक्ष्म उर्जा देहाचे गठन आणि एकसंघ असा संघात निर्माण होण्यासाठी आवश्यक वाटतात. संत व ऋषीमुनी यांना याचा साक्षात अनुभव आलेला असून अनुभवाच्या कक्षेत म्हणजेच जाणीवेच्या कक्षेत जर या सूक्ष्म उर्जा देहाच्या संपूर्ण रचेनेचे सर्वंकष अर्थानुबोधन होणे आवश्यक असेल, तर मनामध्ये त्यानुरूप मध्यावधी क्वांटम कोलेप्स परिणाम घडून येणे क्रमप्राप्त ठरते. जे अमूर्त आहे ते अनुभवाने व त्याच्या अर्थानुबोधाने निरीक्षण योग्य ठरत असेल ते तेथे असलेच पाहिजे यात शंका नाही.

श्रीगुरूंच्या मार्गदर्शनाखाली साधक त्याच्या प्रगाढ समाधी वा ध्यानावस्थेत त्या निर्गुण उर्जास्त्रोताशी आपोआप जोडला जातो आणि त्या निर्गुण उर्जेचे उद्दीपन कुंडलिनी जागृती आणि संक्रमण याद्वारे घडून येते. प्रगाढ समाधी वा ध्यानावस्थेत मनामधील इतर सर्व मायावी क्वांटम परिणाम नाहीसे झालेले असतात आणि तेथील अहंभावात्मक निरीक्षक उदास व तटस्थ वृत्तीने स्थिर असतो. अशा वेळेस या मनरूपी सूक्ष्म उर्जादेहामधून निर्गुण अशी वैश्विक उर्जा उत्स्फूर्तपणे संक्रमित होते. मनरूपी सूक्ष्म उर्जादेह कुंडलिनीरुपी जोडणीमार्फत वैश्विक निर्गुण उर्जातत्वाशी जोडलेला असल्याने प्रथम त्या कुंडलिनीरुपी जोडणीचे उद्दीपन घडून येते. यामुळे अनेक जैवरासायनिक बदल शरीरामध्ये घडून येणे स्वाभाविक ठरते. तसेच अनेक अनैसर्गिक पण अलौकिक अनुभवसुद्धा कुंडलिनी जागृती व संक्रमण दरम्यान साधकाला येतात व त्याचे वर्णन ग्रंथांमधून आले आहे.

हा उर्जा प्रवाह ऊर्ध्व दिशेने संक्रमित होतो आणि सर्व उर्जा चक्रांना भेदून व त्यांचे परम शुद्धीकरण करून तो उर्जा प्रवाह सहस्त्रार चक्रामधून मुक्त होतो आणि पुन्हा वैश्विक उर्जा स्त्रोताशी संम्मिलीत होतो. सहस्त्रार चक्रामध्ये म्हणजे मेंदूमध्ये क्वांटम क्षेत्रात मनाचे स्थान असल्याने तेथे चैतन्याच्या संवेदना संक्रमित झालेल्या असतात. अहंभावात्मक निरीक्षक उदास असल्याने ही उर्जा संपूर्ण मनोक्षेत्रात केवळ चैतन्याच्या परम संवेदना वेगाने संक्रमित करते आणि साधकाला परमोच्च अवर्णनीय असा बंधमुक्ततेचा अनुभव येतो. हीच त्या साधकाची बंधमुक्त अवस्था असते. आता साधक साधना करतो ते ही अवस्था कायम टिकवून ठेवण्यासाठीच.

मनममता को थिर कर लाऊं जी-
पांचों तत मिलाऊंगा ।।

जेव्हा गुणवैशिष्ट्यांचे सूक्ष्म कण क्वांटम क्षेत्ररुपी मनामधून संक्रमित होतात तेव्हा तेथे संवेग निर्माण होतो आणि त्याबद्दल आसक्ती किंवा अनासक्ती युक्त भाव निर्माण होतात. आसक्तीयुक्त भावातून ममत्व निर्माण होते. मन स्वत: त्या ममत्वरुपी क्वांटम सुपरपोझिशनमध्ये स्वत:ला सामावून घेते आणि सर्व वस्तू, विषय, जीव आणि माणसे यांत स्वत:ला निष्कारण गुंतवते अन शेवटी हाती काही लागत नाही. ममत्व ही माया आहे तो एक आभास आहे त्या आभासाला स्थिर करणे आणि त्यात राहूनही त्यापासून तटस्थ होणे ही कसरत साधकाला साधावी लागते. असे संत श्री गुरु कबीर दास यांना

येथे सूचित करावयाचे आहे. आपल्या शरीरातील पाच तत्वे म्हणजे वायू, जल, अग्नी, पृथ्वी आणि आकाश ही सर्व तत्वे एकत्र करावयाची आहेत म्हणजेच या पाच तत्वांशी निगडीत आपल्या शरीरात जी पाच ज्ञानेंद्रिये आहेत त्यावर नियंत्रण प्रस्थापित करावयाचे आहे.

इंगला-पिंगला-सुखमन नाड़ी जी
त्रिवेणी पर नहाऊंगा ।।

आपल्या शरीरामध्ये इडा-पिंगला आणि सुषुम्ना या तीन नाड्या म्हणजे वायु स्थिर करणाऱ्या यंत्रणा आहेत. श्वासानुसंधान, प्राणायाम व समाधी याप्रकारे योगसाधना करताना या तीनही नाड्या संपूर्ण नियंत्रणात येऊन वायूवर म्हणजेच मन व शरीर यांच्या कार्यावर संपूर्ण नियंत्रण साधता येते. या तीन नाड्याच्या त्रिवेणी संगमावर त्या साधकाला आनंद व शांती यांचा परम अनुभव येतो अन तो त्यात न्हाहून जातो. प्रत्यक्ष कोणत्याही भौतिक चौकटीतील नद्यांच्या त्रिवेणी संगमावर जाऊन स्नान करण्याचा अट्टाहास अध्यात्मिक प्रगतीत फारसा कामी येत नाही मात्र वर वर्णन केलेल्या त्रिवेणी संगमावर न्हाहून शरीर व मन शुद्ध व बुद्ध निश्चितच होणार आहे.

पांच पचीस पकड मंगाऊ जी
एक ही डोर लगाऊंगा ।।

आता संत श्री गुरु कबीर दास शरीरातील व मनातील सर्व मिळून पंचवीस तत्वांची मोट बांधण्याबाबत मार्गदर्शन करीत आहेत. विश्वातील पाच प्रकारच्या संवेदनांना जाणून घ्यावयाच्या मनाच्या ५ क्षमता व तसेच पंचप्राण, पंचमहाभूते, पंचज्ञानेंद्रिये, पंचकमद्रिये, अंत:करण, चित्त, बुद्धी, अहंकार व मन या पंचवीस तत्वांची एक दोरी तयार करून त्याआधारे उच्च अध्यात्मिक पातळीवर जाण्यासाठी ते मार्गदर्शन करीत आहेत. जेव्हा साधक या ५/२५ तत्वांपासून स्वत:ला तटस्थ करू शकेल तेव्हाच त्याला त्यांची मोट बांधता येईल. जेव्हा मनाच्या अंतर्गत प्रतिसाद देणे बंद होईल तेव्हाच तो साधक मोजमाप व क्षोभ यापासून तटस्थ राहू शकेल. एक प्रतिसादच क्वांटम क्षेत्राला असा काही आंदोलित करतो कि त्यामुळे निर्माण होणारी उर्जा मनाला मोजमाप आणि क्षोभ यामध्ये गुंतवून ठेवण्यास कारणीभूत होते. मन:चक्षुसमोर स्मृतीकेंद्रातून देखावे निर्माण होणे, विचार होणे या अपरिहार्य क्वांटम क्रिया आहेत. या मायावी धारेला

आपण रोखू शकत नाही. मन:चक्षुसमोर जो देखावा येईल अथवा जो विचार येईल त्याकडे अहंभावाने किंवा स्वत्वभावाने पाहिले गेले तर मोजमाप आणि क्षोभ निर्माण होतो, आणि जीव त्यामध्ये अडकतो. मात्र त्याकडे फक्त तटस्थपणे व वैराग्यवृत्तीने पाहिले असता काही सूक्ष्म प्रमाणात मोजमाप आणि क्षोभ निर्माण झाला तरी ती फरकाची क्वांटम उर्जा ही साधकाची तटस्थता भंग करू शकत नाही. साधकाच्या सर्वोच्च अध्यात्मिक पातळीवर मोजमाप आणि क्षोभ निर्माणच होत नाही अशी अवस्था म्हणजेच अमनस्क अवस्था त्याला प्राप्त होते. श्री शंकरांनी पार्वतीला हाच "अमनस्क योग" विस्तृतपणे सांगितला आहे.

शून्य शिखर पर अनाहत बाजे जी
राग छत्तीस सुनाऊंगा



साधकाला त्याच्या समाधीच्या तुर्या अवस्थेमध्ये शून्यत्वाचा अनुभव येतो आणि अनाहत ध्वनी ऐकू येतो. क्वान्टम फिल्ड थिअरीच्या अनुषंगाने निर्मितीचा कारक (Creation operator) व विनाशाचा कारक (Annihilation Operator) हे दोघे अनुक्रमे जाणीव व नेणीव दर्शवितात. समाधी अवस्थेत ते दोघे एकमेकांसमवेत समत्व साधतात अन त्यामुळे मनरूपी क्वान्टम क्षेत्राची उर्जा तिच्या न्यूनतम पातळीपर्यंत (Ground Zero State) पोहोचते. वैश्विक क्वान्टमउर्जेच्या न्यूनतम पातळीवर मूळ स्वरुपामध्ये साधक स्थित होतो. अशा निर्गुणी, निरंकारी, निर्विकारी, निवृत्त व निर्वाण अवस्थेत केवळ चैतन्याचीच नांदी राहते. चैतन्याची ही अपरोक्ष किंवा प्रत्यक्ष अनुभूती घेण्यासाठी गेलेला तो "मी" तेथे स्वत:च चैतन्यस्वरूप होऊन राहतो. चैतन्यतत्वातील मनोकणांचा स्पिन या समत्वामध्ये लुप्त होतो, त्याचबरोबर त्या स्पिनमुळे निर्माण होणाऱ्या "मी" च्या म्हणजेच चैतन्याच्या परमोच्च संवेदना चैतन्यात मिसळून जातात. समत्वामुळे निरिक्षक होत्याचा नव्हता झाल्यावर आपोआप त्याच क्षणी जे मोजायचे ते सुद्धा लुप्त होऊन जाते. तरंगकारकामधील उर्जा समत्वास पोहोचलेली असल्याने मोजण्यासारखे तेथे काहीच नसते. क्वान्टम क्षेत्रात

उर्जास्थित्यंतर होणे, त्यातून विभवांतर निर्माण होणे व त्याचे मोजमाप होणे या क्रिया नाहीशा होतात. मनरूपी क्वान्टम क्षेत्रातिल क्वान्टम उर्जा स्थित्यंतरे मोजणारी इंद्रिये समत्वात लुप्त होतात अन मोजणारा निरिक्षकसुद्धा तेथे कोणीही नसतो. काळ आणि अवकाश यांना जन्म देणारा निरिक्षक त्यांच्या पलीकडील चिरंतन अस्तित्वात चिरंतन तत्व म्हणूनच स्थित झाल्याने त्याच्या दृष्टीने ते काळ आणि अवकाशसुद्धा त्या समत्वामध्ये लुप्त होऊन जातात. वचनीय आणि अनिर्वचनीय यांच्या तसेच निर्गुणाच्यासुद्धा पलीकडील खरी तर ही अवस्था आहे, अन म्हणूनच तिला शब्दबध्द करणे खरोखरच अशक्य आहे. हीच ती सिध्दावस्था जी श्री सिध्दार्थ गौतम बुध्दांनी श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांनी व सर्व धर्मातील साधूसंतांनी त्यांच्या निर्वाणाच्या वेळेस अनुभवली असली पाहिजे. हीच ती क्वान्टमदर्शनयोगरूपी राजमार्गावरील परमशांती आणि परमानंदमय अवस्था जी असंख्य मानवांना अनंताविष्कारात स्थिर करून चैतन्याच्या अनंतमय व चिरंतन स्वरूपात रूपांतरीत करत राहील. त्यासाठी ती क्वान्टमउर्जा तिच्या समत्वरूपाने तिचे सर्वस्व समर्पण करण्यासाठी व आपल्यामध्ये त्या सर्वोच्च परमेश्वरी चैतन्य तत्वाचे माध्यम होण्याची पात्रता निर्माण करण्यासाठी आपल्या मेंदूमध्ये सतत विराजमान आहे.

या शून्य शिखराच्या पलीकडे चैतन्य तत्व आहे. या शिखरावर पोहोचल्यावर गुरुकृपा प्राप्त करून चैतन्यमय होऊन जाता येते जेथे स्वत:तील चैतन्याच्या प्रत्यक्ष अनुभव येतो. साधक या शून्य शिखरावर पोहोचल्यावर त्याला इतक्या परम क्षमता प्राप्त होताहेत कि भौतिक पातळीवर आल्यावर ३६ प्रकारचे राग ऐकविण्याची त्याची तयारी होते. याचा अर्थ ज्या अनाहत स्वरातून हे ३६ राग निर्माण झाले आहेत, त्या अनाहत स्वरांचे गायन साधक करू शकेल असे मार्गदर्शन संत श्री गुरु कबीर दास येथे साधकाला करीत आहेत.

कहत कबीरा सुनो भाई साधो जी
जीत निशान घुराऊंगा ।।

या स्वस्वरुपानुभवरुपी शिखरावर पोहोचून मायेवर प्राप्त केलेल्या विजयाचे प्रतिक म्हणून मायावी बंधमुक्तीचे निशाण फडकवीत असल्याचे संत श्री गुरु कबीर दास येथे साधकाला सांगत आहेत. येथे विजयाचे निशाण म्हणजे स्वस्वरुपानुभव होय. या स्वस्वरुपानुभावापर्यंत साधकाने निश्चितपणे कसे पोहोचावे ते या रचनेतून संत श्री गुरु कबीर दास यांनी सांगितले आहे.

हे निर्गुण भजन पं. कुमार गंधर्व आणि विदुषी वसुंधरा कोमकली यांनी मिळून गायले आहे. हे गाणे एक विजय गीत आहे असेच म्हणावे लागेल. या गाण्यात बंधमुक्ततेचे आणि ते प्राप्त कसे करावे याचे वर्णन केले आहे. मायेवर विजय प्राप्त करून स्वत:मधील चैतन्याचा साक्षात अनुभव आल्यावर पुन्हा मायेच्या चौकटीतून रचलेले या विजयश्रीचे हे गीत आहे. आपल्याला ते ऐकून निश्चितच स्फुरण चढेल.

हम परदेशी पंछी बाबा...

हम परदेसी पंछी बाबा, अणी देसरा नाही ,

संत श्री कबीर दास हे सिद्ध व मुक्त पुरुष होते. असा मुक्त झालेला मनुष्य हे निश्चितपणे सांगू शकतो की आपण या ठिकाणी सामान्य भौतिक जीवनाच्या पातळीवर उपरे आहोत. हा उपरेपणा असल्याने येथे परदेसी पंछी असे रूपक येथे वापरले आहे. हा योगी पुरुष त्याच्या व्यक्तीमत्वात सीमित झालेल्या चैतन्याला साधन मार्गात राहून विश्वव्यापक करतो. चैतन्य हे आपल्याला प्रत्यक्षपणे अनुभवता येत नाही. सर्वसामान्यपणे आपल्या स्थूल पदार्थमय शरीराच्या माध्यमातून आपल्याला चैतन्याचा अनुभव येतो. मात्र सिद्ध योग्याला त्याच शरीरात असूनही साक्षात चैतन्याचा प्रत्यक्ष अनुभव येत असतो. असा हा चैतन्यमयी पक्षीरूप योगी या शरीररुपी प्रदेशातला (अणी देसरा) नसून तो त्या शरीरात परका किंवा परदेशी आहे . परदेशी म्हणजे आम्ही चैतन्याच्या गावचे आहोत असे त्यांना म्हणावयाचे आहे.

भौतिक वास्तव सत्यतेत राहूनही बंधमुक्तता अनुभवता येणे हे अभूतपूर्व आहे. एकाच वेळेस व्यक्ती भौतिक सत्यतेत म्हणजे द्वैतात आणि अद्वैतात राहणे अशक्य वाटते. तथापि सिध्द योगी व्यक्तींच्या बाबतीत त्यांचे द्वैताद्वैत असे संमिश्र जीवन असणे शक्य आहे. निर्मन अवस्था म्हणजे मनामधील मनाने तयार केलेले सर्व काही निरस्त करून तेथे अद्वैत अवस्थेचा अनुभावक म्हणून राहता येणे ही परमसिध्दी आहे. निर्गुणाचे अनुभावक होण्यासाठी शरीराच्या पलीकडे जाणे अपरिहार्य आहे. दृश्य असे काहीही तेथे नाही आणि द्रष्टा म्हणजे गुणात्मक अहंभाव सुद्धा नाही. त्यामुळे दर्शन नाही. काहीच नाही. एक अत्यंत जागृत झोप असे याचे वर्णन करता येईल. झोपेच्या

दरम्यान कोणीही अनुभावक नसतो. झोप ही अनुभाव्य नाही. मात्र झोपेच्या अपश्चात आपल्याला झोप घेतल्याचा अनुभव आला हे समजते. तसे येथे अद्वैतातून बाहेर आल्यावर होत असले पाहिजे.

अणी देसरा लोग अचेता पल पल पर पछताई भाई संतो

या शरीररुपी प्रदेशात राहणारी सामान्य माणसे अचेतन आहेत. याचा अर्थ सर्वसामान्यपणे माणसाला चैतन्याच्या प्रत्यक्ष अनुभव घेता येत नाही व त्यामुळे तो अज्ञानी असतो, असा आहे. शरीर हे पदार्थमय आहे त्यामुळे त्याला व्याधी आहेत. जीवनात अनेक वस्तू विषय यामुळे प्रभावित होणारे जीव सरतेशेवटी पश्चात्तापाचे धनी होतात. हे जीवन कधीही कोणत्याही बाबतीत कोणतीच तृष्णा शमवत नाही हे परम सत्य आहे. कितीही सुख मिळविण्याचा प्रयत्न केला तरी काहीतरी त्रुटी राहतेच आणि असा असमाधानी जीव त्यामुळे सतत पश्चात्तापदग्ध असतो. आता तर हे अज्ञान अशा पातळीवर घसरले आहे की काही जणांना पश्चात्तापसुद्धा होत नाही.

मुख बिन गाना, पग बिन चलना, बिन पंख उड जाई हो

जीवनमुक्त सिद्ध मनुष्य हा सात्विकतेच्या सर्वोच्च पातळीवर असतो. तेथे वैश्विक उर्जा आणि चैतन्य यांचा परमोच्च संगम झाल्याने केवळ कल्पनेने त्या योग्याला सर्व अनुभव प्राप्त होऊ लागतात. त्या योग्याला कोणतेही भौतिक कष्ट घ्यावे लागत नाही. भौतिक वस्तू विषयांवरील त्यांचे परावलंबित्व संपुष्टात आलेले असते. याचा दाखला देण्यासाठी वाणीशिवाय गाणे, पायाशिवाय चालणे आणि पंखांशिवाय उडणे सहज शक्य होते असा निर्वाळा ते येथे देत आहे. योगी आपल्या सिद्धीच्या मार्गावर हा कायाकल्प अनुभवतात असे त्यांना येथे विषद करावयाचे आहे.

बिना मोह की सुरत हमारी, अनहद मे रम जाई हो

योगी त्याच्या सिद्ध समाधी अवस्थेत कोणत्याही स्थूलसूक्ष्म वस्तू, विषय, कल्पना, विचार यांच्यापासून अलिप्त असतो व त्यामुळे तो अद्वय अवस्थेत असतो. मन कोणत्याही स्थूलसूक्ष्म वस्तू, विषय, कल्पना, विचार यांच्या संपर्कात आले की त्याची माहिती करून घेण्याची वृत्ती निर्माण होते. ही वृत्तीच मोहाचे मूळ आहे. त्यामुळे द्वंद्व निर्माण होते आणि जीव त्यामध्ये गुंतून जातो. हे गुंतणे त्या जीवाची ओळख बनते. हे गुंतणे मोहाला कारणीभूत होते आणि त्यातून आपली ओळख आपला चेहरा प्रतीत करतो. मात्र समाधी अवस्थेत योग्याला हा मोहरूपी चेहराच नसल्याने त्या योग्याला

अंतर्बाह्य कोणतीच ओळख राहत नाही. अशा वेळी हा योगी अनाहत ध्वनीमध्ये रमतो. जेथे सर्व उर्जेचे मूळ आहे, जेथे सर्व सात्विक शक्ती एकवटलेली आहे ते अनाहत स्थान अशा योग्यासाठी रमणीय आहे.

छाया बैठू अगनी व्यापे, धूप अधिक सितलाई हो

सामान्य माणसाचे असे होते की भवतापापासून वाचण्यासाठी तो कोठे आसऱ्यासाठी गेला तरी चिंतेने तो तेथे जळत राहतो. प्रचंड तापदायक परिस्थितीत मायेच्या आधीन गेल्याने तो ताप त्याला शीतलतेप्रमाणे समजून इच्छापूर्तीच्या मागे लागतो. तहानभूक, शीतोष्ण, सुखदुःखे, इच्छा आणि आसक्ती यापासून योगी कायमचाच अलिप्त असतो. योगी आपल्या योगसामर्थ्याने सिद्ध जीवन जगतात. योगी त्याच्या योगसामर्थ्याने सभोवतालच्या सृष्टीवर मात करतो. शीतालेतही तो उष्णता निर्माण करतो आणि आत्यंतिक उष्णता असताना तेथे तो शीतलता निर्माण करू शकतो.

छाया धूप से सतगुरु न्यारा, मै सतगुरु के भाई

अशा या तहानभूक, शीतोष्ण, सुखदुःखे, इच्छा आणि आसक्ती युक्त द्वंद्वात्मक जीवनापेक्षा सतगुरुंचे सानिध्य निश्चितच चांगले आहे. सतगुरुंच्या सानिध्यात हे भवतापदायक द्वंद्व अद्वयानंदात परिवर्तीत होते. अशा या वैराग्याच्या व तटस्थतेच्या साधनमार्गावर श्री गुरु परमसत्याची ओळख करून देणारे मोठ्या भावासारखे असतात आणि लहान भावाप्रमाणे शिष्य तेथे त्यांचे मार्गदर्शन प्राप्त करतात.

आठो पहर अडक रहे आसन, कदे न उतरे शाही

अनंताच्या प्रवासात अनंत म्हणून निघालेला योगी काळाच्या पल्याड जातो. परंतु सामान्य माणसास कळावे म्हणून संत श्री कबीर दास म्हणतात की असा हा योगी त्याच्या साधन मार्गात आठ प्रहर व्यग्र असतो. या साधनेत तो परम सत्यमयी अशा सात्विक उर्जाशक्तीचा आविष्कार घडवून आणतो, आणि स्वत:ला विश्वव्यापक करत असतो. असा हा योग्याचा राजमार्ग असून त्या सिद्धासनावरून तो कधीही उतरत नाही. योगी सामान्य भौतिक जीवन जगत असतानाही ते समाधीमध्येच असतात असे त्यांना येथे सूचित करावयाचे आहे.

मन पवन दोनो नही पहुंचे, उन्ही देस के माही

त्या चैतन्यमयी प्रदेशामध्ये, त्या सिद्धसमाधी अवस्थेमध्ये योगी त्याचे मन भौतिक जगतामधून काढून घेतो. पंचमहाभूतांच्या सर्व शक्तींच्या पल्याड तो योगी गेलेला असतो. एवढेच नाही तर अशा या सिद्धावस्थेत त्याने मनाच्या गतीलाही मागे पडलेले असते. म्हणून संत श्री कबीर दास म्हणतात की तो ज्या चैतन्याच्या गावी पोहोचलेला असतो तेथे मन आणि वायू दोन्ही पोहोचू शकत नाही.

निरगुण रूप है मेरे दाता, सरगुण नाम धराई

आता त्या योगी मनुष्याला निश्चितपणे असा अनुभव येतो की त्याला ज्या परब्रह्माचा (म्हणजे दाता) अनुभव आला आहे ते परम तत्व साक्षात निर्गुण आहे. ते परम तत्व निर्गुण, निराकार, निर्विकार आणि सर्व प्रकारच्या संवेदनांच्या पलीकडील आहे. त्या परब्रह्माने जे सगुण स्वरूप धारण केल्यासारखे वाटते ते नाममात्र आहे. देवाची मूर्ती ही सगुण वाटते परंतु त्या सगुण मूर्तीच्या माध्यमातून व त्या सगुण नामस्मरणातून, सगुण नामसंकीर्तनातून सात्विक गुणांच्या पायरीने तो साधक परमोच्च ठिकाणी पोहोचतो.

कहे कबीर सुनो भाई साधो, साहब है घट माही

हा योगी एके काळी एक सामान्य मनुष्यच होता. त्याच्यामध्ये असलेल्या सात्विक उर्जेला व चैतन्याला अधिष्ठान करून तो त्याच्या सिद्धतेला पोहोचला आहे. या शरीररुपी घटामध्ये अशी काही क्षमता आहे की श्री गुरूंच्या मार्गदर्शनाखाली ती क्षमता जागृत केली की तो साहेब म्हणजे ते परब्रह्म त्याच घटात म्हणजे त्याच शरीरामार्फत प्रकट होते. आणि म्हणून या मनुष्य जन्माचे मोल अमोल आहे असे संत श्री कबीर दास येथे आपल्या साधक बांधवांना सूचित करत आहेत.

संदर्भ

1. http://amrutvani.blogspot.in/2007/04/amrutvani-googleadclient-pub.html
2. http://www-physics.lbl.gov/~stapp/stappfiles.html
3. http://www.motionmountain.net/motionmountain-volume.4pdf
4. http://www.physicsoftheuniverse.com/topics_quantum_nonlocality.html
5. http://www.physicsoftheuniverse.com/topics_quantum_nonlocality.html
6. http://photonichuman.weebly.com/, Photonic Human by Lona Miller-2015
7. http://www.ratical.org/co-globalize/MaeWanHo/brainde.html
8. https://en.wikipedia.org/wiki/Coherence_(physics)
9. http://www.pbs.org/wgbh/nova/blogs/physics/2014/03/quantum-life/
10. http://www.physicsoftheuniverse.com/topics_quantum_superposition.html
11. http://whatis.techtarget.com/definition/superposition
12. https://en.wikipedia.org/wiki/Quantum_decoherence
13. http://plato.stanford.edu/entries/qm-decoherence/
14. http://www.i-sis.org.uk/brainde.php
15. http://rationalwiki.org/wiki/Quantum_collapse
16. http://news.mit.edu/2013/predicted-state-of-atomic-collapse-seen-0314
17. H. Hu & M. Wu, Spin-Mediated Consciousness: Theory, Experimental Studies, Further Development & Related Topics, Medical Hypotheses (2004) 63(4): 633-646. http://arxiv.org/abs/quant-ph/0208068
18. Journal of Consciousness Exploration & Research| February 2015 | Volume 6 | Issue 2 | pp. 70-79 Bhutkar, R.,Quantum Field of Consciousness & the Mind (Part I))) ,Journal of Consciousness Exploration & Research| February 2015 | Volume 6 | Issue 2 | pp. 80-89 Bhutkar, R.,Quantum Field of Consciousness & the Mind (Part II),(
19. Belal E. Baaquie and François Martin2005 , : “Quantum Psyche: Quantum Field Theory of the Human Psyche” (NeuroQuantology 2005|Issue 1|Page 7-42, By Baaquie BE and Martin

F. ISSN 1303 5150.
http://www.physics.nus.edu.sg/~phybeb/BEB%20Quantum%20Psyche.pdf

20. NeuroQuantology | December 2015 | Volume 13 | Issue 4 |Page 475-486 | doi: 10.14704/nq.2015.13.4.867 ,Bhutkar RG., Quantum field model experiences, responses and thoughts.

21. Journal of Consciousness Exploration & Research| November 2015 | Volume 6 | Issue 11 | pp. 989-1000 Bhutkar, R., On Quantum Field Representation of the Mind Field

22. क्वान्टम मेकॅनिक्स... : आपल्या चिरंतन अस्तित्वाचे विज्ञान दर्शन : राजेश भुतकर : मल्टीव्हर्सीटी पब्लिकेशन, पुणे